# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र. १२/ २०१२** **दिनांक १८.०७.२०१२**

**स्थळ - अहमदनगर (जिल्हाधिकारी कार्यालय)** **वेळ- सकाळी ११.०० वाजता**

श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सभा बुधवार दिनांक १८ जुलै,२०१२ रोजी सकाळी ११.०० वाजता अहमदनगर येथे जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित करण्यात आली असलेबाबत इकडील जा.नं. एसएसएस-वशी-०४-१७३१-२०१२, दिनांक १७ जुलै,२०१२ रोजीचे पत्राने सर्व सदस्यांना कळविण्यात आले होते. त्यानुसार सदरहू सभा बुधवार दि.१८.०७.२०१२ रोजी सकाळी ११.०० वाजता अहमदनगर येथे जिल्हाधिकारी कार्यालयात मा.अध्यक्ष श्री.जयंत दत्तात्रय कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

०१. मा.श्री.जयंत दत्तात्रय कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर, अध्यक्ष

०२. मा.डॉ.संजीवकुमार, जिल्हाधिकारी, अहमदनगर, सदस्य

०३. श्री.किशोर मोरे, कार्यकारी अधिकारी, सदस्य

सभेच्या सुरुवातीस श्रीसाईबाबांची प्रार्थना करणेत येऊन शासन अधिनियमातील कलम ११ (२) नुसार आवश्यक गणपूर्ती असल्याने सभेचे कामकाज मा.अध्यक्ष मा.श्री.जयंत दत्तात्रय कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आले.

यानंतर विषय पत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरू करणेत आली.

**विषय नं.०१ सोने-चांदी कस लावून तपासणेकामी सराफाची (Gold valuer) मुदतवाढीबाबत.**

**प्रस्ताव-** **अ)** संस्थानला दक्षिणापेटीव्दारे मिळणाऱ्या व लेखाशाखेत वेळोवेळी देणगी येणाऱ्या सोने-चांदी वस्तु अलंकाराचा कस लावून तपासणी करणे, बाजारभावाप्रमाणे किंमत लावणे याकामी, सराफ (*Gold Valuer*) म्हणून श्री. कमलाकर हरीभाऊ खरोटे, मनमाड (शासनमान्यता प्राप्त मुल्यांकनकार) तसेच श्री. गणेश दत्तात्रय नागरे, शिरडी यांची मा. व्यवस्थापन समितीच्या दि. ०७ ऑगस्ट, २०१० रोजी झालेल्या बैठकीतील निर्णय क्र. ६२३ अन्वये श्री. गणेश नागरे, दि. ०१ ऑगस्ट, २०१० ते ३१ जुलै, २०१२ व श्री. खरोटे दि. ०१ ऑक्टोबर, २०१० ते ३० सप्टेंबर, २०१२ या कालावधीसाठी यांची मानद तत्वावर दरमहा रू. २,५००/- (दोन हजार पाचशे मात्र) मानधनावर नेमणूकीस मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

तथापि श्री. गणेश नागरे यांच्याकडे सोने-चांदी मुल्यांकनासाठी आवश्यक असणारा शासन मान्यता प्राप्त मुल्यांकनकार परवाना नसल्याने सदर परवाना मिळणेकामी श्री. नागरे यांनी मा. मुख्य आयुक्त, प्राप्ती कर विभाग, पुणे यांचे अर्ज केलेबाबत सदर कार्यालयाची पोहोच पावती संस्थानकडे सादर केलेली आहे. तरी संस्थानला दक्षिणापेटीद्वारे प्राप्त होणाऱ्या सोने-चांदी वस्तुंच्या संख्येत तसेच लेखाशाखेत देणगीरुपाने दैनंदिन प्राप्त होणाऱ्या सोने-चांदीच्या वस्तुंमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. समाधि मंदिर व परिसरातील दक्षिणापेटी मोजणीकामी श्री. गणेश नागरे स्वत: नियमित उपस्थित असतात. लेखा शाखेकडे आलेल्या सोने-चांदी वस्तुंचे मुल्यांकन श्री गणेश नागरे यांच्याकडून करुन घेण्यात येते. दुसरे मुल्यांकनकार श्री. खरोटे हे मनमाड येथे कायम वास्तव्यास असल्याने दररोज उपलब्ध नसतात. सबब, संस्थान कामाची निकड लक्षात घेता श्री. गणेश नागरे यांना दि. ०१ ऑगस्ट, २०१२ पासुन आहे त्या मानधनावर पुढील दोन वर्षासाठी तूर्त मुदतवाढ द्यावी असे नम्र मत आहे.

**ब)** तसेच श्री. कमलाकर खरोटे, मनमाड (शासन मान्यता प्राप्त मुल्यांकनकार) यांना दि. ०१ ऑक्टोबर, २०१० पासून दोन वर्ष कालावधीसाठी दरमहा रुपये २,५००/- (रुपये दोन हजार पाचशे ) मात्र मानधनावर नेमणुक करण्यात आलेली आहे. श्री. खरोटे यांची नेमणुकीची मुदत दि. ३० सप्टेंबर, २०१२ पर्यंत आहे. संस्थानला दक्षिणापेटीव्दारे प्राप्त होणाऱ्या सोने-चांदी वस्तुंच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे. संस्थान कामाची निकड लक्षात घेता श्री. खरोटे यांची आहे त्या मानधनावर दिनांक ०१ ऑक्टोंबर २०१२ पासुन पुढील दोन वर्षासाठी पुन्हा नेमणुकीस मुदतवाढ देण्यात यावी, असे नम्र मत आहे.

तरी उपरोक्त अ व ब प्रस्तावावर निर्णय होणेसाठी सविनय सादर.

एकुण मानधन खर्च रु. १,२०,०००/- (एक लाख विस हजार) दोन वर्षासाठी

**निर्णय क्र.५७३ यावर सविस्तर चर्चा होऊन, सोने-चांदी कस लावून तपासणेकामी श्री. गणेश नागरे यांना दि. ०१ ऑगस्ट, २०१२ पासुन पुढील दोन वर्षासाठी व श्री. कमलाकर खरोटे, मनमाड (शासन मान्यता प्राप्त मुल्यांकनकार) यांना दिनांक ०१ ऑक्टोंबर २०१२ पासुन पुढील दोन वर्षासाठी पुर्वीचेच मानधनावर मुदतवाढ देणेस मान्यता देणेत आली.** (कार्यवाही- मुख्य लेखाधिकारी)

---

**विषय नं.०२ संस्थानकडे उपलब्ध असलेले सोने वस्तू अलंकार इंडिया गव्हमेंट मिंट, मुंबई व चांदी वस्तू अलंकार नॅशनल रिफायनरी प्रा.लि. मुंबई यांचेकडे वितळवून नाणी पेंडन्ट तयार करणे बाबत**

**प्रस्ताव-** **(अ)** श्री साईबाबा संस्थानचे दिनांक ३१ मार्च, २००७ रोजी शिर्डी येथे झालेल्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.२६२ च्या निर्णयानूसार देणगी रूपाने उपलब्ध होणारे सोने-चांदी वितळुन

इंडिया गव्हर्मेंट मिंट, मुंबई यांचेकडून श्री साईंची प्रतिमा असलेली चांदीची (२० ग्रॅम), सोन्याची (प्रत्येकी २.५, ५, १० ग्रॅमची ) नाणी साईभक्तांना योग्य किंमतीत उपलब्ध करुन देणेबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे.

**(ब)** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ चे अधिसूचनेनूसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेचे कामकाज शासननियुक्त मा. व्यवस्थापन समिती पहात आहे. मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयान्वये देणगी रुपाने प्राप्त होणारे सोने-चांदी वस्तू अलंकारापैकी, जे अलंकार अत्यंत अत्युत्कृष्ट व असामान्य कलाकुसरीचे असतील, असेच अलंकार व्यवस्थापनाकडे सदैव जतन करुन ठेवता इतर उर्वरीत सोने-चांदी वस्तूं अलंकार वितळविणे बाबतचे कार्यपध्दतीस मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांनी त्यांचे पत्रक्रमांक सासंवि-२००५/४०७/(६४)-का. सोळा दिनांक ३१ मे, २००७ अन्वये स्थायी मान्यता मिळालेली आहे.

माहे मार्च, २००८ अखेरच्या सोने वस्तु अलंकार दिनांक १४ मे २००९ रोजी इंडिया गव्हर्मेंट मिंट, मुंबई यांचेकडे व माहे मार्च २००६ अखेरच्या चांदी वस्तु दिनांक २५ नोव्हेंबर २००९ रोजी नॅशनल रिफायनरी, मुबई यांचेकडे संस्थान अधिकारी व विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे प्रतिनिधी समक्ष हस्तांतरीत करुन वितळविण्यात आलेले आहे. त्यातुन प्राप्त झालेल्या शुध्द सोन्याची नाणी व पेंडंटस् इंडिया गव्हर्मेंट मिंट, मुंबई यांचेकडून तयार करुन घेऊन साईभक्तांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तसेच प्राप्त झालेल्या शुध्द चांदीतुन नॅशनल रिफायनरी, मुंबई यांचेकडून नाणी तयार करून घेऊन साईभक्तांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

**(क)** सध्या संस्थानकडे सन २००८-०९, २००९-१०, २०१०-११ व २०११-१२ या वर्षात देणगी रूपाने मिळालेल्या सोन्यापैकी लेखाशाखेकडे शिल्लक असलेले सोने वस्तु वजन ९२.६६९ किलो आहे. सध्या संस्थानकडे शुध्द सोन्यापासून तयार करून घेण्यात आलेली नाणी वजन १० ग्रॅम, ५ ग्रॅम व २.५ ग्रॅम अनुक्रमे २१२८, २००३ व २०२४ एवढीच शिल्लक आहे. या नाणे विक्रीस भक्तांचा मोठया प्रमाणात प्रतिसाद असुन यापुढे नाणी बनविण्यासाठी संस्थानकडे शुध्द स्वरूपातील सोने शिल्लक नाही. त्यामुळे सध्या सन २००८-०९ व २००९-१० या वर्षातील सोने वस्तु वितळवून त्यापासुन मिळणाऱ्या शुध्द सोन्यापासुन नाणी तयार करून घेता येतील.

तसेच संस्थानकडे २००६-०७, २००७-०८, २००८-०९, २००९-१०, २०१०-११ व २०११-१२ या वर्षात देणगी रूपाने मिळालेल्या चांदीपैकी लेखाशाखेकडे शिल्लक असलेली चांदी वजन १,७९५ किलो ग्रॅम एवढी शिल्लक असुन सदर चांदीचा साठा मोठया प्रमाणावर झाला असुन स्ट्राँग रूममध्ये ठेवण्यात जागेअभावी अडचण निर्माण होत आहे. तसेच चांदीपासुन बनविलेल्या नाणी विक्रीसही भक्तांचा चांगला प्रतिसाद आहे. त्यामुळे सन २००६-०७ व २००७-०८ या दोन वर्षाची चांदी वितळवून मिळणाऱ्या शुध्द चांदीपासुन नाणी तयार करून घेता येतील.

**(ड)** देणगी रूपाने मिळालेल्या दि. ०१ एप्रिल, २००८ ते ३१ मार्च, २०१० अखेर सोने वस्तु अलंकाराची समक्ष पाहणी करुन लिलावाच्या दृष्टीने सुयोग्य अशा वस्तुंची निवड करुन २४१८.३०० ग्रॅम सोने वस्तु व दि. ०१ एप्रिल, २००६ ते ३१ मार्च, २००८ अखेरच्या चांदीमधील ४४०.९९० ग्रॅम चांदी वस्तु लिलावासाठी राखुन ठेवण्यात आलेल्या आहेत.

या व्यतिरीक्त सध्या समाधी मंदिराकडे वापरात असलेल्या सोने-चांदी वस्तुपैकी काही वस्तु लिलावाव्दारे विक्री करता येतील.

सध्या लेखाशाखेकडे वितळविणेकामी दिनांक०१ एप्रिल, २००८ ते ३१ मार्च, २०१० अखेर देणगी रुपाने जमा झालेले सोने व दिनांक १ एप्रिल २००६ ते ३१ मार्च २००८ अखेर देणगी रूपाने जमा झालेली चांदी, वस्तू अलंकार शिल्लक आहेत, त्याचा तपशील खालील प्रमाणे-

| **अ.नं.** | **तपशिल** | **वजन किलो, ग्रॅम, मि.ग्रॅम** | **आजचे बाजार भावाने होणारी अंदाजे किंमत रु.** |
|---|---|---|---|
| ०१ | सोने वस्तु | ३७, ७५४, ४९४ | १०.३८ कोटी |
| ०२ | चांदी वस्तू | ५१३, ३७१, ७१० | २.२० कोटी |

**(इ)** सदर विषय यापुर्वी मा. व्यवस्थापन समितीचे सभेत वेळोवेळी सादर करण्यात आला होता त्यावर झालेला निर्णय खालीलप्रमाणे-

१) दिनांक २१.०५.२०११ च्या सभेपुढे विषय नं. २२ अन्वये सादर करण्यात आला असता त्यावर निर्णय क्र. ३०३ नुसार सदरहु विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली

२) दिनांक १९.११.२०११ च्या सभेपुढे आयत्या वेळेच्या विषयात विषय क्र. १० नुसार सादर करण्यात आला असता त्यावर निर्णय क्र. ८५६ नुसार सदरहु विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

३) दिनांक १३-१४.०१.२०१२ च्या सभेपुढे विषय क्र. ४२ नुसार सादर करण्यात आला असता त्यावर निर्णय क्र. ४३ नुसार यावर सविस्तर चर्चा होउन, संस्थानकडे उपलब्ध असलेले सोने-चांदीच्या वस्तूपैकी ज्या वस्तू लिलावायोग्य आहेत अशा वस्तूंची लिलावाद्वारे विक्री करणेकामी वर्तमानपत्रात व इंटरनेटच्या माध्यमातून जाहिरात देण्यात यावी. तसेच देशातील श्री साईमंदिरांनाही कळविण्यात

यावे. उर्वरित सोने-चांदी वस्तू मा.विश्वस्तांनी पहाणी करून त्या इंडीया गव्हर्नमेंट मिंट, मुंबई तसेच नॅशनल रिफायनरी, मुंबई यांचेकडे नेउन वितळविण्यात याव्यात व त्यापासून मिळणाऱ्या शुध्द सोने-चांदीपासुन भक्तांसाठी नाणी व पेंडन्ट तयार करण्यात यावे असे ठरले.

**(ई)** दिनांक १४ जुन, २०१२ रोजी इंडिया गव्हर्मेंट मिंट, मुंबई यांचेकडून फॅक्सद्वारे सोने वितळविणे व शुध्दीकरणाबाबत दर मागविण्यात आलेले आहेत. त्यानुसार इंडिया गव्हर्मेंट मिंट, मुंबई यांचा फॅक्स संदेश No.XV-२६/३२९/C&R/२०१२ दि. १५.०६.२०१२ त्यात त्यांनी अंदाजे ३७ किलो सोन्यासाठी येणारा खर्च अंदाजे रू. ४,८५,८७०/- एवढा असुन यात बदल होउ शकतो व चांदी वितळविणे व शुध्दीकरणसाठी नॅशनल रिफायनरी प्रा. ली. जोगेश्वरी, मुंबई यांचेकडील पत्र क्र. NR:SM:S-१२/T-०१४५ दि. १३.०६.२०१२ नुसार चांदी वितळविणेकामी रक्कम रु. १५०/- प्रति किलो व शुध्दीकरणसाठी रक्कम रू. १,५००/- प्रति किलो तसेच प्रति २० ग्रॅम नाणी बनविणेकामी रु. ८०/- दर कळविलेला आहे.

तरी उपरोक्त नमुद केलेल्या वस्तुस्थितीचा विचार करता सोने वस्तु इंडिया गव्हर्मेंट मिंट, मुंबई यांचेकडे व चांदी वस्तु नॅशनल रिफानरी प्रा. लि., मुंबई यांचेकडे वितळविणेकामी हस्तांतरीत करण्यास व वितळविल्यानंतर प्राप्त होणाऱ्या शुध्द सोने-चांदी पासुन प्रचलित वजनाची नाणी आवश्यकतेनूसार बनवुन घेणेस व सदर वस्तु वितळविणेकामी वेळापत्रक ठरविणेस मान्यता मिळणेस विनंती आहे. तसेच सोने-चांदी वितळविणे व शुध्दीकरण करण्यासाठी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेस विनंती आहे.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेसाठी सविनय सादर.

सोने वस्तु अलंकार व चांदी वस्तु अलंकार वितळविणे व शुध्दीकरणकरणेकामी एकुण खर्च अंदाजे १३,३४,०००/- (तेरा लाख चौतीस हजार)

सन २०१२-१३ या आर्थिक वर्षासाठी रु. २०००,०००/-एवढी अंदाजपत्रकीय तरतुद सोने-चांदी शुध्दीकरण व नाणी पाडणे खाती करण्यात आलेली आहे.

मा. त्रीसदस्य समिती सभा दि. ०६ एप्रिल, २०१२ निर्णय क्र. २८७ नुसार अपेक्षित खर्चाचे अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे.

**निर्णय क्र.५७४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे सोने व चांदी अनुक्रमे इंडिया गव्हर्मेंट मिंट, मुंबई व नॅशनल रिफायनरी प्रा. ली. जोगेश्वरी, मुंबई येथे वितळविण्यास मान्यता देण्यात आली. तसेच, सोने-चांदी वितळविणे व शुध्दीकरण करणेकामी येणाऱ्या खर्चास व प्राप्त होणाऱ्या शुध्द सोने-चांदी पासुन प्रचलित वजनाची नाणी आवश्यकतेनुसार बनवून घेणेस व त्यासाठी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच, याकामी विमा उतरविणे, वाहतुक व इतर अनुषंगीक खर्चासही मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

---

**विषय नं.०३** **श्री साईप्रसाद निवासस्थान कार्यालयाकरीता रुम वाटप बुकींग केंद्रासमोर शेड करणे बाबत.**

**प्रस्ताव-** साईप्रसाद निवासस्थान विभागामार्फत साईभक्तांना कार्यालयासमोर रुम वाटप केले जाते. त्याकरीता भक्तांना बराच वेळ लाईनमध्ये उभे रहावे लागते करीता भक्तांचे उन वारा यापासून रक्षण होणेकरीता शेड करुन मिळणेबाबत अधिक्षक, श्री साईप्रसाद निवासस्थान विभाग यांनी दि.२२/०२/२०१२ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे.

यापुर्वी श्री साईबाबा हॉस्पीटल मध्ये पेशंटचे नातेवाईकांना बसणेकरीता सुशोभित वॉटरप्रुफ फॅब्रिक वापरुन शेड करणेत आले आहे. त्याच पध्दतीचे शेड सदर ठिकाणी करता येईल. सदर ठिकाणी ५८० चौ.फुट शेड करणे करता स्ट्रक्चरल फॅब्रिकेशन व वॉटरप्रुफ फॅब्रिकसह अंदाजे रु.९७,५००/- मात्र खर्च अपेक्षीत आहे.

तरी श्री साईप्रसाद निवासस्थान कार्यालयाचे रुम वाटप बुकींग काऊंटर समोर एम.एस. स्ट्रक्चरसह वॉटरप्रुफ फॅब्रिकचे शेड तयार करणेकरीता येणारे अंदाजे रु.९७,५००/- मात्रचे खर्चास व सदरचे काम विहित पध्दतीने कोटेशन्स मागवून करुन घेणेसाठी मा. त्रीसदस्य समितीचे सभेपुढे प्रशासकीय मान्यतेस्तव सादर.

**निर्णय क्र.५७५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसाद निवासस्थान कार्यालयाचे रुम वाटप बुकींग काऊंटर समोर एम.एस. स्ट्रक्चरसह वॉटरप्रुफ फॅब्रिकचे शेड तयार करणेचे काम विहित पध्दतीने कोटेशन्स मागवून करुन घेण्यास व याकामी येणारे अंदाजे रु.९७,५००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०४** **श्री साईबाबा हॉस्पिटलमधील मुख्य प्रवेशव्दाराच्या उजव्या बाजूकडील भागात शेड उभारणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये मोठ्या प्रमाणात रुग्ण मोठ्या प्रमाणात तपासणीसाठी येत असतात, बाह्यरुग्ण विभागातील रुग्णांसाठी सध्या रुग्णालयाचे रुम नं. १४ मधून केसपेपर दिले जातात. रुग्णांच्या वाढत्या गर्दीमुळे केसपेपर घेणाऱ्यांची रांग दिवसेंदिवस वाढतच आहे. त्यामुळे बाह्यरुग्ण सेवा घेण्यासाठी प्रतिक्षेत असलेले रुग्ण व केसपेपर घेण्यासाठी प्रतिक्षा करत असलेले रांगेतील रुग्ण यामुळे ओ. पी. डी. विभागातील पॅसेजमध्ये व श्रीं च्या मुर्तीसमोरील मोकळ्या जागेमध्ये प्रचंड गर्दी होत आहे. सदर गर्दी कमी करणेसाठी बाह्यरुग्ण विभागातील रुग्णांसाठी केसपेपर देण्याची व्यवस्था रुग्णालयाच्या मुख्य प्रवेशव्दाराच्या

उजव्या बाजूकडील बिलिंग विभागाच्या शेजारील रुमच्या खिडकीतुन बाहेरील बाजूने देण्याचे प्रस्तावित आहे. यामुळे रुग्णांची आतमधील गर्दी कमी होईल.

रुग्ण खिडकीच्या बाहेरील आवारात रांगा लावून केसपेपर घेतील यासाठी श्री साईबाबा हॉस्पीटल इमारतीच्या मुख्य प्रवेशव्दाराच्या उजव्या बाजूस असलेल्या मोकळ्या जागेत इमारती जवळच केसपेपर देणेची व्यवस्था करणेसाठी रुग्णांना केसपेपर घेणेसाठी उन, वारा व पाऊसापासून संरक्षण होणेसाठी सदर ठिकाणी शेड तयार करुन मिळणेबाबत वैद्यकिय संचालक यांनी त्यांचेकडील दि. १४ मे, २०१२ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे.

त्यानुसार सदरहू भागाची वैद्यकिय संचालक यांचे समवेत पहाणी करण्यात आली असून, रुग्णालयाचे मुख्य प्रवेशव्दाराचे उजव्या (दक्षिण) बाजूस केसपेपर देणेसाठी खिडकी तयार करुन त्यासमोरील भागामध्ये केसपेपर घेणेसाठी रांगेत थांबणारे रुग्णांसाठी शेड करता येईल.

करीता श्री साईबाबा हॉस्पीटलचे मुख्य प्रवेशव्दारचे उजव्या (दक्षिण) बाजूस मोकळ्या जागेत स्ट्रक्चर तयार करुन त्यावर ॲवेनिंग शेडची उभारणी करता येईल. याकामी खालील प्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| Sr. No. | Particulars | Size | Area | Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 01 | Designing, Providing & erecting shed for ‘Q’ at shri Saibaba Hospital, Shirdi made of tubular steel structure made out of TATA, Jindal or any other approed make with ISI mark with one coat of red oxide and two coats of Oil Paint of approved shade and make. Double side PVC coated **French Ferrari Membrane / Awning fabric** for roofing including all fittings and all accessories. | 47’-6”x20’ | 950 Sft. | 160/- Per Sft. | 152000/- |
| | | | | Total Amount Rs. | 1,52,000/- |

उपरोक्तप्रमाणे शेड तयार करणेकामी येणारे रु. १,५२,०००/- खर्चास प्रशासकिय मान्यता मिळणेस व सदरहू कामी विहित पध्दतीने दरपत्रके मागवून सदरचे काम करुन घेता येईल.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५७६ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे श्री साईबाबा हॉस्पिटलमधील मुख्य प्रवेशव्दाराच्या उजव्या बाजूकडील भागात विहीत पध्दतीने दरपत्रके मागवून शेड उभारणी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये १,५२,०००/-मात्रचे खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०५ संस्थानचे मौजे पांढूर्ली येथील पालखी थांब्याचे नुतनीकरणाचे कामाबाबत**

**प्रस्ताव-** संस्थानचे मौजे पांढुर्ली ता. सिन्नर येथे पदयात्री साईभक्तांचे निवासाकरीता पालखी थांबा उभारलेला आहे. भक्तांचे विश्रांतीसाठी उभारणेत आलेल्या मुख्य शेडची उंची जास्त असल्याने वादळी पावसात पाणी शेडमध्ये येऊन भक्तांची धावपळ व गैरसोय होते. करीता शेडला लांबीचे दोन बाजूस छतापासून खाली ५ फुट व शेडचे पाठीमागील रुंदीचे बाजूस सात फुटापर्यंत विट बांधकाम करुन उर्वरीत भागात टाटा ब्लुस्कोप शिट बसविणे, शेडमध्ये दोन रुम तयार करणे व शेडचे समोरील भागात पाथवेकरीता पेव्हींग ब्लॉक बसविणेचे काम इकडील जा.नं.३५८९ दि.०८/१०/२०११ चे कार्यादेशान्वये ठेकेदार एन.एस.बनकर पाटील इंजि., श्रीरामपूर यांना देणेत आलेले आहे. त्यानुसार ठेकेदार यांनी साईटवर बांधकाम साहित्य (वाळू, मुरुम) आणलेले आहे. दि.११/०५/२०१२ रोजीचे पत्रान्वये ठेकेदार यांनी सदर ठिकाणी दुष्काळी परिस्थितीमुळे जवळपास कुठेही पाणी उपलब्ध नाही. तसेच साईटवर असलेल्या संस्थानचे मालकीचे बोअरवेलला पाणी नसल्याने पाणी उपलब्ध झालेवर काम सुरु करता येईल, असे कळविले आहे.

सदर परिसरात सध्या पाणी उपलब्ध नाही व संस्थानचे बोअरवेललाही पाणी नाही त्यामुळे ठेकेदार यांनी कळविलेल्या अडचणींचा विचार करता पावसाळा ऋतुत भुजल पातळी वाढुन पाणी उपलब्ध झालेवर काम सुरु करणे योग्य होईल. तसेच पाणी उपलब्ध झालेनंतर ठेकेदार यांना काम सुरु करणेबाबत कळविता येईल व त्यापासून पुढे ठेकेदार यांचे कामाची (Date of Commencement) ग्राहय धरता येईल. त्यानंतर ठेकेदार यांनी त्यांचे मंजूर निविदादरात सदर काम पूर्ण करण्याचे अटीवरच याप्रमाणे मूदतवाढ देता येईल.

तरी उपरोक्त विषयांकित काम पाणी उपलब्ध झालेनंतर सुरु करणेस व त्यानुसार ठेकेदार यांचे कामाची Date of commencement ग्राहय धरणेस मा. त्रीसदस्य समितीचे सभेत प्रशासकीय मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.५७७ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देणेत आली.**(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०६** **मंदिर परिसरातील कापड कोठी विक्री काऊंटर रुमचे इंटेरिअर काम करणे बाबत**

**प्रस्ताव-** श्रींना अर्पण केलेल्या वस्तु व कापड यांची तसेच सोने चांदीचे नाणेंची विक्री कापड कोठी विक्री केंद्रावर केली जाते. सदर ठिकाणी श्रींचे वस्तुंची भक्तांना व्यवस्थीत माहिती व्हावी तसेच वस्तु ठेवणेकरीता आवश्यक अशी सोय उपलब्ध व्हावी याकरीता सुनियोजीत स्वरुपात इंटेरीअरचे काम करणे गरजेचे आहे. याबाबत लेखाशाखा विभागानेही मागणी केलेली आहे. याकरीता सोबतचे प्लॅन प्रमाणे खालील सुविधा करता येतील.

| अ.नं. | तपशिल/ साईज | परिमाण / एकक | खर्च |
|---|---|---|---|
| ०१ | कॅश व विक्री काउंटर (१०'X२'X४') | १० र.फुट | ४७,५०० |
| ०२ | सोने चांदीचे नाणे व आर्टिकल्स करीता शोकेस | १०२ चौ.फुट | १,६३,२०० |
| ०३ | कपडे ठेवणेकरीता शोकेस हँगरसह | १२३.२५ चौ.फुट | ८९३५६ |
| ०४ | स्टोअरेज | ३७.५० चौ.फुट | ४६,८७५ |
| ०५ | कपडे ठेवणेकरीता एस.एस. हँगर (Revolving) | २ नग | १५,००० |
| ०६ | ॲल्यु. ग्रीलसह लाकडी पार्टीशन | ७२ चौ.फुट | ३९,६०० |
| ०७ | ॲल्यु ग्रीलसह दरवाजा | ०१ नग | १५,५०० |
| ०८ | जिप्सम फॉल्ससिलींग | ३८१ चौ.फुट | ३२,२९० |
| ०९ | लस्टर पेंटचे रंगकाम | ६०० चौ.फुट | १०,८०० |
| | | **एकूण रुपये** | **४,६२,१२१** |

उपरोक्तप्रमाणे इंटरीअरचे फर्निचर तयार करेणकरीता अंदाजे रु.४,६२,१२१/- खर्च येईल. सदरचे काम इंटेरीअर फर्निचरचे काम करणारे ठेकेदार यांचेकडून विहीत पध्दतीने निविदा मागवून करुन घेता येईल.

तरी उपरोक्तप्रमाणे कापडकोठी विक्री काउंटर येथे इंटेरीअरचे फर्निचरचे काम करणेस येणारे अंदाजे रु.४,६२,१२१/- मात्रचे अपेक्षित खर्चास व सदरचे काम विहीत पध्दतीने निविदा मागवून करुन घेणेस मा. त्रीसदस्यीय समितीचे सभेत प्रशासकीय मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.५७८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मंदिर परिसरातील कापडकोठी विक्री काउंटर येथे इंटेरीअर फर्निचरचे काम विहीत पध्दतीने निविदा मागवून करुन घेणेस व याकामी येणारे अंदाजे रु.४,६२,१२१/- मात्रचे अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०७** **साईनगर जनरेटर कक्ष व धर्मशाळा जनरेटर कक्षालगत संडास बाथरुम बांधणे व पेव्हींग ब्लॉक बसविणे बाबत**

**प्रस्ताव-** संस्थानचे साईनगर मधील जनरेटर रुम व धर्मशाळा जनरेटर कक्षामधून रुग्णालयांना व निवासी इमारतींना वीज मंडळाकडून देण्यात येणारा वीजपुरवठा खंडीत झाल्यानंतर जनरेटरद्वारे पर्यायी वीजपुरवठा करणेत येतो. जनरेटरचा ब्रेकर ऑन झाला नाही, तर वीजपुरवठयात व्यत्यय येतो. याकरीता कर्मचाऱ्यांना पायाभूत सुविधा उपलब्ध व्हावी म्हणून धर्मशाळा जनरेटर कक्ष व साईनगर जनरेटर कक्षाचे परिसरात सोयीस्कर जागेत संडास बाथरुम बांधणे तसेच आजूबाजूचे भागाची लेव्हल जनरेटर कक्षाचे लेव्हलपेक्षा जास्त झाल्यामुळे सदर भागात भराई करून पेव्हिंग ब्लॉक बसविणेबाबत विद्यूत विभागाने दि.१६/०३/२०१२ व २७/०६/२०११ रोजीची टिपण्यांन्वये कळविले आहे.

उपरोक्तपैकी साईनगर जनरेटर कक्षाचे परिसरामध्ये पेव्हिंग ब्लॉक बसविणे कामाचा साईनगर इमारतीचे परिसरामध्ये पेव्हिंग ब्लॉक बसविणेचे कामामध्ये समावेश आहे. त्यानुसार ठेकेदार मे. एन. एस. बनकर पाटील ॲण्ड कंपनी, श्रीरामपूर यांचेकडुन पेव्हींग ब्लॉक बसविणेचे काम करणेत येत आहे.

उर्वरीत धर्मशाळा जनरेटर कक्षाचे परिसरात मुरुम भराई करणे,सोलींग करणे व सुमारे ३००० चौ. फुट पेव्हिंग ब्लॉक बसविणे तसेच दोन्हीही ठिकाणी प्रत्येकी एक टॉयलेट बांधणे व इतर अनुषंगिक कामांसाठी सोबतचे अंदाजपत्रकानुसार खालील प्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

१. धर्मशाळा जनरेटर कक्षाचे परिसरात पेव्हिंग ब्लॉक बसविणे : रु. २,८६,९६५/-
२. साईनगर व धर्मशाळा जनरेटररुमचे परिसरात प्रत्येकी एक टॉयलेट बांधणे : रु. १,००,४१७/-

एकूण : रु. ३,८७,३८२/-

तरी उपरोक्तप्रमाणे कामांसाठी येणारे रु.३,८७,३८२/- खर्चास व सदरचे काम विहीत पद्धतीने दरपत्रके / निविदा मागवुन करून घेणेस मा. त्रिसदस्य समितीचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५७९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे साईनगर जनरेटर कक्ष व धर्मशाळा जनरेटर कक्षालगत संडास बाथरुम बांधणे व पेव्हींग ब्लॉक बसविणे इत्यादी कामे विहीत पध्दतीने दरपत्रके/ निविदा मागवून करुन घेण्यास व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ३,८७,३८२/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं. ०८** **भारत संचार निगम लि.शिर्डी यांना Tower उभारणेसाठी संस्थानचे श्री साईबाबा भक्तनिवासस्थान आणि श्री साईबाबा धर्मशाळा परिसरात जागा देणे बाबत.**

**प्रस्ताव-** **(अ)** उप मंडळ अभियंता, भारत संचार निगम लि., शिर्डी यांनी दि. २२ नोव्हेंबर, २०१० रोजीचे पत्रान्वये श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) आणि श्री साईबाबा धर्मशाळा (२०० रुम) परिसर येथे भारत संचार निगम चे टॉवर उभारणेसाठी अनुक्रमे प्रत्येकी १०० चौरस मिटर मोकळी जागा अथवा श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) इमारत व श्री साईबाबा धर्मशाळा (२०० रुम) इमारतीचे टेरेसवर टॉवर उभारणेसाठी १०० चौरस फुट आणि त्याचे लगत रुमचे बांधकाम करणेसाठी १०० चौरस फुट जागा भाडेपट्ट्याने देणेसाठी विनंती केलेली होती.

उपरोक्त प्रमाणे मागणीबाबत, भारत संचार निगम लि., यांचेकडून इकडील दि. ०१/०१/२०११ चे पत्राने, टॉवर उभारणीकामी आवश्यक स्ट्रक्चरल डिझाईन, व संस्थान परिसरातील निश्‍चित कोणती जागा अपेक्षीत आहे याची माहिती मागविणेत आली होती.

याबाबत भारत संचार निगम लि., यांनी त्यांचेकडील दि. ०७ जून, २०११ रोजीचे पत्रान्वये, टॉवर उभारणीसाठी श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) आणि श्री साईबाबा धर्मशाळा (२०० रुम) परिसर येथे प्रत्येकी ठिकाणी १०० चौरस मिटर मोकळी जागा देणेसाठी विनंती केली असून, त्यासाठी आवश्यक भाडे भारत संचार निगम लि., देणेस तयार असल्याचे कळविले होते.

भारत संचार निगम लि., याचा उपरोक्त प्रस्ताव तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २४ जुलै, २०११ रोजीचे सभेत निर्णयार्थ सादर करणेत आला होता. त्यावर निर्णय क्र. ५३६ अन्वये, "सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा, असे ठरले." असा निर्णय झालेला आहे. सोबत, सदरहू निर्णयाची प्रत माहितीस्तव जोडली आहे.

**(ब)** **आता,** पुनः्श्च उप मंडळ अभियंता, भारत संचार निगम लि., शिर्डी यांनी त्यांचेकडील दि. २३.०६.२०१२ रोजीचे पत्राने मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचे समवेत सदरहू प्रकरणी चर्चा केली असून, संस्थान परिसरातील खालील ठिकाणी जागा मिळणेबाबत विनंती केली आहे.

०१. श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) इमारतीचे पूर्वेस ओव्हर हेड टॅन्कचे पूर्वेस अथवा ओव्हर हेड टॅन्कचे पश्‍चिमेस

०२. श्री साईनाथ रुग्णालयाचे (धर्मशाळा क्र. ०२ चे) पश्‍चिमेस म्हणजचे आकाशवाणी केंद्राचे टॉवरसाठी दिलेल्या जागेच्या उत्तरेस

उपरोक्त दोन्ही ठिकाणी १०० चौरस मिटर मोकळी जागा अथवा उपरोक्त इमारतींचे टेरेसवर १०फुट x१०फुट जागा अधिक त्याच ठिकाणी टेरेसवर १०फुट x१०फुट आकाराची खोली देणेसाठी विनंती केली आहे. "

**(क)** थोडक्यात, भारत संचार निगम लि., शिर्डी यांनी मोबाईल / दुरध्वनी टॉवर्स उभारणेसाठी संस्थान मालकीच्या जमिनी / जागा भाडेपट्ट्याने मिळाव्यात म्हणून विनंती केलेली आहे. तथपि, "श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील समितीची व कर्तव्ये व अधिकार या मधील कलम १७ (३) मध्ये " विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता, राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजुरीने असेल त्याखेरीज समितीकडून, एका वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता, भाडेपट्ट्याने देण्यात येणार नाही. किंवा गहान टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्यसंक्रामित करण्यात येणार नाही." असे नमूद केलेले आहे.

या तरतुदीनुसार भारत संचार निगम लि., यांना जागा उपलब्ध करुन द्यावयाची झाल्यास, त्यासाठी सदरचा प्रस्ताव मा. शासनाचे मान्यतेस्तव सादर करणे आवश्यक राहील.

तरी भारत संचार निगम लि., शिर्डी यांना टॉवर उभारणीसाठी श्री साईबाबा भक्तनिवासस्थान आणि धर्मशाळा परिसरामध्ये प्रत्येकी अनुक्रमे १०० चौ. मिटर जागा उपलब्ध करुन देणेत यावी किंवा कसे याबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५८०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, भारत संचार निगम लि.,शिर्डी यांना टॉवर उभारणीसाठी श्री साईबाबा भक्तनिवासस्थान आणि धर्मशाळा परिसरामध्ये जागा उपलब्ध करुन देणेबाबत उप मंडळ अभियंता, भारत संचार निगम लि., शिर्डी यांनी केलेली विनंती अमान्य करण्यात आली.**(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०९** **श्री साईबाबा हॉस्पिटलचे पॅथॉलॉजी विभागास कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने सिनि.लॅब टेक्निशियन घेणे बाबत**

**प्रस्ताव-** पॅथॉलॉजी विभागाचे दि. २९/०१/२०११ व दि. १०/१०/२०११ रोजीचे पत्र.पॅथॉलॉजी विभाग प्रमुख यांनी दि. २९/०१/२०११ व दि. १०/१०/२०११ रोजीचे पत्राअन्वये ०४ सिनि. लॅब टेक्निशियनची मागणी केलेली आहे. सध्या या विभागासाठी आकृतीबंधामध्ये सिनी. लॅब टेक्निशियनची ६ पदे मंजूर असून, सदरची ०६ पदे स्थायी व ०२ कंत्राटी पध्दतीने असे एकूण ०८ सि. टेक्निशियन कार्यरत आहे.

आकृतीबंधानुसार सिनि. लॅब टेक्निशियन या पदासाठी मंजूर असलेली संख्या व सध्या कार्यरत असलेल्या कर्मचारी यांचा गोषवारा थोडक्यात खालीलप्रमाणे आहे.

| विभागाचे नाव | पदाचे नाव | प्रस्तावित शैक्षणिक पात्रता | मंजुर पदे | भरलेली पदे (कायम) | कंत्राटी | रिक्त पदे | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| पॅथॉलॉजी विभाग श्री साईबाबा हॉस्पिटल | सिनी. लॅब टेक्निशियन | 1) Age not more than 33 yrs. 2) B.Sc. (Microbiology) with D M L T / B.M. Tech. of an institute recognized by the govt. 3) MS-CIT or govt. prescribed equivalent computer operating course. 4) Experience min 5 yrs. As Lab Technician in any renowed hospital. | ०६ | ०६ | ०२ | -०२ | मंजूर ०६ पदाव्यतिरिक्त ०२ कंत्राटी टेक्निशियन असून एकूण ०८ टेक्निशियन सध्या कार्यरत आहे. |

श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये रुग्णांना चांगली सेवा पुरविण्यात येत असल्याने रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांची संख्येत दरवर्षी वाढ होत आहे. त्याचा एप्रिल २००६ ते मार्च २०१२ या कालावधीची तपशीलवार आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.

| Sr. No. | Details | April 06-March 07 | April 07-March 08 | April 08-March 09 | April 09-March 10 | April 10-March 11 | April 11-March 12 |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | **O P D** | 20209 | 48675 | 57819 | 66025 | 102478 | 130105 |
| 2 | **I P D** | 4466 | 9894 | 11068 | 12395 | 13489 | 15533 |
| 3 | **SURGERIES** | 962 | 1523 | 2294 | 3351 | 3625 | 4503 |
| 4 | **CATH LAB** | 1348 | 3220 | 4647 | 4915 | 5482 | 7332 |
| 5 | **CVTS** | 220 | 594 | 777 | 1026 | 1216 | 1491 |
| 6 | **DIAGNOSTICS** | 75281 | 191445 | 235115 | 304007 | 322209 | 400973 |

पॅथॉलॉजी विभागामध्ये हिस्टोपॅथ, ब्लड, मायक्रो बायोलॉजी संबंधीत विविध तपासण्या केल्या जातात. पूर्वीच्या तुलनेत या तपासण्यांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे-

| Sr. No. | Details | April 06-March 07 | April 07-March 08 | April 08-March 09 | April 09-March 10 | April 10-March 11 | April 11-March 12 |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **1** | **LAB TEST** | **60355** | **155778** | **188955** | **246188** | **253386** | **313642** |

उपरोक्त तक्त्यात नमूद केलेप्रमाणे श्री साईबाबा हॉस्पीटल सुरु झालेपासून हॉस्पीटलमध्ये उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांच्या संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याने रुग्णालयाचे सर्वच विभागांचे कामकाज मोठ्या प्रमाणात वाढलेले आहे. विविध उपचारादरम्यान लॅबोरेटरी विभागात करावयाच्या तपासण्यांमध्येही मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याने पूर्वीचा मंजूर असलेला स्टाफ सध्या कमी पडत आहे. पॅथॉलॉजी विभाग प्रमुख यांनी ०४ सिनि. लॅब टेक्निशियनची मागणी केलेली असून, सदर कर्मचारी पुरविणेबाबत वैद्यकिय संचालक यांनी शिफारस केली आहे.

आकृतीबंधामध्ये सिनी. लॅब टेक्निशियनची ६ पदे मंजूर असून, सदरची ०६ पदे स्थायी व ०२ कंत्राटी पध्दतीने असे एकूण ०८ सि. टेक्निशियन कार्यरत आहे.सदर पदाची बीएस्सी मायक्राबॉयलॉजी +डी.एम.एल.टी/बी.एम.टेक ही प्रस्तावित शैक्षणिक पात्रता आहे. परंतू, वैद्यकीय संचालक यांनी बी.एसस्सी +मान्यताप्राप्त विद्यापीठाचा डी.एम.एल.टी डिप्लोमा अशी शैक्षणिक पात्रता असलेले उमेदवार घेण्यात यावे असे सुचविले आहे.

तरी वैद्यकीय संचालक यांनी सुचविलेनुसार व शिफारस केलेनुसार श्री साईबाबा हॉस्पिटलकडील पॅथॉलॉजी विभागाचे दैनंदिन कामकाजासाठी ४ सिनिअर लॅबटेक्नेशियन कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने घेणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५८१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पीटलचे पॅथॉलॉजी विभागास दैनंदिन कामकाजासाठी वैद्यकीय संचालक यांनी सुचविलेनुसार बी.एसस्सी +मान्यताप्राप्त विद्यापीठाचा डी.एम.एल.टी डिप्लोमा अशी शैक्षणिक पात्रता असलेले ०४ सिनी लॅब टेक्निशियन कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने घेणेत यावे असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.१०** **श्री साईनाथ रुग्णालयाचे श्री साईनाथ रक्तपेढीस रक्तपेढी सहाय्यक तंत्रज्ञ कंत्राटी पध्दतीने घेणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रक्तपेढी सन २००० मध्ये सुरु झाले पासून श्री साईनाथ रुग्णालय, श्री साईबाबा रुग्णालय तसेच परिसरातील अनेक रुग्णांना आवश्यक रक्ताची गरज भागवत आहे. दिवसेंदिवस रस्ते अपघातात होणारी वाढ व त्या अनुषंगाने रक्ताच्या मागणीत झालेली वाढ, श्री साईबाबा रुग्णालयातील नवीन ऑपरेशन थिएटर व हृदय शस्त्रक्रियायांची वाढती संख्या बघता रक्त मागणी मध्ये लक्षणीय वाढ झालेली आहे. प्रत्येक शस्त्रक्रियेसाठी साधारणतः ४ ते ६ रक्त पिशव्या लागतात. त्यामुळे रक्ताची मागणी सातत्याने वाढत आहे.

सन २००० ते २०११ या कालावधीत ब्लड कलेक्ट करुन वितरीत करण्यात आलेल्या रक्त पिशव्यांची आकडेवारी खालीलप्रमाणे-

| Year | Blood Collection | Blood Issued | | |
|---|---|---|---|---|
| | | WHB | COMPO. | Total |
| 2000 | 189 | 110 | 25 | 135 |
| 2001 | 1585 | 572 | 1057 | 1630 |
| 2002 | 1955 | 812 | 1667 | 2479 |
| 2003 | 2115 | 1445 | 1079 | 2524 |
| 2004 | 2911 | 2106 | 865 | 2971 |
| 2005 | 3014 | 2096 | 1201 | 3296 |
| 2006 | 4185 | 3132 | 1582 | 4714 |
| 2007 | 7293 | 5552 | 3026 | 8578 |
| 2008 | 7860 | 5510 | 4514 | 10024 |
| 2009 | 7959 | 5109 | 6071 | 11180 |
| 2010 | 8118 | 5879 | 4454 | 10333 |
| 2011 | 9936 | 7366 | 4749 | 12115 |
| Total | 57120 | 39689 | 30290 | 69979 |

२००६ साली रक्त संकलन ४००० व ब्लड इश्यु ५००० होते. २०११ साली रक्त संकलन १०,००० व ब्लड इश्यु १२,००० च्या पुढे गेले आहे. परंतु त्या तुलनेने स्टाफ वाढलेला नाही. ब्लड संबंधीत कामकाज सुरळीत व व्यवस्थीत चालणेसाठी आणखी ३ सहाय्यक तंत्रज्ञ मिळणेस रक्त पेढी विभागाने दि. ०८/०२/२०१२ रोजीचे टिपणीअन्वये मागणी केली आहे. सदर सहाय्यक तंत्रज्ञ पुरविणेबाबत वैद्यकिय संचालक यांनी शिफारस केली आहे.

सहाय्यक तंत्रज्ञ या पदाचे आकृतीबंधानुसार मंजूर पदे, शैक्षणिक पात्रता, भरलेली पदे व आवश्यक पदे आदि. बाबत माहिती खालील प्रमाणे आहेत.

| विभागाचे नाव | पदाचे नाव | प्रस्तावित शैक्षणिक पात्रता | मंजुर पदे | भरलेली पदे (कायम) | भरलेली पदे कंत्राटी | रिक्त पदे | आवश्यक पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| श्री साईनाथ रुग्णालय रक्त पेढी विभाग | Blood Bank Assistant (रक्तपेढी सहाय्यक) | 1) Age not more 33 yrs.<br>2) H.S.C+ D M L T from any recognized university/ institute.<br>3) similar experience min 3 yrs. | ०६ | ०० | ०० | ०६ | **०३** |

उपरोक्तप्रमाणे रक्तपेढी विभागासाठी सहाय्यक तंत्रज्ञ या पदाच्या ०६ जागा मंजूर असून या सर्व जागा रिक्त आहे.

तरी, वैद्यकिय संचालक यांचे शिफारसीनुसार श्री साईनाथ रुग्णालयातील रक्तपेढी विभागास एच.एस.सी.+ मान्यता प्राप्त विद्यापिठ, संस्थेचे डी एम एल टी ही शैक्षणिक पात्रता असलेले ०३ सहाय्यक तंत्रज्ञ कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने घेणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५८२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, वैद्यकिय संचालक यांचे शिफारसीनुसार श्री साईनाथ रुग्णालयातील रक्तपेढी विभागास एच.एस.सी.+ मान्यता प्राप्त विद्यापिठ, संस्थेचे डी एम एल टी ही शैक्षणिक पात्रता असलेले ०३ सहाय्यक तंत्रज्ञ कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने घेणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.११** **श्री साईनाथ रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक हे पद जाहिरातीव्दारे भरणे बाबत**

**प्रस्ताव-** वैद्यकीय अधिक्षक, श्री साईनाथ रुग्णालय या पदावर दि. १३/१०/२०१० रोजीचे जाहीरातीस अनुसरुन डॉ. एम आर घोरपडे यांची रु. ५०,०००/- (अक्षरी रुपये पन्नास हजार मात्र ) मानधनावर नेमणूक करण्यात आली होती. दि. २४/०९/२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ७६० नुसार डॉ महादेव रामचंद्र घोरपडे, वैद्यकीय अधिक्षक यांना १ महिना नोटीस पे देवुन दि. ०९/११/११ पासून सेवा मुक्त करणेत आलेले आहे.

सध्या रुग्णालयाचे अंतर्गत कामकाजाच्या सोईच्या दृष्टीने पुढील आदेश होईपावेतो श्री साईनाथ रुग्णालयाकडील वैद्यकिय अधिक्षक या पदाचे कामकाज डॉ. संजय किसन पठारे, सी.एम.ओ., श्री साईबाबा हॉस्पिटल यांचेकडे देण्यात आलेले आहे.

श्री साईनाथ रुग्णालयाचे आकृतीबंधामध्ये वैद्यकीय अधिक्षक हे एक पद मंजूर असून या पदाची शैक्षणिक पात्रता, वेतनश्रेणी, अनुभव व वयोमर्यादा पुढीलप्रमाणे प्रस्तावित केली आहे.

| पदाचे नाव | मंजुर पदसंख्या | आवश्यक पात्रता | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|
| वैद्यकीय अधिक्षक | ०१ | १) वयोमर्यादा ४५ वर्ष<br>२) एमबीबीएस<br>३) डी एच ए /एम एच ए/एम फील इन हॉस्पिटल मॅनेजमेंट<br>४) संबंधित कामकाजाचा / पदाचा किमान ५ वर्ष अनुभव | १५६००-३९१००<br>ग्रेड पे ६६०० |

तरी वैद्यकीय अधिक्षक हे पद वर्तमान पत्रांत तसेच संस्थान वेबसाईटवर जाहीरात देवुन भरणेस व त्याकामी जाहीरातीस येणारे खर्चास मान्यता असावी, ही विनंती.

**निर्णय क्र.५८३ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयाकरीता वैद्यकीय संचालक,उपवैद्यकीय संचालक व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता वैद्यकीय अधिक्षक ही पदे वर्तमानपत्रांत तसेच संस्थान वेबसाईटवर जाहीरात देवून भरणेस व त्याकामी जाहीरातीस येणारे खर्चास मान्यता देण्यात आली.**(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.१२ श्री साईबाबा रुग्णालयातील GICU विभागासाठी CNS (Central nursing station) खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयातील GICU विभागासाठी सन २००५ मध्ये CNS (Central Nursing Station) खरेदी करुन कार्यान्वित करण्यात आलेली होती सदर CNS (Central Nursing Station) वर क्रिटीकल रुग्णांचा ब्लडप्रेशर हार्टरेट व इतर सर्व बाबी मॉनिटरींग केल्या जातात. सध्या GICU विभागाकडे असलेला ८ बेडचा CNS (Central Nursing Station) MCH-०२८३ हे सन २००५ मध्ये रक्कम रु.१,२५,०००/- इतक्या रक्कमेत खरेदी करण्यात आलेले अूसन ते आतापर्यंत दोन वेळेस दुरुस्त करुन घेण्यात आलेले असून सदर सिस्टीमचा PC व Windows सन १९९८ मधील Version च्या असून त्या दुरुस्त करण्यासाठी लागणारे स्पेअर पार्ट बाजारामध्ये व कंपनीच्या स्टोअर्समध्ये देखील उपलब्ध नाही त्यामुळे उपरोक्त सिस्टीम सध्या दुरुस्त होऊ शकत नाही. तसेच श्री साईबाबा रुग्णालयातील EDP विभाग हा देखील सदर सिस्टीम दुरुस्त करु शकत नाही. त्यामुळे ती सध्या Working Condition मध्ये नाही.

सदर CNS (Central Nursing Station) हा Working Condition मध्ये नसल्यामुळे डॉक्टरांना रुग्णांचे मॉनीटर प्रत्येक वेळेस कॉट जवळ जाऊन समक्ष करावे लागते. त्यामुळे दैनंदिन कामाची व रुग्णांची गैरसोय होत आहे. त्यामुळे GICU विभागाने एक CNS (Central Nursing Station) ची दि.१७/०४/२०१२ चे मागणी पत्रान्वये मागणी केलेली आहे. त्यावर रुग्णालयाचे बायोमेडीकल विभागाने ८ बेडचा किंवा १६ बेडचा मॉनीटर घेण्याबाबत शिफारस केलेली आहे. सध्या GICU मध्ये एकूण (तातडीचे दोन बेड धरुन) १२ बेड आहे परंतु १२ बेडचा CNS येत नाही. ८ किंवा ८ च्या पटीत म्हणजे १६ बेडचा येतो. ८ बेडची किंमत रु.२,१०,०००/- आहे तर १६ बेडची किंमत रु.२,६०,०००/- आहे म्हणजेच आर्थिक दृष्ट्या १६ बेडचा CNS घेणे फायदेशीर राहिल शिवाय भविष्यात बेडची संख्या वाढविल्यास तेथे देखील त्याचा फायदा होऊ शकेल.

GICU विभागामध्ये L & T कंपनीचे मॉनिटर असल्यामुळे L & T कंपनीचाच CNS - १६ Bed चा घ्यावा लागणार आहे. L & T कंपनीचे मॉनिटर साठी दुसऱ्या कंपनीचे CNS Compatible होत नाही. त्यामुळे सदरचे CNS खरेदीकामी अंदाजे खर्चासाठी L & T कंपनीचे अधिकृत विक्रेते मे.एक्सल कार्पोरेशन, नाशिक यांच्याकडे दराबाबत चौकशी केली असता त्यांनी १६ Bed चे एक CNS करीता अंदाजे रु.२,६०,०००/- इतका खर्च येईल असे कळविले आहे.

त्यानुसार श्री साईबाबा हॉस्पिटलमधील GICU विभागाकरीता लागणारे एक नग CNS (Central Nursing Station) L & T कंपनीचेच घ्यावे लागणार असल्याने थेट उत्पादक कंपनी L & T, Pune यांचेकडून कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.२,६०,०००/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.५८४ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे श्री साईबाबा रुग्णालयातील GICU विभागासाठी CNS (Central nursing station) कंपनीचे थेट उत्पादक कंपनी L & T, Pune यांचेकडून कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.२,६०,०००/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.१३ सन २०११-१२ मधील वार्षिक खरेदीमधील औषधे, सूचर्स व लॅब केकिल्सचे अतिरिक्त खरेदीबाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात दैनंदिन वापरासाठी लागणाऱ्या खालील औषधे, सुचर्स व लॅब केमिकल करीता सन २०११-२०१२ या वर्षाकरीता वार्षिक निविदेतील मंजूर दराने पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr. No. | Description | Name of Supplier | P.O.No. & Date | Make | Brand Name | Packing | Qty. | Sanctioned Rate Per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Alkaline Phosphate 10*5.5ml Auto Kit | Transasia Bio-Medicals Ltd., Mumbai | 3213 24/09/2011 | ERBA | | 6*6ML | 95 | 397.5124 | 37763.68 |
| 2 | C.T.SCAN FILMS 35 / 43CM 125 FILMS PACKET. ( 14" X 17") DEMAND IN PKT. | Universal Distributors, Pune | 3220 24/09/2011 | CARESTREAM | KODAK | 125 FILMS | 400 | 11598.0000 | 4639200.00 |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | HEAL TH INC. | | | | | |
| 3 | X-RAY FILM SIZE 8" X 10 " PKT (50 FILMS) | | | Anita Medical Systems Pvt. Ltd., Mumbai | 3110 24/09/2011 | FUJI | FUJI HRU FILM (GREEN BASE) | 50 SH | 50 | 805.5000 | 40275.00 |
| 4 | TAB. VOGLIBASE 0.3 | | | Keps Pharma, Mumbai | 3158 24/09/2011 | ABBOTT HEALTHCARE | PPG 0.3 | | 10000 | 2.8570 | 28570.43 |
| 5 | TAB. TELMISARTAN 40MG + AMLODEPINE BESYLATE 5MG | | | Alkem Laboratories Ltd, Mumbai | 3108 24/09/2011 | ALKEM | T SART AM | 10T | 2000 | 2.2985 | 4596.90 |
| 6 | I.C.D.BAGS | | | Kanchan Drugs Pvt.Ltd., Pune | 3152 24/09/2011 | ROMSON | | | 100 | 24.7005 | 2470.05 |
| 7 | TUBING SET PAEDIATRIC WITH CONNECTION | | | Critical Care Systems, Pune | 3124 24/09/2011 | LIFE LINE | | | 100 | 2248.4385 | 224843.85 |
| | **Code** | **Sutue** | **Specification** | | | **Make** | **Brand Name** | **Box Packing** | **Qty. (Demand in Box)** | **Rate per in Rs Incl. All Taxes** | **Total Amt. in Rs.** |
| 8 | VP2421 | Vicry Plus 1 | 40mm,1/2 Circle Reverse Cutting O.S. Antibacterial, 90cm | Johnson & Johnson Limited, Mumbai (Ethicon Division) | 3147 24/09/2011 | | | 12 FOILS / BOX | 10 | 3282.3549 | 32823.55 |
| 9 | NW2304 | Vicry 4-0 | 20mm, 1/2 circle Round Body, 70cm | | | | VICRYL PLUS | 12 FOILS / BOX | 5 | 1873.9512 | 9369.76 |
| 10 | VP2357 | Vicry Plus 2-0 | 40mm, 1/2 Circle Round Body, Antibacterial, 90cm | | | | | 12 FOILS /BOX | 5 | 3111.8175 | 15559.09 |
| 11 | NW2328 | Vicry 3-0 | 25mm 3/8 Circle Cutting Body 90cm Undied | | | | | 12 FOILS / BOX | 5 | 2496.3147 | 12481.57 |
| 12 | EH395 | | Unsterile Sternum Band | | | | | 12 FOILS / BOX | 5 | 10096.0101 | 50480.05 |
| 13 | VP2437 | Vicry Plus 3-0 | 20mm, 1/2 Circle Round body, Antibacterial,90cm | | | | | 12 FOILS / BOX | 5 | 1985.6826 | 9928.41 |
| 14 | NW4259 | CHR Catgt No. 1 | 1/2 Circle Round Body Heavy, 40mm | | | | 76CM | 12 FOILS / BOX | 10 | 769.3785 | 7693.79 |
| | | | | | | | **Total Amt. in Rs.-** | | | | **5116056.13** |

त्यानुसार पुरवठा आदेशाप्रमाणे मालाचा पुरवठा पुर्ण झालेला आहे. रुग्णांचे दररोजच्या वाढलेल्या संख्येमुळे सध्या सदरचे औषधे, सुचर्स व लॅब केमिकलचा औषध भांडारात साठा शिल्लक नाही व सदरचे औषधे, सुचर्स व लॅब केमिकल्स दैनंदिन वापरासाठी आवश्यक आहे. त्यामुळे तुर्तास तीन ते चार महिने पुरु शकेल इतका साठा खरेदी करावा लागणार आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr. No. | Description | Name of Supplier | P.O.No. & Date | Make | Brand Name | Packing | Qty | Sanctioned Rate Per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Alkaline Phosphate 10*5.5ml Auto Kit | Transasia Bio-Medicals Ltd., Mumbai | 3213 24/09/2011 | ERBA | | 6*6ML | 40 | 397.5124 | 15900.50 |
| 2 | C.T.SCAN FILMS 35 / 43CM 125 FILMS PACKET. ( 14" X 17") DEMAND IN PKT. | Universal Distributors, Pune | 3220 24/09/2011 | CARESTEARM HEALTH INC. | KODAK | 125 FILMS | 40 | 11598.0000 | 463920.00 |
| 3 | X-RAY FILM SIZE 8" X 10 " PKT (50 FILMS) | Anita Medical Systems Pvt. Ltd., Mumbai | 3110 24/09/2011 | FUJI | FUJI HRU FILM (GREEN BASE) | 50 SH | 5 | 805.5000 | 4027.50 |
| 4 | TAB. VOGLIBASE 0.3 | Keps Pharma, Mumbai | 3158 24/09/2011 | ABBOTT HEALTH | PPG 0.3 | | 3000 | 2.8570 | 8571.00 |
| 5 | TAB. TELMISARTAN 40MG + AMLODEPINE BESYLATE 5MG | Alkem Laboratories Ltd, Mumbai | 3108 24/09/2011 | ALKEM | T SART AM | 10T | 2000 | 2.2985 | 4597.00 |
| 6 | I.C.D.BAGS | Kanchan Drugs Pvt.Ltd., Pune | 3152 24/09/2011 | ROMSON | | | 50 | 24.7005 | 1235.03 |
| 7 | TUBING SET PAEDIATRIC WITH CONNECTION | Critical Care Systems, Pune | 3124 24/09/2011 | LIFE LINE | | | 30 | 2248.4385 | 67453.16 |

| | Code | Suture | Specification | Name of Supplier | P.O.No. & Date | Make | Brand Name | Box Packing | Qty. (Demand in Box) | Rate per in Rs Incl. All Taxes | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | VP2421 | Vicryl Plus 1 | 40mm,1/2 Circle Reverse Cutting O.S. Antibacterial, 90cm | Johnson & Johnson Limited, Mumbai (Ethicon Division) | 3147 24/09/2011 | | | 12 FOILS / BOX | 6 | 3282.3549 | 19694.13 |
| 9 | NW2304 | Vicryl 4-0 | 20mm, 1/2 circle Round Body, 70cm | | | | VICRYL PLUS | 12 FOILS / BOX | 2 | 1873.9512 | 3747.90 |
| 10 | VP2357 | Vicryl Plus 2-0 | 40mm, 1/2 Circle Round Body, Antibacterial, 90cm | | | | | 12 FOILS /BOX | 2 | 3111.8175 | 6223.64 |
| 11 | NW2328 | Vicryl 3-0 | 25mm 3/8 Circle Cutting Body 90cm Undied | | | | | 12 FOILS / BOX | 2 | 2496.3147 | 4992.63 |
| 12 | EH395 | | Unsterile Sternum Band | | | | | 12 FOILS / BOX | 1 | 10096.0101 | 10096.01 |
| 13 | VP2437 | Vicryl Plus 3-0 | 20mm, 1/2 Circle Round body, Antibacterial, 90cm | | | | | 12 FOILS / BOX | 8 | 1985.6826 | 15885.46 |
| 14 | NW4259 | CHR. Catgut No. 1 | 1/2 Circle Round Body Heavy, 40mm | | | | 76CM | 12 FOILS / BOX | 5 | 769.3785 | 3846.89 |
| | | | | | | | Total Amt. in Rs.- | | | | 630190.85 |

वरीलप्रमाणे औषधे, सुचर्स व लॅब केमिकल वार्षिक मंजुर दरानुसार सदरचे खरेदीकामी रु. ६३०१९०.८५ इतका खर्च येणार आहे. मा. व्यवस्थापन समिती सभा दि.२४/०९/२०११ निर्णय क्रमांक ६७५ Clause No.६ अन्वये मागणी केलेल्या औषधांच्या साठ्यापैकी काही औषधांची अतिरिक्त मागणी करावयाची असल्यास ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने खरेदी करुन रु. २५,०००/- पेक्षा अधिक रक्कमेच्या औषधांची मागणी करावयाची झाल्यास दैनंदिन कामाची गैरसोय होऊ नये, म्हणून ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे मंजुरीने खरेदी करुन केवळ नोंद घेण्यासाठी / माहितीस्तव मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे नोंद घेण्यासाठी सादर करण्यात यावे, असे ठरले आहे. सदर निर्णयानुसार सदरचे खरेदीकामी रु.२५,०००/- पेक्षा जास्त खर्च येणार आहे.

तरी औषधे, सुचर्स व लॅब केमिकल वरीलप्रमाणे वार्षिक मंजुर दराने खरेदीस व याकामी येणाऱ्या रु. ६३०१९१/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.५८५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे सन २०११-१२ मधील वार्षिक खरेदीमधील औषधे, सूचर्स व लॅब केमिकल्सचे वार्षिक मंजुर दराने खरेदीस व याकामी येणाऱ्या रु. ६३०१९१/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.१४** **श्री साईबाबा रुग्णालयाकरीता मंजूर दराने लिनन खरेदी बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता मा.व्यवस्थापन सभा दिनांक १०/१०/२०१० चे निर्णय क्र.७५५ अन्वये लिनन खरेदी करण्यात आले आहे. सदर लिनन खरेदीकरीता इकडील पत्र क्र.६१३६ दि.१०/०१/२०११ अन्वये मे.केसीएम इंटरनॅशनल,जयपुर यांना पुरवठा आदेश देण्यात आलेला होता त्यानुसार त्यांनी पुरवठा केलेला आहे व सध्या ते लिनन वापरात आहे.

सदर लिनन वापरुन एक वर्ष झाले आहे. लिनन विभागात त्यांचेकडुन घेतलेले काही लिनन कमी पडत आहे सदर लिनन त्यांचेकडुन मंजुर दराने खरेदी केल्यास पुढील एक वर्षासाठी लिनन खरेदी करावे लागणार नाही, कारण इतर लिननचा साठा अजुन शिल्लक आहे त्यामुळे सदर खरेदीपैकी फक्त आवश्यक असणाऱ्या लिननची मागणी केलेली आहे त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | तपशील | लिनन विभागातील शिल्लक साठा | आवश्यक मागणी | मंजुर दर रु./पै | एकुण खर्च रु/पै |
|---|---|---|---|---|---|
| १ | ड्रॉ शीट | ९५ नग | ४०० | ११८.१३ | ४७,२५२.०० |
| २ | पेशंट ड्रेस | ४५ नग | ५०० | २४५.७० | १,२२,८५०.०० |
| ३ | ओ.टी.असिस्टंट ड्रेस | २१ नग | १५० | २०७.९० | ३१,१८५.०० |
| ४ | सर्जन गाऊन | २४६ नग | २०० | २२६.८० | ४५,३६०.०० |
| | | | | एकुण रु. | २,४६,६४७.०० |

उपरोक्तप्रमाणे खरेदीस रु.२,४६,६४७/- खर्च अपेक्षीत आहे. तरी सदरचे लिनन मे.केसीएम इंटरनॅशनल, जयपुर यांचेकडुन मंजुर दराने खरेदी करणेस मान्यता असावी. अथवा कोटेशन, निविदा मागवून खरेदी करणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.५८६ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे लिनन मे.केसीएम इंटरनॅशनल, जयपुर यांचेकडुन मंजुर दराने खरेदी करणेस व याकामी येणारे रक्कम रुपये रु.२,४६,६४७/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

-----------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.१५ श्री साईबाबा रुग्णालयातील कॅथलॅब विभागात वर्कशॉप करीता तातडीने केलेल्या बलूनचे खरेदीस व खर्चास मंजूरी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयातील कॅथलॅब विभागात Complex Angioplasty च्या शस्त्रक्रिया करणे कामी दि.१३/०२/२०१२ रोजी पुणे येथील नामवंत कार्डीयोलॉजिस्ट डॉ. हिरेमठ यांचे मार्गदर्शनाखाली वर्कशॉप आयोजित करण्यात आले होते. सदर वर्कशॉप करीता लागणाऱ्या साहित्याची डॉ. वर्मा यांनी मागणी केलेली होती. सदर वर्कशॉपमध्ये Complex Angioplasty च्या शस्त्रक्रिया केलेल्या आहेत. त्यामध्ये विशिष्ट प्रकारचे Mini Trek RX बलून वापरुन जास्तीत जास्त जाडीचा ब्लॉक काढला जातो. सदर वर्कशॉपमध्ये दोन रुग्णांवर शस्त्रक्रिया करण्यात आलेली आहे. त्यांच्या शस्त्रक्रियेसाठी लागणारे बलून आपणाकडे उपलब्ध नव्हते त्यामुळे ते तातडीने खरेदी करुन वापरण्यात आलेले आहे.

त्याचा तपशील खालील प्रमाणे-

| अ.नं. | पेशंटचे नाव | शस्त्रक्रियेची दिनांक | नग संख्या | वापरणारे डॉक्टरांचे नाव | आय.पी.डी. नंबर |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. सै नूर सै बिसमिल्ला बागबान | १३/०२/२०१२ | १ | डॉ. वर्मा | ६२२१७ |
| २ | श्री. राजकुमार भिमराव हुसे | १३/०२/२०१२ | २ | डॉ. वर्मा | ६२१९७ |

सदर Balloon करीता वार्षीक खरेदीमध्ये On Consignment Basis वर पुरवठा आदेश देण्यात आलेला नाही. परंतू मा. व्यवस्थापन समिती सभा दि.२८/०७/२००७ निर्णय क्र.५३३ अन्वये रुग्णालयामध्ये लागणारे विविध प्रकारचे व विविध साईजचे तसेच नविन प्रकारचे व नविन कंपन्याचे स्टेन्ट, व्हाल्व, बलून, पेसमेकर आदी तत्सम साहित्य जर रुग्णांना बसविण्याची गरज असेल तर ती वैद्यकिय संचालक यांनी संबंधित डॉक्टर यांचेशी विचार विनिमय करुन वैद्यकिय संचालक यांनी रुग्णालयात On Consignment Basis वर बाजारातून खरेदी करुन वापरलेल्या साहित्याचे बील संबंधितास अदा करण्यात यावे, असे ठरले आहे. उपरोक्त शिबीरासाठी लागणारे सदर बलून M/s. Shivam Trading Co., Mumbai यांचेकडून खरेदी करण्यात आलेले आहे. त्यासाठी रु.४७२५०/- मात्र खर्च आलेला आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे -

| Sr. No. | Name of Party | Qty. | Bill No. | Date | Rate Per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | M/s. Shivam Trading Co., Mumbai | 1 | 1618 | 30/04/2012 | 15750.00 | 15750.00 |
| 2 | M/s. Shivam Trading Co., Mumbai | 2 | 1619 | 30/04/2012 | 15750.00 | 31500.00 |
| | | | 1620 | 30/04/2012 | 15750.00 | |
| | | | Total Amt. in Rs. | | | 47250.00 |

उपरोक्त रुग्णांना सदर बलून (Mini Trek RX (Voyager) वापरुन जीवनदायी योजने अंतर्गत जास्तीत जास्त जाडीचा ब्लॉक काढण्याच्या शस्त्रक्रियेकरीता महाराष्ट्र शासनाचे उप संचालक, आरोग्य सेवा नाशिक यांच्या कार्यालयाकडून मंजुरी मिळालेली असून त्यांच्या खर्चाचा तपशील खालील प्रमाणे -

| अ. नं. | रुग्णाचे नाव | जीवनदायी योजनेची मंजूरी | शस्त्रक्रियेसाठी झालेला खर्च रक्कम रु. | जीवनदायी योजने अंतर्गत मंजूर रक्कम रु. | रुग्णाने जमा केलेली रक्कम रु. | रुग्णालयाने दिलेली सूट रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. सै नूर सै बिसमिल्ला बागबान | महाराष्ट्र शासन,उपसंआसे नाशिक/लेखा-५/जीवनदायी योजना/२९७९-८०/ २०११ दि.२०/०१/२०१२ | १८८९५०.०० | १५००००.०० | २८९५०.०० पावती नं. ५१०६०७९२ दि. १३/०२/२०१२ | १००००.०० |
| २ | श्री. राजकुमार भिमराव हुसे | महाराष्ट्र शासन,उपसंआसे नाशिक/लेखा-५/जीवनदायी योजना/४६४१-४२/ २०११ दि.०३/०२/२०१२ | १६४०००.०० | १५००००.०० | ७०००.०० पावती नं. २१०४९५६४ | ७०००.०० |

तरी उपरोक्त रुग्णांसाठी वापरलेल्या ३ नग बलूनच्या बीलाची रक्कम रु. ४७२५०/- M/s. Shivam Trading Co., Mumbai यांना अदा करण्यास मान्यता असावी.

**निर्णय क्र.५८७ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे श्री साईबाबा रुग्णालयातील कॅथलॅब विभागात वर्कशॉप करीता तातडीने M/s. Shivam Trading Co., Mumbai यांचेकडून केलेल्या बलूनचे खरेदीस व याकामी आलेल्या रक्कम रुपये ४७,२५०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

-----------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.१६ श्री साईबाबा रुग्णालयातील सि.व्ही.टी.एस.ओ.टी. नं.०२ विभागाकरिता इन्स्ट्रुमेंट खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयीतील सि.व्ही.टी.एस. ओ.टी. नंबर २ विभागासाठी इन्स्ट्रुमेंट खरेदीकामी विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यास व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.५,७९,५८८/- चे खर्चास दि.२४/०९/२०११ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेत निर्णय क्र.६९३ अन्वये मान्यता मिळालेली होती.

त्यानुसार सदरच्या खरेदीची रक्कम जास्त असल्याने जास्तीत जास्त प्रतिसाद मिळणेकामी सदरची जाहिरात नवभारत टाईम्स - मुंबई या वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्यात आली होती, तसेच संस्थानचे संकेत स्थळावर देखील निविदा देण्यात आली होती.

निविदा विक्रीची मुदत दि.१७/१०/२०११ ते ०६/११/२०११ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.०९/११/२०११ अखेर ठेवण्यात आली होती. तसेच एकूण १२ उत्पादक कंपन्या / पुरवठा धारक यांना इकडील पत्र क्र.३६९७ दि.१९/१०/२०११ अन्वये जाहिराती बाबत अवगत करणेकामी पत्र पाठविण्यात आले होते.

त्यास अनुसरुन मुंबई कार्यालयात ०४ निविदा तर शिर्डी येथील कार्यालयात ०२ निविदा प्राप्त झालेल्या होत्या, अशा एकूण ०६ निविदा प्राप्त झालेल्या होत्या. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे -

| Sr.No. | Name of Tenderer | Received Date |
|---|---|---|
| 1 | Biomedicon Services (I) Pvt. Ltd., Mumbai | 09/11/2011 |
| 2 | Kalelker Surgicals Pvt. Ltd., Mumbai | 09/11/2011 |
| 3 | PSI Marketing Pvt. Ltd., Nagpur | 08/11/2011 |
| 4 | Qualmed, Chennai | 09/11/2011 |
| 5 | Regency Life Sciences, Bangalore | 09/11/2011 |
| 6 | Zenith Surgical Co., Mumbai | 09/11/2011 |

उपरोक्त निविदा दि.१३/०१/२०१२ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेत समक्ष उघडून चर्चा / वाटाघाटी करुन निर्णय क्र.३५ अन्वये M/s. Kalelker Surgicals Pvt. Ltd., Mumbai यांचेकडून सदर इन्स्ट्रुमेंट खरेदी करण्यास व याकामी येणाऱ्या रु.३८४९९/- चे खर्चास मान्यता मिळालेली होती. त्यानुसार M/s. Kalelker Surgicals Pvt. Ltd., Mumbai यांना इकडील पत्र क्र.५८७० दि.०९/०२/२०१२ अन्वये पुरवठा आदेश देण्यात आलेला होता. सदर पुरवठा आदेशानुसार M/s. Kalelker Surgicals Pvt. Ltd., Mumbai यांनी दि.२७/०३/२०१२ रोजी सदर इन्स्ट्रुमेंटचा पुरवठा केलेला होता. सदर इन्स्ट्रुमेंट वापर करणारे कार्डीयाक सर्जन डॉ. विद्युत कुमार सिन्हा यांना दाखविल्यानंतर त्याची पाहणी केली असता त्यांना सदर इन्स्ट्रुमेंट पैकी दोन इन्स्ट्रुमेंट समाधानकारक वाटले नाही व इतर इन्स्ट्रुमेंट त्यांनी मान्य केलेले आहे. अमान्य केलेल्या इन्स्ट्रुमेंटचा तपशील खालील प्रमाणे -

| Sr.No. | Description | Qty. | Rate Per in Rs | Total Amt in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | Minimally Invasive Surgery Clamp Length : 320mm Jaws 68mm 2X3 Teeth | 2 | 4725.00 | 9450.00 |
| 2 | Minimally Invasive Surgery Clamp Length : 355mm Jaws 116mm 2X3 Teeth | 2 | 4725.00 | 9450.00 |
| | | | **Total in Rs.** | **18900.00** |

उपरोक्त अमान्य केलेल्या इन्स्ट्रुमेंटमधील क्रमाक १ चे दोन नग इन्स्ट्रुमेंट डॉक्टरांना तातडीने पाहिजे आहे व त्या दोन इन्स्ट्रुमेंट घेतल्याने त्यांचे काम चालू शकते त्यामुळे तुलनात्मक दरांच्या तक्त्यात क्रमांक दोनचे दर असलेले M/s. Biomedicon Services (I) Pvt. Ltd., Mumbai यांना वेळोवेळी तगादा करुन देखील त्यांनी सदर दोन इन्स्ट्रुमेंटचा डेमो (प्रात्यक्षिक) दिलेला नाही. त्यानंतर क्रमांक तीनचे दर असलेले M/s. Qualmed, Chennai यांना Wexler, U.S.A. या कंपनीच्या इन्स्ट्रुमेंटचा डेमो (प्रात्यक्षिक) मागविला होता त्यांनी सदर इन्स्ट्रुमेंटचा दि.३१/०३/२०१२ रोजी दिलेला असून सदर डेमो (प्रात्यक्षिक) बघून त्यांनी M/s. Qualmed, Chennai यांचे इन्स्ट्रुमेंट समाधान कारक असून ती घेणेबाबत शिफारस केलेली आहे. त्यांचे दरानुसार सदर इन्स्ट्रुमेंट खरेदीकामी येणाऱ्या खर्चाचा तपशील खालील प्रमाणे -

| Sr. No. | Description | Qty. | Rate per in Rs. | Total Amt.in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | Minimally Invasive Surgery Clamp Length :320mm Jaws 68mm 2X3 Teeth | 2 | 66544.00 | 133088.00 |
| | | **Total Amt in Rs.** | | **133088.00** |

M/s. Qualmed, Chennai यांचे दरानुसार सदर २ नग इन्स्ट्रुमेंट खरेदीकामी रक्कम रु.१३३०८८/- इतका खर्च येणार आहे म्हणजेच सदर खरेदीकामी M/s. Kalelker Surgicals Pvt. Ltd., Mumbai यांच्या पुरवठा आदेशाची रक्कम रु.९४५०/- पेक्षा रु.१२३६३८/- इतका जास्तीचा खर्च येणार आहे. (रु. १३३०८८.०० - ९४५०.०० = १२३६३८.००)

त्यानूसार M/s. Kalelker Surgicals Pvt. Ltd., Mumbai यांच्या अमान्य केलेल्या इन्स्ट्रुमेंटऐवजी क्रमाक १ चे दोन नग इन्स्ट्रुमेंट M/s. Qualmed, Chennai यांचेकडून खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या पुर्णांकीत रक्कम रु.१२३६३८/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.५८८ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील सि.व्ही.टी.एस.ओ.टी. नं.०२ विभागाकरिता इन्स्ट्रुमेंट M/s. Qualmed, Chennai यांचेकडून खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या पुर्णांकीत रक्कम रु.१२३६३८/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.१७ श्री साईबाबा रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागासाठी २ KVA यु.पी.एस. खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयातील पॅथोलॉजी विभागामध्ये वेगवेगळ्या रक्ताच्या तपासण्या Tissue Processor मशिनवर केल्या जातात. सदर Tissue Processor मशिन सन २००८ मध्ये रु.१६०००००/- इतक्या रक्कमेत खरेदी केलेले आहे. सध्या सदर मशिनसाठी यु.पी.एस. बसविलेला नाही. परंतु सध्या विद्युत पुरवठा सतत खंडीत होत असल्यामुळे मशिनचे काम आपोआप थांबते त्याच्यामुळे मशिन मधील इलेक्ट्रॉनिक्स पार्ट खराब होऊ शकतात, तसेच मशिनचा प्रोग्राम नष्ट होऊ शकतो. तसेच मशिनवर केलेल्या सर्व तपासण्या त्वरीत नष्ट होऊन पुन्हा नव्याने सर्व तपासण्या कराव्या लागतात, त्यामुळे वेळेचा देखील अपव्यय होतो. त्यामुळे पॅथोलॉजी विभागाने सदर मशिनकरीता एक नग २ KVA यु.पी.एस. ची दि.१७/०३/२०१२ चे मागणी पत्रकान्वये मागणी केलेली आहे.

सदरचे २ KVA यु.पी.एस. खरेदीकामी अंदाजे खर्चासाठी M/s. Consul Consolidated Pvt. Ltd.,Pune यांचेकडून दूरध्वनीद्वारे दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यानूसार त्यांनी त्यांचे दि.२६/०४/२०१२ रोजीचे ई-मेल पत्रान्वये दर कळविले आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे -

| Sr. no. | Description | Qty. | Rate Per in Rs | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | U.P.S. (2 K.V.A.) | 1 | 34218.00 | 34218.00 |
| | Total Amt. in Rs. | | | **34218.00** |

उपरोक्त २ KVA यु.पी.एस.१ नग खरेदीकामी अंदाजे रु. ३४२१८/- इतका खर्च येईल.

तरी सदरचा १ नग २ KVA यु.पी.एस. विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणाऱ्या रु. ३४२१८/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.५८९ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे श्री साईबाबा रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागासाठी २ KVA यु.पी.एस.विहित पध्दतीने कोटेशन्स मागवून खरेदी करण्यास व याकामी येणारे रक्कम रुपये ३४,२१८/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.१८ सन २०११-१२ मधील वार्षिक खरेदीमधील औषधे व लॅब केमिकल्सचे अतिरिक्त खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात दैनंदिन वापरासाठी लागणाऱ्या खालील औषधे व लॅब केमिकल करीता सन २०११-२०१२ या वर्षाकरीता वार्षिक निविदेतील मंजूर दराने पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे.त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr. No. | Description | Name of Supplier | P.O.No. & Date | Make | Brand Name | Packing | Qty. | Sanctioned Rate Per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | COOMBS CARDS (LISS/ COOMBS-POLYSPECIFIC AHG) | N.P. Agencies , Mumbai | 3167 24/09/2011 | DIAMED | | 6*48T/ BOX | 8000 | 40.0000 | 320000.00 |
| 2 | ABO/D+REVERSE GROUP CARDS (DEMAND QTY. IN BOX) | N.P. Agencies, Mumbai | 3167 24/09/2011 | DIAMED | | 48T /BOX | 1000 | 110.0000 | 110000.00 |
| 3 | INJ. CEFOPIROME 1 GM VIAL | Sanjay Agencies, Ahmednagar. | 3189 24/09/2011 | ARISTO | Bacirom 1gm | VIAL | 200 | 207.2169 | 41443.38 |
| 4 | SODIUM HYPOCHLORIDE SOLUTION 1X 5 LTR | Siddhi Medical Distributors, Aurangabad | 3206 24/09/2011 | PATHOZYME | | 5LTR | 30 | 144.0000 | 4320.00 |
| 5 | INJ GADODIAMIDE USP 0.5 MMOL/ML 10X10ML | Imaging Products India Pvt. Ltd., Mumbai | 3140 24/09/2011 | BRACCO | Multihance | 10ML | 300 | 760.0000 | 228000.00 |
| | | | | | **Total Amt. in Rs.-** | | | | **703763.38** |

त्यानुसार पुरवठा आदेशाप्रमाणे मालाचा पुरवठा पुर्ण झालेला आहे. रुग्णांचे दररोजच्या वाढलेल्या संख्येमुळे सध्या सदरचे औषधे व लॅब केमिकलचा औषध भांडारात साठा शिल्लक नाही व सदरचे औषधे व लॅब केमिकल्स दैनंदिन वापरासाठी आवश्यक आहे. त्यामुळे तुर्तास तीन ते चार महिने पुरु शकेल इतका साठा खरेदी करावा लागणार आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr. No. | Description | Name of Supplier | P.O.No. & Date | Make | Brand Name | Packing | Qty. | Sanctioned Rate Per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | COOMBS CARDS (LISS/ COOMBS-POLYSPECIFIC AHG) | N.P. Agencies, Mumbai | 3167 24/09/2011 | DIAMED | | 6*48T/ BOX | 8000 | 40.0000 | 320000.00 |
| 2 | ABO/D+REVERSE GROUP CARDS (DEMAND QTY. IN BOX) | N.P. Agencies, Mumbai | 3167 24/09/2011 | DIAMED | | 48T /BOX | 1000 | 110.0000 | 110000.00 |
| 3 | INJ. CEFOPIROME 1 GM VIAL | Sanjay Agencies, Ahmednagar. | 3189 24/09/2011 | ARISTO | Bacirom 1gm | VIAL | 100 | 207.2169 | 20721.69 |
| 4 | SODIUM HYPOCHLORIDE SOLUTION 1X 5 LTR | Siddhi Medical Distributors, Aurangabad | 3206 24/09/2011 | PATHOZYME | | 5LTR | 100 | 144.0000 | 14400.00 |
| 5 | INJ GADODIAMIDE USP 0.5 MMOL/ML 10X10ML | Imaging Products India Pvt. Ltd., Mumbai | 3140 24/09/2011 | BRACCO | Multihance | 10ML | 100 | 760.0000 | 76000.00 |
| | | | | | **Total Amt. in Rs.-** | | | | **541121.69** |

वरीलप्रमाणे औषधे व लॅब केमिकल वार्षिक मंजुर दरानुसार सदरचे खरेदीकामी रु. ५४११२१.६९ इतका खर्च येणार आहे. मा. व्यवस्थापन समिती सभा दि.२४/०९/२०११ निर्णय क्रमांक ६७५ Clause No.६ अन्वये मागणी केलेल्या औषधांच्या साठ्यापैकी काही औषधांची अतिरिक्त मागणी करावयाची असल्यास ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने खरेदी करुन रु. २५,०००/- पेक्षा अधिक रक्कमेच्या औषधांची मागणी करावयाची झाल्यास दैनंदिन कामाची गैरसोय होऊ नये, म्हणून ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे मंजुरीने खरेदी करुन केवळ नोंद घेण्यासाठी / माहितीस्तव मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे नोंद घेण्यासाठी सादर करण्यात यावे, असे ठरले आहे. सदर निर्णयानुसार सदरचे खरेदीकामी रु.२५,०००/- पेक्षा जास्त खर्च येणार आहे.

तरी औषधे व लॅब केमिकल वरीलप्रमाणे वार्षिक मंजुर दराने खरेदी करण्यात आले असुन सदर खरेदीकामी पुर्णांकित रक्कम रु.५४११२२/- इतका खर्च आलेला आहे.

सदर खरेदीची व खर्चाची नोंद घेण्यासाठी सादर.

**निर्णय क्र.५९०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०११-१२ मधील वार्षिक खरेदीमधील औषधे व लॅब केमिकल्सचे अतिरिक्त खरेदीकामी आलेल्या रक्कम रुपये रु.५४११२२/- मात्रचे खर्चाची नोंद घेण्यात आली.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.१९** **श्री साईनाथ रुग्णालयातल मे.अपोलो हॉस्पिटल एंटरप्राईजेस,चेन्नई यांचे दरमहा देणगीबाबत**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समिती सभा दि.०५/१२/२०१० चे सभेतील निर्णय क्र.९५८ अन्वये मे. अपोलो हॉस्पिटल एंटरप्राईजेस, चेन्नई यांना श्री साईबाबा रुग्णालयाचे अटी व शर्तीनूसार श्री साईनाथ रुग्णालयात विस्तारीत कक्ष (Extension Counter) कार्यान्वित करणेकामी निर्णय झालेला आहे.

त्यानूसार मे. अपोलो हॉस्पिटल एंटरप्राईजेस, चेन्नई यांनी श्री साईनाथ रुग्णालयात विस्तारीत कक्ष (Extension Counter) कार्यान्वित केलेले आहे. कार्यादेशातील व करारनाम्यातील अट क्र.१४ अन्वये मे. अपोलो हॉस्पिटल एंटरप्राईजेस, चेन्नई दरमहा झालेल्या एकूण नफ्यातून दुकान चालविणेकामी Operating charges येणारा खर्च वजा जाता उर्वरीत रक्कम देणगी म्हणून संस्थानचे वित्त विभागात चेक / डि.डि. द्वारे जमा करावयाची आहे. जर एकूण नफ्यातून दुकान चालविणेकामी Operating charges येणारा खर्च वजा जाता निव्वळ नफ्याची रक्कम हि जर रक्कम रु. २,७५,०००/- पेक्षा कमी असेल तर त्यांनी संस्थानला कमीत कमी हमी रक्कम रु.२,७५,०००/- या प्रमाणे देणगी म्हणून जमा करावयाची आहे.

1. As agreed by you, in consideration of Shri Saibaba Sansthan Trust Shirdi allowing you to conduct the business from the said Premises, you will donate to Shri Saibaba Sansthan Trust Shirdi monthly Profit earned by you on daily actual sale after deduction of following operating charges, from the business effective from 01/02/2011 Such profit shall be paid by eventuality of you without any default on or before 10th day of succeeding month. In the profit, being less than Rs.**2,75,000**/- (Rs. Two Lakh Seventy Five Thousand) per month then you will donate minimum assured amount of Rs.2,75,000/- (Rs. Two Lakh Seventy Five Thousand) per month towards this Extension Counter only. Operating charges variation, if any, will be jointly decided.

| Sr. No. | Details of operating charges | Sr. No. | Details of operating charges |
|---|---|---|---|
| 1 | Salary & Wages | 9 | Miscellaneous Expenses |
| 2 | Staff Welfare-Non-Statutory | 10 | Freight Outward |
| 3 | Computer Stationery | 11 | Conveyance |
| 4 | Packing Material | 12 | Telephone & Net Connection |
| 5 | Insurance | 13 | Electricity Charges |
| 6 | Outsource Charges | 14 | Repairs & Maintenance (M) |
| 7 | Audit Fee | 15 | Office Maintenance (M) |
| 8 | Postage & Stamp | 16 | Interest on Inventory |

परंतु मे. अपोलो हॉस्पिटल एंटरप्राईजेस, चेन्नई यांनी दि.०५/०४/२०१२ चे पत्रान्वये त्यांना दुकान कार्यान्वित करुन १२ महिने झालेले असून सदर दुकानचा मागील १२ महिन्यात झालेल्या खरेदी विक्री Operating charges व निव्वळ नफा इ. चा अहवाल सादर केलेला असून सदर पत्रात त्यांनी आता पर्यंतचा ताळेबंद बघता होणारा नफा व Operating charges चा होणारा खर्च वजा जाता त्यांचा निव्वळ नफा हा रु.२,७५,०००/- पेक्षा कमी झालेला आहे. आम्ही ना नफा ना तोटा या धर्तीवर दुकान चालवित असून श्री साईनाथ रुग्णालयातील काउंटर हे वेगळी शाखा न संबोधता श्री साईबाबा रुग्णालयातील दुकानचे युनीट संबोधून दोघांचा खर्च विक्री एकत्रित दाखवून देणगी रक्कम इ. एकत्रित धरुन हिशोब घ्यावा अशी देखील विनंती केलेली आहे. किंवा श्री साईनाथ रुग्णालयाचे काउंटरसाठी कमीत कमी देणगी रक्कम रु.२,७५,०००/- इतकी न ठेवता ती कमी करुन दरमहा रक्कम रु.१,११,०००/- देणगी म्हणून स्विकारण्यात यावी असा प्रस्ताव दिलेला आहे.

त्यांनी सादर केलेल्या खर्च व नफ्याचा तपाशील खालील प्रमाणे -

| Month | Monthly Sales After Vat | Gross Profit after VAT | Gross Profit % | Operating Expenses | Donation Amount | Details | Cheque No. | Cheque Date |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Mar-11 | 588141.00 | 164698.00 | 28.00 | 275994.00 | 191823.00 | | 504 | 25/09/2011 |
| Apr-11 | 676960.00 | 194948.00 | 28.80 | 108536.00 | | | | |
| May-11 | 810349.00 | 209928.00 | 25.91 | 130300.00 | | | | |
| Jun-11 | 942901.00 | 265605.00 | 28.17 | 128526.00 | | | | |
| Jul-11 | 1166471.00 | 295853.00 | 25.36 | 151224.00 | 144629.00 | Cheque | 169 | 31/10/2011 |
| Aug-11 | 1004762.00 | 266351.00 | 26.51 | 149049.00 | 117302.00 | Cheque | 208 | 22/11/2011 |
| Sep-11 | 963144.00 | 263085.00 | 27.32 | 161221.00 | 101864.00 | Cheque | 229 | 29/11/2011 |
| Oct-11 | 870235.00 | 235739.00 | 27.09 | 135499.00 | 100240.00 | Cheque | 244 | 10/01/2012 |
| Nov-11 | 962882.00 | 254387.00 | 26.42 | 134074.00 | 120313.00 | Cheque | 285 | 02/03/2012 |
| Dec-11 | 995686.00 | 303932.00 | 30.52 | 133422.00 | 170510.00 | Cheque | 291 | 21/03/2012 |
| Jan-12 | 911593.00 | 249760.00 | 27.40 | 120907.00 | 128853.00 | In Process | | |
| Feb-12 | 887413.00 | 256128.00 | 28.83 | 101707.00 | 154421.00 | In Process | | |
| **Avg.** | **980049.00** | **269128.50** | **27.46** | **157314.00** | **111814.00** | | | |

मे. अपोलो हॉस्पिटल एंटरप्राईजेस, चेन्नई यांनी आतापर्यंत प्रत्यक्ष झालेल्या निव्वळ नफ्याची रक्कम माहे डिसेंबर २०११ अखेर पर्यंत जमा केलेले आहे. श्री साईबाबा रुग्णालय हे सुपर स्पेशालीटी रुग्णालय असून तेथे फक्त बायपास व ह्दयशस्त्रक्रियेसाठी पॅकेजनुसार रुग्णालयाचे औषध वापरण्यात येतात व संस्थानचे कायम कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त इतर सर्व रुग्णांकडून संस्थानचे वापरलेली औषधे परत त्यांचेकडून बदली घेण्यात येतात त्यामुळे श्री साईबाबा हॉस्पिटलमधील औषधांच्या विक्रीचे प्रमाण जास्त असते.

तर श्री साईनाथ रुग्णालय हे जनरल रुग्णालय आहे त्यामुळे दोन्ही ठिकाणी येणारा रुग्णांचा आजार वेगवेगळ्या स्वरुपाचा असतो तसेच तेथील सर्व रुग्णांना रु.१०/- रुपयांच्या केसपेपरवर व संस्थान कर्मचाऱ्यांना देखील संस्थानचे औषध भांडारात उपलब्ध असलेली सर्व औषधे बाह्यरुग्ण विभागात मोफत देण्यात येतात त्यामुळे श्री साईनाथ रुग्णालयामध्ये दर महा होणारी औषधांची विक्री ही निश्चितच कमी राहील असे मत आहे.

तरी मे. अपोलो हॉस्पिटल एंटरप्राईजेस, चेन्नई यांचेकडुन दरमहा रु.२,७५,०००/- स्विकारावे किंवा खर्च वजा जाता निव्वळ नफा जो होईल तो स्विकारावा किंवा दरमहा रु. १,१०,०००/- देणगी म्हणून स्विकारणे बाबत पुढील निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५९१ यावर सविस्तर चर्चा होऊन, मे. अपोलो हॉस्पिटल एंटरप्राईजेस, चेन्नई यांचे श्री साईनाथ रुग्णालयातील काऊंटरवर मागील १ वर्षाची उलाढाल व निव्वळ नफा बघता तो दरमहा रक्कम रु.२,७५,०००/- पेक्षा कमी दिसून येतो, त्यामुळे त्यांचेकडून तेथील काऊंटरवर होणारा खर्च वजा जाता प्रत्यक्ष होणारा निव्वळ नफ्याची रक्कम दरमहा मार्च- २०११ म्हणजे काऊंटर चालू झाल्यापासून स्विकारण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२० सन २०११-१२ या वर्षातील मुदतबाह्य औषधे नष्ट करणेस व संगणकातून नोंदी निर्लिखित करणेस मंजूरी मिळणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ हॉस्पिटलचे औषध भांडार व विविध वॉर्डमध्ये दि.०१/०४/२०११ ते दि.२९/०२/२०१२ या कालावधीमध्ये एकुण रु.२१,९७६/- ची औषधे मुदतबाह्य झालेली आहे. परंतु सदर औषधांची खरेदी ही मागील तीन वर्षात टप्प्याटप्प्याने खरेदी केलेली होती. त्याची तपशिलवार माहिती खालीलप्रमाणे-

अ) मुख्य औषधे भांडारातील एकुण औषधे -

| Sr. no. | Name of Wards / Section | Total Amt.in Rs. |
|---|---|---|
| 1 | Main Store - expired medicines / surgicals | 16660.00 |
| | **Total Amt.in Rs.--** | **16660.00** |

ब) दोन्ही रुग्णालयाचे विविध वॉर्डमधून जमा झालेले एकुण औषधे -

| Sr. no. | Name of Wards / Section | Total Amt.in Rs. |
|---|---|---|
| 1 | All Wards - Saibaba Hospital | 2679.00 |
| 2 | Sub-Store & Wards - Sainath Hospital | 2637.00 |
| | **Total Amt.in Rs.--** | **5316.00** |

**अ + ब = पुर्णांकित रक्कम रु.२१,९७६.००**

उपरोक्तप्रमाणे दोन्ही रुग्णालयाचे मुख्य औषध भांडार व विविध वॉर्डमधील औषधे दि.०१/०४/२०११ ते दि.२९/०२/२०१२ या कालावधीत रु.२१,९७६/- इतक्या रुपयांची मुदतबाह्य झालेली आहे. सदर कालावधीमध्ये जी औषधे / सर्जिकल साहित्य मुदतबाहय होतील असा अंदाज होता किंवा होणार आहे. यासाठी संबंधित कंपन्या / अधिकृत विक्रेते यांना तीन तर काही ठिकाणी सहा महिने अगोदर पत्रव्यवहार करुन परत घेण्याबाबत विनंती करणेत आलेली होती, त्यानुसार एकुण रु.७,४३,९८२/- इतक्या रुपयांची औषधे कंपन्याना परत करुन त्याबदली क्रेडीट नोट घेऊन उपयोगी औषधे घेतलेली आहेत. उपरोक्त औषधांची संख्या एकदम कमी प्रमाणात आहे. याकामी संबंधित कंपनी / विक्रेते यांना परत देणेकामी तगादा करण्यात आलेला होता, परंतु कंपनीच्या धोरणामुळे तसेच औषधांची संख्या खुपच कमी व Loose Strips असल्यामुळे परत घेतलेले नाही.

सन २०११-१२ या आर्थिक वर्षामध्ये रु.२०,८८,८९,९५७/- ची औषधे खरेदी करण्यात आलेली आहे. त्यानुसार मुदतबाह्य औषधांची टक्केवारी ०.०००१० इतकी आहे. सदरची यादी अंतर्गत लेखा परिक्षक (Auditors) यांचेकडून तपासून घेतलेली आहे. गतवर्षी रु.४१,८९०/- ची औषधे मुदत बाह्य झालेली होती.

तरी उपरोक्त प्रमाणे औषधे जमिनीत खोलवर खड्डा घेऊन नष्ट करण्यास व सदरचा मुदतबाह्य औषधसाठा भांडारातील संगणकामधून कमी करणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.५९२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे सन २०११-१२ या वर्षातील मुदतबाह्य औषधे जमिनीत खोलवर खड्डा घेऊन नष्ट करण्यास व सदरचा मुदतबाह्य औषधसाठा भांडारातील संगणकामधून कमी करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२१** **रुग्णालयातील संगणक दुरुस्ती देखभालीसाठी लागणारे साहित्य खरेदी करणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री.साईनाथ रूग्णालयामध्ये विविध विभागांत संगणक संच कार्यान्वीत आहे. सदर संगणक संच कायम वापरात असल्याने त्यात वेळोवेळी बिघाड निर्माण होतात त्याचे दुरुस्ती करता स्पेअर पार्टस ची आवश्यकता असते. तसेच प्रिंटर्स करिता वेळोवेळी टोनर रिफीलींग व टोनर मधील स्पेअर पार्टस यांची आवश्यकता असते. याकामी आपण यापूर्वी दरवर्षी पुरवठा धारकांकडून दरपत्रके मागवून स्पेअर पार्ट व इतर साहित्यांचे दर निश्चित करुन वेळोवेळी आवश्यकतेनुसार लागणारे साहीत्य खरेदी करुन त्या वर्षीच्या अंदाजपत्रकात मंजूर असलेल्या मशिनरी दुरुस्ती देखभाल या खात्यावर सदरचा खर्च खर्ची दाखविला जातो.

आता सन २०१२-२०१३ या आर्थिक वर्षा करीता मंजूर अंदाजपत्रकात देखील मशिनरी देखभाल व दुरुस्ती या खात्यावर रु. ५,००,०००/- इतक्या रकमेची तरतुद आहे. यावर्षी दुरुस्ती लागणाऱ्या आवश्यक ते स्पेअरपार्ट व साहित्य खरेदी करणेकामी दर निश्चित करणे आवश्यक आहे. सदरकामी प्रिन्टर्स टोनर रिफिलींग व इतर आवश्यक स्पेअरपार्ट खरेदी करीता विविध पुरवठा धारंकाकडुन कोटेशन मागविणे बाबत संदर्भीय टिपणी सादर करण्यात आली होती . परंतु सदर टिपणी वरती मा. उप-कार्यकारी अधिकारी सो., यांनी वित्त व्यवस्थापक यांना सदर कामी खर्च किती असे निर्देश दिले आहे. सदर निर्देशानुसार वित्त व्यवस्थापक यांनी वार्षीक अंदाजे खर्च काढण्यासाठी संभाव्य आवश्यक स्पेअर पार्टस ,खर्च यांचे विवरण करावे म्हणजे मागणीस अनुसरून एकुण खर्च रक्कम काढता येईल,असे लिखित अभिप्राय दिले आहे.

सदर अभिप्रायानुसार मागील वर्षी (सन -२०११-२०१२) या आर्थिक वर्षा करीता प्रिटंर टोनर रिफींलींग , प्रिटर्स स्पेअर पार्टस व इतर आवश्यक संगणकिय साहित्याचे दुरूस्ती करीता लागलेले स्पेअर पार्टस या कामी रक्कम रूपये ७१,७७०/- इतका खर्च झालेला आहे. सदर कामी मागील वर्षी (सन -२०११-२०१२) संस्थानचे विहित पध्दतीने स्पेअर पार्टस खरेदी करण्यात आले असुन सदरचे बीले ही किरकोळ स्वरुपाची असल्याने सदरचा खर्च श्री. साईबाबा हॉस्पिटलचे ईडीपी विभागाचे मंजुर अंदाज पत्रकातील दुरूस्ती वदेखभाल खर्चातुन वित्त विभागा मार्फत अदा करण्यात आले आहे.

त्याच प्रमाणे सन -२०१२ -२०१३ या आर्थिक वर्षा करीता मागील वर्षा प्रमाणे प्रिटंर टोनर रिफींलींग , प्रिटर्स स्पेअर पार्टस व इतर आवश्यक संगणकिय साहित्याचे दुरूस्ती करीता लागणारे स्पेअर पार्टस खरेदी करणे कामी संस्थानचे विहीत पध्दतीनुसार विविध पुरवठाधारंकाकडुन कोटेशन मागवुन सदरचे कोटेशन हे मा. उप-कार्यकारी अधिकारी साो., यांचे समक्ष उघडुन त्यातील न्युनत्तम कोटेशन धारंकाकडुन संगणकिय साहित्याचे स्पेअर पार्टस खरेदी करून काम करून घेणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रूपये १,५०,०००/- (अक्षरी- एक लाख पन्नास हजार रूपये मात्र)चे खर्चास मान्यता मिळणेसाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.५९३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे सन -२०१२ -२०१३ या आर्थिक वर्षा करीता मागील वर्षा प्रमाणे प्रिटंर टोनर रिफींलींग, प्रिटर्स स्पेअर पार्टस ,व इतर आवश्यक संगणकिय साहित्याचे दुरूस्ती करीता लागणारे स्पेअर पार्टस खरेदी करणे कामी संस्थानचे विहीत पध्दतीनुसार विविध पुरवठाधारंकाकडुन कोटेशन मागवुन सदरचे कोटेशन हे मा. उप-कार्यकारी अधिकारी साो., यांचे समक्ष उघडुन त्यातील न्युनत्तम कोटेशन धारंकाकडुन संगणकिय साहित्याचे स्पेअर पार्टस खरेदी करून काम करून घेणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रूपये १,५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२२** **कार्डीयाक ऑपरेशन थिएरमधील लाईट सोर्स दुरुस्तीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलचे कार्डीयाक ऑपरेशन थिएटर विभागाकरीता मे. बी. एल. लाईफ सायन्सेस प्रा. ली. मुंबई यांचेकडुन एक झेनॉन लाईट सोर्स (Model- Luxtec LX ३००) सन २००६ मध्ये एकुण रू. २,८६,०००/- इतक्या खरेदी करणेत आला आहे. कंपनीने सदर लाईटसोर्स करीता दिलेला एक वर्षाचा वॉरंटी कालावधी दि. १९/०४/२००७ रोजी संपलेला असुन लाईटसोर्सची दुरुस्ती व देखभाल बायोमेडीकल इंजिनीअरींग विभागामार्फत येथेच केली जात आहे. परंतु दुरुस्ती करीता आवश्यक असणारे स्पेअर पार्ट पुरवठाधारक कंपनीकडुन बदलुन घेतले जातात.

सध्या लाईट सोर्स व्यवस्थीत काम देत नसल्याचे सदर विभागाने कळविले आहे. त्यानुसार लाईट सोर्सची तपासणी करून बल्ब खराब झाले असल्याचे निदर्शनास आले. सदर लाईट सोर्स कार्डीयाक ऑपरेशन थिएरमध्ये नियमीत वापरात असुन तातडीने दुरूस्त करणे आवश्यक आहे. त्यासाठी कंपनीकडे बल्ब करीता विचारणा केली असता त्यांचे पत्र क्र. BLLS//Q-०३/१२-१३ दि. ०२/०६/२०१२ अन्वये सर्वकरांसहीत एकुण रू. ५६,२५० (अक्षरी रू. छपन्न हजार दोनशे पन्नास मात्र) इतक्या रकमेचे कोटेशन पाठविले आहे. सदर रक्कम कंपनीस लाईटसोर्स दुरुस्तीनंतर श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये प्राप्त झालेनंतर अदा करावयाची आहे. उपरोक्त बल्ब करीता कंपनी ६५० तासांची वॉरंटी देत आहे. सदर लाईट सोर्सचे स्पेअर पार्ट फक्त मे. बी. एल. लाईफ सायन्सेस प्रा. ली. मुंबई त्यांचेकडेच मिळतात.

कंपनीचे पत्रानुसार बल्ब साधारणत: ६५० तासांच्या वापरानंतर खराब होतो. सदरचा बल्ब यापुर्वी २८/०४/२०११ रोजी खराब झालेमुळे बदलणेत आलेला आहे. दि. २८/०४/२०११ ते ३१/०५/२०१२ या कालावधीत अंदाजे एकुण १,०७५ रुग्णांवर शस्त्रक्रिया झालेल्या आहेत. त्यासाठी सदर लाईट सोर्स ३,२२५ तास वापरला गेलेला आहे (परिशिष्ट-अ).

तरी कार्डीयाक ऑपरेशन थिएटर विभागातील लाईटसोर्सचे दुरुस्तीकरीता आवश्यक असलेला बल्ब मे. बी. एल. लाईफ सायन्सेस प्रा. ली. मुंबई यांचेकडुन बदलुन घेणेस व त्यासाठी येणाऱ्या एकुण रु. ५६,२५०/- इतक्या रकमेच्या खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.५९४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, कार्डीयाक ऑपरेशन थिएटर विभागातील लाईटसोर्सचे दुरुस्तीकरीता आवश्यक असलेला बल्ब मे. बी. एल. लाईफ सायन्सेस प्रा. ली. मुंबई यांचेकडुन बदलुन घेणेस व त्यासाठी येणाऱ्या एकुण रु. ५६,२५०/- इतक्या रकमेच्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२३** **ब्लड गॅस ॲनालायझर मशिनचे दुरुस्तीबाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलच्या पॅथॉलॉजी लॅबमध्ये रूग्णांचे रक्त तपासणी करणेकामी पुरवठा आदेश क्र. ९६४१, दि.३/९/२००५ अन्वये मे. रोश डायग्नॉस्टिक प्रा.लि.मुंबई या कंपनीचे OMNI C हे ऑटोमॅटिक ब्लड गॅस ॲनालायझर मशिन एकुण रू.६,७५,०००/-इतक्या रकमेत खरेदी करण्यात आले आहे. सदर मशिन पॅथॉलॉजी विभागात नियमीत वापरात आहे. मशीनचे दुरुस्ती व देखभालीकरीता कंपनीकडे दि. ०१/०४/२०१२ ते ३१/०३/२०१३ या कालावधीसाठी सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करणेत येत आहे. AMC कालावधीत दुरूस्तीसाठी आवश्यक असणाऱ्या सर्व स्पेअर पार्टची व कन्झ्युमेबल्सची किंमत संस्थानला वेगळी अदा करावयाची आहे.

सध्या सदर मशिन व्यवस्थीत काम देत नसल्यामुळे सदर विभागाने त्यांचे पत्रान्वये कळविले आहे. त्यानुसार कंपनी इंजिनीअर त्याचे तातडीच्या भेटी करीता आले असता त्यांनी मशिनची तपासणी करुन Micro Electrode Reference हा पार्ट खराब झाल्याचे त्यांचे सर्व्हीस रिपोर्ट क्र.२१७०४ दि.

०७/०४/२०१२ अन्वये कळविले आहे. यापुर्वी सदर Micro Electrode Reference दि.०३/०३/०९ रोजी बदलणेत आला असून सदर इलेक्ट्रोडने तीन वर्ष काम दिलेले आहे.त्यासाठी मे.रोश डायग्नॉस्टिक प्रा. ली. मुंबई यांचे सध्याचे अधिकृत डिलर मे. सास एंटरप्रायजेस, औरंगाबाद यांनी त्यांचे पत्र दि. ०८/०४/२०१२ चे अन्वये सर्व करांसहीत एकुण रू. ४६,९५३/- (अक्षरी- शेहेचाळीस हजार नउशे त्रेपन्न) इतक्या रकमेचे कोटेशन पाठविले आहे. उपरोक्त पार्ट करीता कंपनी एक वर्षाची वॉरंटी देत आहे.

तरी मे. सास एंटरप्रायजेस, औरंगाबाद यांचेकडून ऑटोमॅटिक ब्लड गॅस ॲनालायझर मशिनचा Micro Electrode Reference खरेदी करणेस व त्याकरीता येणाऱ्या एकुण रू. ४६,९५३/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.५९५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मे. सास एंटरप्रायजेस, औरंगाबाद यांचेकडून ऑटोमॅटिक ब्लड गॅस ॲनालायझर मशिनचा Micro Electrode Reference खरेदी करणेस व त्याकरीता येणाऱ्या एकुण रू. ४६,९५३/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वेद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२४** **श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ हॉस्पिटल येथे डायबेटिक केअर सेंटर सुरु करणेसाठी डॉक्टर व परिचारिका यांना आयलँड येथे प्रशिक्षणासाठी पाठविणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालय येथे डायबेटिक केअर सेंटर सुरु करणेसाठी मा. व्यवस्थापन सभा दि. १३/२/२०११ रोजीच्या ठराव क्र. ४२ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. सदर डायबेटिक केअर सेंटर सुरु करणेबाबत संगमनेर येथील मुळ रहिवाशी असलेले परंतु सध्या आयर्लंड या देशामध्ये शासकीय आरोग्य सेवेत उच्च पदावर असलेले डॉ. दिलीप जोंधळे यांनी सामाजिक उत्तरदायीत्वाच्या भुमीकेतुन पुढाकार घेतलेला आहे. व सदर सेंटर सुरु करणेसाठी सर्व मार्गदर्शन प्रशिक्षण व तांत्रिक सहाय्य करण्याची तयारी दाखवली आहे. त्या अनुषंगाने डॉ.जोंधळे यांनी श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील प्रत्येकी १ डॉक्टर व प्रत्येकी १ परिचारिका यांना आयर्लंड येथे मोफत प्रशिक्षण देण्याचे मान्य केले आहे. सदर प्रशिक्षणाचा कालावधी हा दि. १ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट २०१२ असा निश्चित करण्यात आलेला आहे.

सदर प्रशिक्षणासाठी खालील कर्मचाऱ्यांची निवड करण्यात आलेली आहे.

a. **डॉ. प्रफुल्ल पोरवाल,** वैद्यकीय अधिकारी - डॉ. पोरवाल यांचे शिक्षण एम.बी.बी.एस (M.B.B.S) झालेले असून ते साईनाथ रुग्णालय येथे दि.१३/१२/१९९१ पासुन वैद्यकीय अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी सुरुवातीचे ८ वर्षे तात्कालीन फिजीशियनच्या देखरेखीखाली काम केलेले आहे. तसेच नंतर ६ वर्षे जनरल ओ.पी.डी संभाळलेली आहे. व गेले ६ वर्षापासुन ते मेडीसीन ओ.पी.डी सांभाळतात.

b. **श्रीमती. प्रतिभा पाटोळे,** परिचारिका - श्रीमती पाटोळे यांचे शिक्षण जी.एन.एम (G.N.M) झालेले असून त्या श्री साईनाथ रुग्णालय येथे परिचारिका या पदावर दि. ०५/०८/२००० पासुन कार्यरत आहेत. त्यांनी आतापर्यंत ऑपरेशन थिएटरमध्ये ७ वर्षे, गायनॅक वॉर्डमध्ये २ वर्षे व सर्जरी वॉर्डमध्ये २ वर्षे काम केलेले आहे. गेल्या १ वर्षापासुन त्या ऑर्थो वॉर्डमध्ये काम करत आहेत.

c. **श्रीमती. मिरा कोटकर,** परिचारिका - श्रीमती कोटकर यांचे शिक्षण जी.एन.एम (G.N.M) झालेले असून त्या श्री साईबाबा रुग्णालय येथे परिचारिका या पदावर दि.०५/०४/२००६ पासुन कार्यरत आहेत. त्यांनी अपघात विभाग येथे २ वर्षे, कार्डीयाक रिकव्हरी युनीट २ मध्ये २ वर्षे, कॅथलॅबमध्ये ६ महिने व उर्वरित कालावधीमध्ये जनरल वॉर्डमध्ये काम केलेले आहे. सध्या त्या अपघात विभागात काम करतात.

उपरोक्त तीनही कर्मचाऱ्यांचा बायोडाटा सोबत जोडलेला आहे.

सदर कर्मचाऱ्यांस प्रशिक्षणास पाठविणेपुर्वी त्यांचेकडुन पुढील किमान ५ वर्षे संस्थान सेवा सोडणार नाहीत, असा बॉड करुन घेता येईल. तसेच रुपये ५ लाख इतकी बँक गँरंटी घेता येईल. या दोन्हीही अटी शर्तीस संबंधीत कर्मचाऱ्यांनी मान्यता दर्शविली आहे. तसेच संबंधीत कर्मचाऱ्यांच्या कुटूंबियांचीही सदर कर्मचारी एक महिन्यासाठी आयर्लंड येथे पाठविणेबाबत संमती घेतलेली आहे. सदर कर्मचाऱ्यांचा आयर्लंड येथे जाणे - येण्याचा तेथे राहण्याचा, जेवणाचा व प्रशिक्षणाचा संपुर्ण खर्च हा डॉ. जोंधळे हे करणार आहेत. सदर ट्रेनिंगसाठी साईबाबा संस्थानला कुठलाही खर्च करावा लागणार नाही. फक्त व्हिसा मिळविण्यासाठी लागणारा खर्च स्वतः कर्मचाऱ्यास करावा लागणार आहे.

सदर कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणानंतर दोन्ही रुग्णालयांमध्ये डायबेटिक केअर सेंटर सुरु करता येईल. तरी सदर कर्मचाऱ्यांना या प्रशिक्षणकामी आयर्लंड येथे पाठविणेसाठी चर्चा होऊन निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.५९६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली. सदर प्रशिक्षणासाठी संस्थान कोणताही खर्च करत नसल्याने, सदरहू कर्मचाऱ्यांकडून कोणत्याही प्रकारचा बॉण्ड व बँक गॅरंटी घेण्यात येऊ नये, व त्यांना विनाअट प्रशिक्षणास पाठविणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक/वैद्यकीय अधिक्षक)

---

**विषय नं.२५** **सेंट्रल मेडीकल गॅस प्लँट येथील एअर कॉम्प्रेसर तातडीने खरेदी करणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमधील विविध एकुण ६ ऑपरेशन थिएटर्स, एकुण ४ सी.आर.यु., जी.आय. सी.यु.आणि आय. सी. सी.यु. तसेच विविध वॉर्डस करीता सन २००५ यावर्षी सेंट्रल मेडीकल गॅस सिस्टीम मे.अलमेड इक्वीपमेंटस, मुंबई यांचेकडून एकुण रू.२७,५१,६८८/- इतक्या रकमेत बसवुन घेण्यात आली आहे. सदर सिस्टीमच्या मेडीकल गॅस प्लँट मध्ये एकुण दोन व्हॅक्युम पंप, दोन एअर कॉम्प्रेसर, कंट्रोल पॅनल इ.विविध ॲक्सेसरीजसह बसविणेत आले आहेत. सदर सिस्टीमकरीता मे. अलमेड इक्विपमेंटस, नवी मुंबई या कंपनीने दिलेली दोन वर्षाची वॉरंटी संपली असुन सध्या दि.०१/०४/२०१२ ते दि.३१/०३/२०१३ या कालावधीकरीता मे. अलमेड इक्वीपमेंटस, मुंबई यांचेकडे श्री साईबाबा हॉस्पिटलमधील सेंट्रल मेडिकल गॅस सिस्टीमचे CMC करणेत येत आहे.

मेडीकल गॅस प्लँट मध्ये एकुण दोन व्हॅक्युम पंप, दोन एअर कॉम्प्रेसर, कंट्रोल पॅनल इ. मशिनरी बसविणेत आले पासुन (६ वर्षापासून ) २४ तास सतत सुरू असतात. ऑपरेशन थिएटर्स व आय. सी. सी.यु. येथे अत्यवस्थ रुग्णांना कृत्रीम श्वासोच्छवास देणेसाठी असलेल्या व्हेंटीलेटर्स करीता एअर कॉम्प्रेसर द्वारे कॉम्प्रेसड् एअरचा पुरवठा पाईपलाईन द्वारे केला जातो. त्यामुळे सदर कॉम्प्रेसरवर कामाचा बोजा हा खुपच वाढलेला आहे.

दि.२८/०६/२०१२ रोजी दोन एअर कॉम्प्रेसर पैकी (क्षमता-प्रत्येकी १० एच.पी.) एक कॉम्प्रेसर सुरू असताना अचानक तुटला असून तो दुरुस्त होणे शक्य नाही. तसे मे. अलमेड इक्वीपमेंटस, मुंबई यांचे इंजिनीअरने बायोमेडीकल विभागास रिपोर्ट द्वारे कळविले आहे. सध्या एकाच एअर कॉम्प्रेसरद्वारे कॉम्प्रेसड् एअरचा पुरवठा संपूर्ण हॉस्पिटलकरीता सुरू असून श्री साईनाथ रुग्णालयातील एक ५ एच.पी. क्षमतेचा एअर कॉम्प्रेसर आणण्यात आला असून तातडीच्या वेळी वापरण्याकरीता बसविणेत आला आहे असे बायोमेडीकल इंजिनीअरींग विभागाने त्यांचे दि.३०/०६/२०१२ चे रिपोर्ट अन्वये कळविलेले असून १ नग कॉम्प्रेसर १५ H.P. क्षमतेचा तातडीने खरेदी करणेबाबत खरेदी विभागास कळविलेले आहे.

त्यामुळे श्री साईबाबा हॉस्पिटलमधील सेंट्रल मेडिकल गॅस सिस्टीम करीता एक नवीन एअर कॉम्प्रेसर तातडीने खरेदी करणे गरजेचे आहे. सध्या श्री साईबाबा हॉस्पिटलमधील पेशंटची संख्या व त्या अनुशंगाने व्हेंटीलेटर्स ची संख्या सन २००५ पेक्षा दुपट्टीपेक्षा अधिक प्रमाणात वाढलेली आहे. त्यामुळे नवीन एअर कॉम्प्रेसर हा १५ एच. पी. क्षमतेचा घेणे योग्य राहील. १५ एच .पी क्षमतेच्या एअर कॉम्प्रेसर (सर्व ॲक्सेसरीज सह) करीता अंदाजे एकूण रू.४,५०,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी श्री साईबाबा हॉस्पिटलमधील सेंट्रल मेडिकल गॅस सिस्टीम करीता एक नवीन १५ एच. पी. क्षमतेचा एअर कॉम्प्रेसर विहित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.४,५०,०००/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.५९७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे श्री साईबाबा हॉस्पिटलमधील सेंट्रल मेडिकल गॅस सिस्टीम करीता एक नवीन १५ एच. पी. क्षमतेचा एअर कॉम्प्रेसर विहित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.४,५०,०००/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२६** **ठेकेदारामार्फत ट्रायल बेसिसवर दोन महिने कालावधीसाठी कंत्राटी ज्यु.बायोमेडिकल इंजिनिअर म्हणून घेण्यात आलेले कंत्राटी कर्मचारी श्री सागर बाळासाहेब विखे यांचा दिनांक ०९.०५.२०१२ रोजीचा कंत्राटी सेवा नियमित करणेबाबतचा अर्ज**

**प्रस्ताव-** श्री सागर बाळासाहेब विखे यांनी दि. ०१/०५/२०१२ रोजी अर्ज केला आहे की, घ्माझी शैक्षणिक अर्हता डिप्लोमा इन मेडीकल इलेक्ट्रॉनीक्स अशी असुन माझी माहे मार्च २०१२ ते एप्रिल २०१२ या दोन महिन्यांचे कालावधीकरीता प्रतिमाह रु. ११०००/- इतक्या वेतनावर कंत्राटी ज्यु बायोमेडीकल इंजिनिअर म्हणून नेमणूक झालेली आहे. उपरोक्त दोन महिन्यांचे कालावधीत बायोमेडीकल इंजिनिअर विभागामार्फत विविध मेडीकल इक्विपमेंटस व मशिनरीजचे दुरुस्ती व देखभालीची तसेच तत्संबंधीत कार्यालयीन कामे मी चांगल्या प्रकारे केली आहे. माहे एप्रिल २०१२ अखेर माझे सेवेचा (नोकरीचा) कालावधी संपत असून पुढील कालावधीत श्री साईचरणी सेवा करणेची माझी इच्छा आहे. तरी माहे एप्रिल २०१२ पासून पुढील कालावधीत सेवा करण्याची संधी द्यावी ही नम्र विनंती.

ज्यु. फिजिओथेरपिस्ट, एमआरआय टेक्निशियन, डायलेसिस टेक्निशियन, ज्यु पी एफ टी टेक्निशियन, ज्यु बायोमेडीकल इक्विपमेंट इंजिनिअर व फार्मासिस्ट या पॅरामेडिकल पदांसाठी उमेदवार कंत्राटदारामार्फत घेणेकरीता व आर एम ओं च्या स्थायी पदावर नेमणूकीसाठी मुलाखती दि. २१/०१/२०१२ रोजी मा. उपसमितीसमोर घेण्यात आल्या. सदर मुलाखतीमध्ये ज्यू. बायोमेडिकल इक्विपमेंट इंजिनिअर या पदासाठी ३ उमेदवार हजर होते. त्यापैकी श्री सचिन बाळासाहेब जगताप यांना कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने कुशल कर्मचारी म्हणून मासिक रु. ११०००/- मेहनताना देऊन श्री साईबाबा हॉस्पिटलकडे कामावर घेण्यात यावे व श्री सागर बाळासाहेब विखे यांची ट्रायल बेसेसवर दोन महिने कालावधीसाठी कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने

घेऊन त्यांना मासिक रु. ११,०००/- मेहनताना देण्यात, यावा असे ठरले. व त्यास मा. व्यवस्थापन समितीचे दि. १९/०२/२०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्र. १७३ नुसार पुष्टी देण्यात आली आहे.

त्यानुसार सागर बाळासाहेब विखे हे दि. ०१/०३/२०१२ रोजी कामावर हजर झालेले आहेत. त्यांची मुदत दि.३०/०४/२०१२ रोजी संपुष्टात आलेली आहे. आता श्री सागर विखे यांचे दि.०१.०५.२०१२ रोजीचे कंत्राटी सेवा नियमित करणेबाबतचे अर्जावर सि. बायोमेडीकल इंजि.यांनी श्री सागर विखे यांना दिलेले काम समाधानकारकरित्या पूर्ण केले आहे. मेडीकल इक्विपमेंट दुरुस्ती व देखभालीचा वाढता व्याप पाहता आणखी एक कंत्राटी ज्यु. इंजिनिअरची आवश्यकता असल्याचे नमूद केले आहे. तसेच वैद्यकिय संचालक यांनी सदर कर्मचाऱ्यांचे काम समाधानकारक आहे व आपली गरजही आहे. तरी पुढे सेवा चालू ठेवावी, अशी शिफारस केलेली आहे.

श्री साईनाथ व श्री साईबाबा हॉस्पीटल आकृतीबंधामध्ये बायोमेडीकल विभागासाठी खालीलप्रमाणे पदे मंजूर असून सदर विभागात कार्यरत असलेले कर्मचारी संख्या खालीलप्रमाणे-

| अ. नं. | पदनाम | श्री साईबाबा हॉस्पीटल | | | | श्री साईनाथ रुग्णालय | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मंजूर पदे | कायम कर्म | कंत्राटी कर्म | रिक्त | मंजूर पदे | कायम कर्म | कंत्राटी कर्म | रिक्त |
| ०१ | सि.बायोमेडीकल इक्विपमेंट इंजिनिअर | ०१ | ०१ | ०० | ०० | ---- | ---- | ---- | ---- |
| ०२ | ज्यु.बायोमेडीकल इक्विपमेंट इंजिनिअर | ०३ | ०२ | ०१ | ०० | ---- | ---- | ---- | ---- |
| ०३ | ज्यु.मेडीको इंजिनिअर | ---- | ---- | ---- | ---- | ०१ | ०० | ०० | ०१ |
| ०४ | बायोमेडीकल तंत्रज्ञ | ०५ | ०० | ०८ | ०० | ---- | ---- | ---- | ---- |
| ०५ | ऑक्सीजन प्लँट टेक्निशियन | ०४ | ०० | ०४ | ०० | ---- | ---- | ---- | ---- |

श्री साईबाबा हॉस्पीटलचे आकृतीबंधात सि. बायोमेडीकल इंजिनिअर चे एक पद असून ते भरलेले आहे. व ज्यु.बायोमेडीकल इक्विपमेंट इंजिनिअर या पदाच्या ०३ जागा मंजूर असून शैक्षणिक पात्रता एचएससी, डिप्लोमा इन मेडिका इंजिनिअर व वेतन बॅन्ड ९३००-३४०० ग्रेड पे ४२०० अशी आहे. या ०३ पदापैकी दोन पदावर कायम कर्मचारी नेमलेले आहेत व एक कंत्राटी पध्दतीने कुशल कर्मचारी घेण्यात आलेले आहे तसेच श्री सागर विखे यांना ट्रायल बेसिसवर दोन महिने कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने कुशल कर्मचारी म्हणून रु.११,०००/- वर घेणेत आलेले असून त्याची मुदत माहे एप्रील २०१२ अखेर संपुष्टात आलेली आहे.

श्री साईनाथ हॉस्पीटलचे आकृतीबंधामध्ये ज्यु. मेडिको इंजिनिअरचे एक पद मंजूर असून ते रिक्त आहे. तसेच श्री साईबाबा हॉस्पीटलकडे बायोमेडीकल तंत्रज्ञाची आकृतीबंधांत ०५ पदे मंजूर असून त्याठिकाणी ०८ कंत्राटी टेक्निशियन (कुशल व अकुशल) काम करीत आहेत व ऑक्सीजन प्लॅन्ट टेक्निशियनची आकृतीबंधामध्ये ०४ पदे मंजूर असून त्या ठिकाणी ०४ कंत्राटी टेक्निशियन (अकुशल कर्मचारी) कार्यरत आहेत.

तरी, श्री सागर बाळासाहेब विखे यांचे अर्जावरील सि. बायोमेडीकल इंजिनिअर व वैद्यकिय संचालक यांचा अभिप्राय विचारात घेता श्री विखे यांची कंत्राटी सेवा नियमित करणेबाबतचे अर्जावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५९८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री सागर बाळासाहेब विखे यांचे अर्जावरील सि. बायोमेडीकल इंजिनिअर व वैद्यकिय संचालक यांचा अभिप्राय विचारात घेता श्री विखे यांची सेवा कंत्राटी पध्दतीने कुशल कर्मचारी म्हणून रु.११,०००/- एकत्रित मासिक मानधनावर पुढे चालू ठेवण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२७** **श्री साईबाबा रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागासाठी फ्रिज खरेदी करणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागाने डि.पी. क्र.१३६८ दि.३०/०६/२०११ अन्वये ३०० लिटर क्षमतेच्या १ नग फ्रिजची मागणी केली होती. दि.२८/०८/२०११ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेत निर्णय क्र.६०६ अन्वये सदर फ्रिज सॅमसंग या नामांकित कंपनीकडून कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.३०,०००/- (अक्षरी रु. तीस हजार मात्र) चे खर्चास मान्यता मिळालेली होती.

त्यानुसार विहित पध्दतीने कोटेशन मागवून दि.०९/११/२०११ रोजीचे मंजुर टिपणीन्वये सॅमसंग या नामांकित कंपनीचे (२ Door Frost Free Metalic Colour) या फ्रिजकरीता निम्नत्तम दराने मे. जीवन रेडीओ हाऊस, श्रीरामपुर यांना इकडील पत्र क्र. ४३९९ दि.२८/११/२०११ अन्वये प्रती नग रु.२१,१००/- या दराने एक नगाचा पुरवठा आदेश देण्यात आलेला होता. मे. जीवन रेडीओ हाऊस, श्रीरामपुर यांना पुरवठा आदेश गेल्यानंतर त्यांनी दि.२०/०३/२०१२ रोजीचे पत्रान्वये कंपनीने जानेवारी - २०१२ पासून सदर फ्रिजचे उत्पादन बंद केलेले आहे, असे कळविले आहे. त्यामुळे त्यांनी सॅमसंग या कंपनीचे तीन वेगवेगळया मॉडेलचे नविन दर कळविलेले आहे.

मे. जीवन रेडीओ हाऊस, श्रीरामपुर यांनी नविन दर दिल्यामुळे तुलनात्मक तक्त्यातील मे. क्वालीटी रेडीओ सेंटर, कोपरगाव व मे. कोठारी इलेक्ट्रॉनीक्स, कोपरगाव या दोन कोटेशनधारकांकडून देखील नविन दर मागविलेले आहेत. त्यानुसार मे. क्वालीटी रेडीओ सेंटर, कोपरगाव यांनी दि.१०/०४/२०१२ रोजीचे पत्रान्वये व मे. कोठारी इलेक्ट्रॉनीक्स, कोपरगाव यांनी दि.११/०४/२०१२ रोजीचे पत्रान्वये नविन दर दिलेले असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr. No | Description | Qty | Jeevan Radio House, Shrirampur | | Quality Radio Centre, Kopargaon | | Kothari Electronics, Kopargaon | | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | Make / Model | Rate Per in Rs. | Make / Model | Rate Per in Rs. | Make / Model | Rate Per in Rs. | |
| 1 | Refrige-rator 300 Litres | 1 | Samsung 31GeP8 Parsley Silver Colour 303 Ltr. | 22500.00 | Samsung Double Door Frost Free Model – 31GCTS - 303 Ltr. | 24900.00 | Samsung FF Model – RT32BDTS1 315 Ltr. | 23300.00 | |
| | | | **Samsung 31GePN Platinum Inox Colour 303 Ltr.** | **22000.00** | | | | | **22000.00** |
| | | | Samsung 31 HclB Lity Black 303 Ltr. | 24000.00 | | | | | |
| | | | | | | | **Total Amt. in Rs.** | | **22000.00** |

वरीलप्रमाणे नविन दराचे तुलनात्मक तक्त्यात मे. क्वालीटी रेडीओ सेंटर, कोपरगाव व मे. कोठारी इलेक्ट्रॉनीक्स, कोपरगाव यांचे दर देखील वाढलेले असून मे. जीवन रेडीओ हाऊस, श्रीरामपुर यांचे दर निम्नत्तम येतात. त्यांचे नविन दरानुसार सदरचे खरेदीकामी एक नग Samsung (मॉडेल - ३१GePN Platinum Inox Colour ३०३ Ltr.) या कंपनीचा फ्रिज खरेदीकामी रक्कम रु. २२,०००/- इतका खर्च येईल म्हणजेच मागील मंजुर दरापेक्षा नविन दराने फ्रिज खरेदीस रक्कम रु.९००/- इतका जादा खर्च येणार आहे.

तरी मे. जीवन रेडीओ हाऊस, श्रीरामपुर यांचेकडून ०१ नग सॅमसंग कंपनीचा फ्रिज नविन दर प्रती नग रु.२२,०००/- या दराने खरेदीस मान्यता असावी.

**निर्णय क्र.५९९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे मे. जीवन रेडीओ हाऊस, श्रीरामपुर यांचेकडून ०१ नग सॅमसंग कंपनीचा फ्रिज नविन दर प्रती नग रु.२२,०००/- या दराने खरेदी करण्यात यावा असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२८** **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील कर्मचाऱ्यांकरीता गणवेष खरेदी बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील सर्व कर्मचाऱ्यांना प्रशासन शाखा वशी-५/२४२५/२००८ दिनांक २६/०८/२००८ चे परिपत्रकानुसार कायम कर्मचारी वगळता डॉक्टर,मॅनेजर, मेट्रन,सिस्टर इन्चार्ज, स्टाफ नर्स, टेक्निशियन, फार्मासिस्ट, इत्यादींना रुग्णालयामार्फतच गणवेषाचा प्रकार ठरवुन व मंजुरी घेऊन गणवेष शिवुन घ्यावेत असे आदेश होते त्याप्रमाणे मा.व्यवस्थापन सभा दि.०८/०२/२००९ नि.क्र.१०५ अन्वये दोन्ही रुग्णालयातील सर्व कर्मचाऱ्यांना गणवेष खरेदीकामी येणाऱ्या रु.३,७२,०००/- चे खर्चास मान्यता मिळाली होती.

मा.व्यवस्थापन उपसमिती सभा दिनांक ०६/०३/२०१० विषय क्र.३ निर्णय क्र.२७६(१३) नुसार श्री साईनाथ व श्री साईबाबा रुग्णालयातील कर्मचाऱ्यांच्या गणवेषाकरीता मे.बांठीया एन्टरप्रायजेस,पुणे यांचे दर सर्वात कमी असलेने त्यांना इकडील पत्र क्र.जा.क्र.५०३३ दि.२४/०३/२०१० व जा.क्र.५०३२ दि.२४/०३/२०१० अन्वये पुरवठा आदेश देण्यात आला होता. त्यानुसार दि.२७/०८/२०१० अखेर सर्व गणवेष प्राप्त झालेले होते. तसेच सर्व कर्मचाऱ्यांना प्रत्येकी २ सेट गणवेष देण्यात आलेले होते.

दोन्ही रुग्णालयातील सर्व कर्मचाऱ्यांना गणवेष वापरणे गरजेचे असलेने ते रोजच्या वापरामुळे वापरुन फाटलेले/खराब झालेले आहेत त्यामुळे साईनाथ रुग्णालयाने दि.२१/०१/२०१२ अन्वये गणवेषाची मागणी केलेली आहे तसेच श्री साईबाबा रुग्णालयाने दि.२०/०३/२०१२ अन्वये गणवेषाची मागणी केली आहे. त्याची यादी सोबत सादर केलेली आहे सोबतच्या तक्त्यात गणवेषाची रक्कम धरताना दोन वर्षापुर्वी खरेदी केलेल्या किंमतीवर २० % वाढ गृहीत धरुन ते केवळ हिशोबासाठी धरणेत आलेले आहे. प्रत्यक्षात निविदामध्ये प्राप्त होणारे दर हया पेक्षा वेगळे येण्याची शक्यता आहे.

उपरोक्तप्रमाणे दोन्ही रुग्णालयाच्या सर्व मेडीकल, पॅरामेडीकल, व इतर सर्व कर्मचाऱ्यांना गणवेष खरेदीकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.३,४४,५९४/-(रु. तीन लाख चव्वेचाळीस हजार पाचशे चौऱ्यान्नव मात्र) चे खर्चास मान्यता असावी. गतवर्षाचा अनुभव विचारात घेता प्रत्यक्षात होणारा खर्च त्यापेक्षा कमी किंवा जास्त होऊ शकतो.

तरी उपरोक्तप्रमाणे गणवेषची खरेदी ही विहीत पध्दतीने कोटेशन मागवुन खरेदी करणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.६००** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील सर्व मेडीकल, पॅरामेडीकल, व इतर सर्व कर्मचाऱ्यांकरीता आवश्यक असणारे गणवेश विहीत पध्दतीने कोटेशन्स मागवून खरेदी करण्यास व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये रु.३,४४,५९४/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२९** **डॉ.अनुप लहानुभाऊ खर्डे, निवासी वैद्यकीय अधिकारी, श्री साईबाबा हॉस्पिटल यांचे विनापरवानगी गैरहजेरीबाबत.**

**प्रस्ताव-** डॉ. खर्डे हे संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये दि. ०८.०३.२०१२ पासून निवासी वैद्यकीय अधिकारी म्हणुन कार्यरत आहेत. डॉ. खर्डे यांनी दि. १७.०३.२०१२ ते दि. २१.०३.२०१२ अखेर विनावेतन रजा उपभोगल्यानंतर दि. २२.०३.२०१२ रोजी कामावर हजर होणे आवश्यक होते. परंतू त्यांनी दि. २२.०३.२०१२ रोजी दि. २२.०३.२०१२ ते दि. ०१.०४.२०१२ या कालावधीसाठी रजा मागणी अर्ज सादर केला आहे. सदरच्या अर्जावर वैद्यकीय संचालक यांनी दि. २२.०३.२०१२ ते दि. २९.०३.२०१२ रजा देता येईल असा शेरा दिलेला होता. याबाबत डॉ. खर्डे यांना कळविणेकरीता त्यांचे भ्रमणध्वीवर संपर्क साधला असता त्यांनी त्यास प्रतिसाद दिला नाही. तसेच याबाबत त्यांना जा. नं. एसएसएस/ एसएसबीएच/ एचआर/ ९७/ २०१२ दि. ०७.०४.२०१२ अन्वये पत्र पाठवून कळविण्यात आले होते की, सदरचे पत्र मिळताच त्वरीत कामावर हजर व्हावे, अन्यथा तुमचेवर शिस्तभंगाची कारवाई केली जाईल. तरी देखील ते कामावर हजर न झाल्याने वैद्यकीय संचालक यांनी त्याबाबत इकडील कार्यालयास गैरहजेरीबाबत दि. १२.०४.२०१२ रोजीचे निवेदन सादर केले आहे.

त्यास अनूसरुन त्यांना इकडील जा. नं. एसएसएस/वशी ७बी/३३७/२०१२ दि. २३.०४.२०१२ अन्वये रजिस्टर ए. डी. पोस्टाव्दारे कळविण्यात आले की, सदरचे पत्र मिळताच गैरहजेरीबाबतचा लेखी खुलासा सादर करुन सात दिवसांचे आत कामावर हजर व्हावे, अन्यथा तुमचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल. सदरचे पत्र प्राप्त होवून देखील डॉ. खर्डे हे कामावर हजर झाले नाही तसेच गैरहजेरी बाबत लेखी खुलासाही सादर केलेला नाही. त्यामुळे त्यांना पुन्हा इकडील जा. नं. एसएसएस/ वशी ७बी/ ७५६/ २०१२ दि. १२.०५.२०१२ अन्वये रजिस्टर ए. डी. पोस्टाव्दारे कळविण्यात आले की, सदरची नोटिस मिळताच दोन दिवसांच्या आत कामावर हजर व्हावे, अन्यथा तुम्हांस संस्थान सेवेत स्वारस्य नाही असे समजून तुमचे नांव संस्थानचे हजेरीपटावरुन कमी करण्यात येईल. सदरचे पत्र प्राप्त होवून देखील डॉ. खर्डे हे कामावर हजर झाले नाहीत व लेखी खुलासाही सादर केला नाही. त्यामुळे त्यांना नैसर्गिक न्याय तत्वाचे नियमानुसार अंतिम संधी म्हणून इकडील जा. नं. एसएसएस/वशी ७बी/ १०४९/ २०१२ दि. २९.०५.२०१२ अन्वये रजिस्टर ए. डी. पोस्टाव्दारे तिसरे पत्र पाठवून कळविण्यात आले की, तुम्हाला अंतिम संधी देवुन कळविण्यात येते की, सदरचे पत्र मिळताच दोन दिवसाचे आत कामावर हजर व्हावे, अन्यथा तुम्हास संस्थान सेवेत स्वासस्य नाही असे समजुन तुमचे नेमणुक आदेशातील अटी व शर्तीस अनुसरुन तुमचे नाव संस्थानचे हजेरी पटावरुन कमी करण्यात येईल. सदरचे पत्र डॉ. खर्डे यांना प्राप्त झाले परंतू डॉ. खर्डे अदयापपर्यंत कामावर हजर झाले नाहीत व त्यांनी गैरहजेरीबाबत लेखी खुलासाही सादर केलेला नाही. यावरुन डॉ. खर्डे यांना संस्थान सेवेत स्वारस्य नाही असे दिसून येते. येणे प्रमाणे डॉ. खर्डे हे पत्र प्राप्त होवून देखील कामावर हजर झाले नाहीत यावरुन त्यांना संस्थान सेवेत स्वारस्य नाही असे समजण्यास हरकत नाही. अशा परिस्थितीत डॉ. खर्डे यांना संस्थान सेवेत स्वारस्य नाही असे समजून त्यांचे नावं संस्थानचे हजेरीपटावरुन कमी करता येईल.

**निर्णय क्र.६०१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.३०** **श्री साईनाथ रुग्णालयातील चिल्ड्रन वॉर्डकरीता फोम गाद्या खरेदी करणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालयातील चिल्ड्रन वॉर्डमध्ये एकुण २० खाटांची संख्या आहे. सदर वॉर्डसाठी दिनांक ०५/०१/२००५ मध्ये एकुण १२ फोम गादया खरेदी केल्या होत्या सदरच्या गादया सध्या वापरात आहे परंतु त्या वापरुन खुप प्रमाणात फाटलेल्या असल्याने तसेच सदर लिनन विभागात फोमच्या गादया शिल्लक नसल्याने त्यांनी डि.पी.नं.२५१५ दि.०१/०३/२०१२ अन्वये २० नग फोमच्या गादयांची मागणी केली आहे.

सदर गादयांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | तपशील | आवश्यक नग | साईज |
|---|---|---|---|
| १ | फोम गादी | २० नग | लांबी ५३ इंच(१३६ सें.मी.)<br>रुंदी ३४ इंच(३६ सेंमी.) |

उपरोक्तप्रमाणे साधारणतः एक नग गादी खरेदीकरीता साधारणतः रु.१८००/- नग खर्च अपेक्षीत आहे व २० नग गादयांकरीता साधारणतः रु.३६०००/- खर्च अपेक्षीत आहे.

सदर फोमच्या गादयांची खरेदी तातडीची असल्याने सदर गादया विहीत पध्दतीने कोटेशन मागवुन खरेदी करणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.६०२ यावर सविस्तर चर्चा होऊन, साईनाथ रुग्णालयातील चिल्ड्रन वॉर्डकरीता आवश्यक असणाऱ्या २० नग फोम गाद्या कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ३६,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

-----------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.३१ श्री सुधाकर मारुती कुलकर्णी, वर्ग- ०४ कर्मचारी (आरोग्य विभाग) यांचे वैद्यकीय बीलाचा परतावा मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** १. श्री सुधाकर मारुती कुलकर्णी यांचा अपघात दि.०७/०२/२०१० रोजी झाला होता ते रात्री ७ वाजता उपचारासाठी दि.१०/०२/२०१० पर्यंत दाखल झाले होते. परंतु आर्थोपेडीक सर्जन डॉ. भालेराव यांनी विविध तपासण्या केल्यानंतर त्यांना लगेच त्याच दिवशी शस्त्रक्रिया करण्याचा सल्ला दिला होता, परंतु दि.०७/०२/२०१० रोजी शस्त्रक्रिया करणेसाठी Physical Fitness हे सर्टीफिकेट फिजिशियन यांचेकडून घेणे गरजेचे असते परंतु त्यादिवशी डॉ. बी.बी. साबळे हे दि.१२/०२/२०१० पर्यंत रजेवर असल्याने त्या दिवशी व पुढील ४ दिवस शस्त्रक्रिया होऊ शकणार नसल्यामुळे ते दि.१०/०२/२०१० पर्यंत दाखल होते परंतु त्यांना जास्त त्रास होऊ लागल्याने ते स्वत: डिसचार्ज घेऊन अहमदनगर येथील डौले हॉस्पिटल ह्या खाजगी रुग्णालयात उपचार घेऊन शस्त्रक्रिया करुन घेतलेली आहे.

२. श्री सुधाकर मारुती कुलकर्णी यांनी झालेल्या खर्चाचा वैद्यकिय बिलाचा परतावा मिळणेकामीचा अर्ज सादर केला होता तो औषध भांडार विभागास दि.१०/०४/२०१० रोजी प्राप्त झाला होता.

३. श्री सुधाकर मारुती कुलकर्णी यांनी स्वत: डिसचार्ज घेऊन अहमदनगर येथील डौले हॉस्पिटल ह्या खाजगी रुग्णालयात उपचार घेतले होते. सदर हॉस्पिटल मान्यता प्राप्त यादीत नसल्यामुळे प्रकारण नामंजूर प्रकरणात ठेवण्यात आले होते.

४. श्री. कुलकर्णी यांनी दि.१७/१२/२०१० रोजी पुन्हा सदर बीलाचा परतावा मिळणेकामी सविस्तर अर्ज केला होता (तो औषध भांडार विभागास प्राप्त दि.२१/१२/२०१०) परंतु सदर हॉस्पिटल मान्यता प्राप्त यादीत नसल्यामुळे देय होत नाही असे त्यांना देखील समक्ष सांगण्यात आलेले होते.

५. त्यानंतर श्री कुलकर्णी यांनी मा. विश्वस्त डॉ. ए.भा.गोंदकर साहेब यांच्या नावे दि.०६/०९/२०११ रोजीचे अर्जान्वये बील मंजूर करणेबाबत पुन्हा विनंती अर्ज केला होता सदर अर्जावर मा. विश्वस्त यांनी खालील प्रमाणे आदेश केले होते.

सदर प्रकरण तयार करुन मंजूरीसाठी ठेवणे, त्यांचे ॲडमिशन कार्यकाळात Physical Fitness साठी कुणीच डॉक्टर नव्हते हे खरे आहे का? Physical Fitness अभावी ऑपरेशन केले नाही याचा अभिप्राय संबंधीत सर्जनकडून घ्यावा व प्रकरण मंजूरीसाठी ठेवावे.

उपरोक्त आदेशानुसार संस्थान वैदयकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये निर्णय क्र.१३ नुसार रक्कम रु.३१७६०/- पैकी रक्कम रु.२३६३४/- मात्र इतकी विशेष बाब म्हणून देता येऊ शकेल.

६. त्यानूसार वैद्यकिय अधिक्षक यांनी दि.१९/०९/२०११ चे पत्रान्वये श्री कुलकर्णी यांना रुग्णालयात दाखल करुन घेऊन, उपचार सुरु केले. त्या दरम्यान सदर रुग्णावर शस्त्रक्रिया करणे आवश्यक असल्याने, त्याकामी फिजिकल फिटनेस घेणे गरजेचे होते त्यासाठी सदर रुग्णाचे आय पी. पेपरवर दि.०८/०२/२०१० रोजी फिटनेस घेणेबाबतची ऑर्डर करणेत आलेली होती. कारण मेजर शस्त्रक्रिया करणेपूर्वी फिजिकल फिटनेस घेऊनच सर्जरी केल्या जातात.

परंतु डॉ.बी.बी. साबळे फिजिशियन हे दि.०८/०२/२०१० ते दि.१०/०२/२०१० या कालावधीत सुट्टीवर होते. (सदर कालावधीतील हजेरी रजिष्टर तपासले असता दिसून येते.) त्यामुळे सदर रुग्णास फिजिकल फिटनेस घेता आले नाही म्हणून फिजिकल फिटनेस अभावी सदर रुग्णाची शस्त्रक्रिया पुढे ढकलण्यात आली होती.

परंतु सदर कर्मचारी हा दि.१०/०२/२०१० रोजी सायं. ५.४५ वाजता डॉक्टरांच्या सल्ल्याविरुध्द व स्वत:च्या जबाबदारीवर डिसचार्ज घेऊन निघून गेला. त्यामुळे सदर रुग्णास रेफर लेटर दिले गेले नाही. तसेच सदर कर्मचारी रुग्णाने संस्थानने ठरवून दिलेल्या रुग्णालयात पुढील उपचार न घेता अहमदनगर येथील डौले हॉस्पिटलमध्ये उपचार घेतले असल्याचे दिसून येते. त्यामुळे सदर कर्मचारी रुग्णास संस्थान नियमानूसार वैद्यकिय बीलाचा परतावा देय होत नाही, असे कळविलेले आहे. व सोबत उपचार करणारे डॉ. भालेराव व डॉ. झांबरे यांचे पत्र देखील सादर केले होते.

७. मा. विश्वस्त डॉ. ए.भा. गोंदकर साहेब यांचे आदेशानुसार व वैद्यकिय अधिक्षक यांनी दिलेल्या अभिप्रायाचा विचार करुन (फिजिकल फिटनेस साठी फिजिशियन उपलब्ध नव्हते) दि.०२/१२/२०१० चे टिप्पणीन्वये इतर कर्मचाऱ्यांच्या बीला बरोबर एकत्रित मंजूरी साठी प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

८. सदर एकत्रित बिलांच्या मिटींग नोटवरती मा. उप कार्यकारी अधिकारी साहेब यांनी श्री साईबाबा रुग्णालयात सदर शस्त्रक्रिया होऊ शकत होती किंवा कसे ? असे सुचविले होते. त्यानूसार डॉ.जपे -

आर्थोपेडीक तज्ञ, श्री साईबाबा हॉस्पिटल यांनी दि.०२/०१/२०१२ रोजी सदर शस्त्रक्रिया श्री साईबाबा रुग्णालयात होऊ शकत होती असा अभिप्राय दिला होता.

९. श्री कुलकर्णी यांनी डौले हॉस्पिटल अहमदनगर येथे जाणेपुर्वी श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये सदरची शस्त्रक्रिया होऊ शकत होती किंवा कसे? याबाबत प्रथम चौकशी करुन जर श्री साईबाबा रुग्णालयात त्यांना शस्त्रकिया होत नाही असे सांगितले असते तरच त्यांनी डौले हॉस्पिटल येथे जाणे गरजेचे होते परंतु श्री कुलकर्णी हे थेट डौले हॉस्पिटलमध्ये स्वत:च्या मर्जी नुसार गेलेले आहे.त्यामुळे सदर बीलाचा परतावा देय होत नाही. परंतु मा. विश्वस्त डॉ. ए.भा. गोंदकर साहेब यांनी सर्जन यांचा अभिप्राय घेऊन प्रकरण मंजूरीसाठी ठेवावे असे सूचविले होते.

तरी उपरोक्त बीलाबाबत पुढील निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६०३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री सुधाकर मारुती कुलकर्णी, वर्ग ४ कर्मचारी (आरोग्य विभाग) यांनी वैद्यकीय बीलाचा परतावा मिळणेबाबत केलेली विनंती अमान्य करण्यात आली.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.३२** **श्री साईबाबा रुग्णालयातील निरुपयोगी लिनन साठा रजिस्टरमधून निर्लेखित करणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलचे लिनन विभागामध्ये सर्व वॉर्ड/ ओ.टी.चे अतीशय जीर्ण व रक्ताच्या डागांनी खराब झालेले तर काही फाटलेल्या अवस्थेत निरुपयोगी कपडे जमा झाले आहेत. सदरचे लिनन हे २००८ ते २०११ साली खरेदी करण्यात आलेले असुन सदरचे लिनन वापरुन ४ वर्षाचा कालावधी झालेला आहे त्यामुळे ते वापरुन खराब झालेले आहे.

यापुर्वी दिनांक ०१/०४/२०११ ते ३०/०९/२०११ पर्यंतचे सर्व वॉर्ड/ओ.टी.चे लिनन मा.व्यवस्थापन सभा दिनांक १४/०१/२०१२ निर्णय क्रमांक ४९ अन्वये रु.३,३२,२२९ /- रकमेचे लिनन नष्ट केलेले असुन, दिनांक ०१/१०/२०११ ते ३१/०३/२०१२ पर्यंतचे विविध वॉर्ड/ओ.टी.तुन निकामी लिनन जमा झालेले आहे त्याचा तक्ता सोबत सादर केला आहे. सदर लिनन खरेदीची एकुण किंमत रु. २,५०,४८०/- इतकी आहे, परंतु सदर लिनन हे फाटलेल्या व खराब अवस्थेत असल्याने सध्या परिस्थितीत त्याची किंमत शुन्य आहे. सदरचे लिनन वापरण्यास निरुपयोगी असलेबाबतची सहा.अधिसेविका व वैद्यकीय संचालक यांनी प्रत्यक्ष पाहणी केली आहे. सदरचे लिनन वापरण्यास योग्य नसल्यामुळे ते नष्ट करुन साठा रजिष्टरमधुन निर्लेखीत करणे गरजेचे आहे. तसेच सदर लिननमध्ये एकुण ५ गादया खराब झालेल्या आहेत सदर गादया लिनन स्टॉकमधुन कमी करुन रेकॉर्ड विभागामार्फत जाळण्यास परवानगी मिळावी ही विनंती.

तरी सोबतच्या तक्त्यातील लिनन हे साठा रजिष्टरमधुन नष्ट केलेले आहे.

**निर्णय क्र.६०४** **यावर सविस्तर चर्चा होऊन,प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे श्री साईबाबा रुग्णालयातील निरुपयोगी लिनन साठा रजिस्टरमधून निर्लेखित करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.३३** **मिटींग हॉलमध्ये प्रेझेंटेशनसाठी एल.सी.डी प्रोजेक्टर व स्क्रीनचे जादा खर्चाबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दि. १९.११.२०११ चे सभेतील निर्णय क्र. ८३३ अन्वये साउंड सीस्टीमसाठी मटेरीयल खरेदीकामी विहीत पध्दतीने दरपत्रके मागविणेस व त्याकामी येणारे अंदाजे रु. ४,९०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

संस्थानचे ध्वनीक्षेपन सी.सी.टीव्ही विभाग यांचेकडील दि. १८.०१.२०१२ चे पत्राने खालीलप्रमाणे साउंड सीस्टीमसाठी मटेरीयल खरेदी करुन मिळणेस कळविले होते.

| अ.नं. | मटेरीयल वर्णन | कंपनी | मागणी संख्या |
|---|---|---|---|
| ०१ | Roof Hanging LCD Projector<br>मॉ.नं.VPLFH ३०<br>WUXCA-४३००- Lumens HDMI | सोनी | ०२ |
| ०२ | रिमोट कंट्रोलवर ऑपरेट होणारी स्क्रीन साईज ८x१० | --- | ०२ |
| ०३ | Roof Adjustment ceiling bracket | --- | ०२ |

वरील साहित्य खरेदीकामी जा.नं.एसएसएस-खरेदी-ध्वनी.- ५२९१ दि.२४.०१.२०१२अन्वये ध्वनीक्षेपन सी.सी. टीव्ही विभागाकडून प्राप्त झालेल्या २४ पुरवठाधारकांकडून दरपत्रके मागणी करण्यात येऊन त्यांची मुदत १४.२.२०१२ अखेर देण्यात आली होती. त्यानुसार खालीलप्रमाणे मुदतीत ५ दरपत्रके प्राप्त झाली होती. प्राप्त ५ दरपत्रके मा. व्यवस्थापन उपसमितीचे दि. ०४.०३.२०१२ चे सभेत उघडणेत आली. प्राप्त दरपत्रकांचा तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला. त्यात मंजूर रक्कमेपेक्षा जादा रु. २,३६,९७२/- मात्र खर्च आला आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे दि. २५.०३.२०१२ चे सभेतील निर्णय क्र. २५८ (३ ) अन्वये जादाचे खर्चाबाबत खालीलप्रमाणे निर्णय संमत झालेला आहे.

वरील साहित्य दरपत्रके उघडून तुलनात्मक तक्ता तयार करण्यत येऊन त्यात मे. जे.जे.मेहता यांचा दर न्युनतम असल्याने त्यांना पुरवठा आदेश देणेत यावा, मा. व्यवस्थापन समितीची रु. ४,९०,०००/-

मात्रचे खर्चास मान्यता आहे. वरील रक्कम ही मंजूर रक्कमेपेक्षा रु. २,३६,९७२/- मात्र ने जादा आहे.त्यासाठी येणा-या जादाचे खर्चास मा. व्यवस्थापन समितीचे सभेत विषय सादर करण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. असे नमुद केले आहे.

तरी मे. जे.जे.मेहता यांना निम्नतम दर रु. ७,२६,९७२/- मात्रचा पुरवठा आदेश देणेत आलेला आहे. वरील रक्कम ही मंजूर रक्कम रु. ४,९०,०००/- चे रक्कमेपेक्षा रु. २,३६,९७२/- मात्र ने जादा आहे. जादाची रक्कम रु. २,३६,९७२/- ( अक्षरी रुपये दोन लाख,छत्तीस हजार नऊशे,बाहत्तर ) मात्रचे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.६०५ यावर सविस्तर चर्चा होऊन, मिटींग हॉलमध्ये प्रेझेंटेशनसाठी एल.सी.डी प्रोजेक्टर व स्क्रीनचे खरेदीस व याकामी जादा येणारे रक्कम रुपये २,३६,९७२/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

---

**विषय नं.३४ साऊंड सिस्टीमसाठी टी.व्ही केबल खरेदी बाबत**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समितीचे दि. २५.०३.२०१२ चे सभेतील निर्णय क्र. २५८(४) अन्वये साई आश्रम ए व बी इमारतीमध्ये साउंड सीस्टीमसाठी खालील टीव्ही केबल खरेदीकामी पुरवठा आदेश देणेत आले होते.

**१) मे. इशन इलेक्ट्रीकल एन्टरप्राईझेस, मुंबई** यांना जा.नं.एसएसएस-खरेदी-ध्वनी.- ४०४ दि.२४.०४.२०१२ अन्वये खालीलप्रमाणे साउंड सीस्टीमसाठी टीव्ही केबल पुरविणेकामी पुरवठा आदेश देणेत आलेला आहे.

| अ.नं. | तपशिल | कंपनी | मागणी मीटर | दर व्हॅटसह | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | सींगल मोड सीक्स कोअर फायबर ऑप्टीक अर्माड केबल | डी लीक | २,५०० मीटर | २३.१० | ५७,७५०/- |

मे. इशन इलेक्ट्रीकल एन्टरप्राईझेस,मुंबई यांचे दि. २८.०४.२०१२ चे पत्रात आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत कॉपरचे दिवसेंदिवस भाव वाढत असल्याने कोटेशन दरामध्ये केबल पुरवठाकामी दर वाढ मागितली आहे.

त्यात केबल पुरविणेचे कोटेशनमध्ये देऊ केलेला दर रु. २३.१० पैसे हा दि. २९.०२.२०१२ अखेर होता. त्यामुळे त्यांनी दि. २८.०४.२०१२ चे पत्राने वाढीव दर रु. २८.०० अधीक व्हॅट ५% रु. २९.४० पैसे प्रति रनिंग मिटरचा सुधारित दर दिला आहे. निविदेतील मंजूर दर व आता दिलेला वाढीव दर यामध्ये प्रति रनिंग मिटर साठी रु. ६.३० पैसे असा जास्तीचा फरक आहे. एकूण २५०० मिटर केबलससाठी एकूण रु. १५,७५०/- जादा खर्च येणार आहे.

**२) मे. न्यू कॉन्टीनेंटल ट्रेडर्स, मुंबई** यांना जा.नं.एसएसएस-खरेदी-ध्वनी.- ४०५ दि.२४.०४.२०१२ अन्वये खालीलप्रमाणे साउंड सीस्टीमसाठी टीव्ही केबल पुरविणेकामी पुरवठा आदेश देणेत आलेला आहे.

| अ.नं. | तपशिल | कंपनी | मागणी मीटर | दर व्हॅटसह | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | १.५ स्क्वे.एम.एम. कॉपर अर्माड टु कोअर केबल | पॉलीकॅब | ३,००० मीटर | ४४.१९ | १,३२५७०/- |

मे. न्यू कॉन्टीनेंटल ट्रेडर्स, मुंबई यांनी दि. ०२.०५.२०१२ चे पत्रात चालू केद्रीय अंदाजपत्रकामध्ये केबल उत्पादकधारकांनी एक्साईज डयूटी दरात वाढ झाली असल्याचे कळवून मंजूर कोटेशन दरामध्ये दरवाढ मागितली होती. निविदेतील मंजूर दर व आता दिलेला वाढीव दर रु.६०/- यामध्ये प्रति रनिंग मिटर साठी रु.१५.८१ पैसे असा जास्तीचा फरक आहे. एकूण ३००० मिटर केबलससाठी एकूण रु.४७,४३०/- जादा खर्च येणार आहे. असा एकूण वरील दोन्ही प्रकारच्या केबल खरेदीकामी जादाचा रु. ६३,१८०/- मात्र जादा खर्च अपेक्षित आहे.

तरी वरील अ.नं. १ व २ प्रकारच्या केबल खरेदीकामी फेर दरपत्रके मागविणेस व त्याकामी येणारे अंदाजे रु.३,००,०००/- मात्रचे खर्चास निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.६०६ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**(कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

---

**विषय नं.३५ श्री साईनाथ रुग्णालय तळमजल्यावरील संडास, बाथरुमचे खिडक्यांना लोखंडी जाळया बसविणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालय मधील संडास-बाथरुम हे इमारतीच्या पाठीमागील बाजूस स्वतंत्रपणे असून सदर संडास-बाथरुमला खिडक्यांना फायबरच्या काचा बसविणेत आलेल्या होत्या. काही ठिकाणी तळमल्यावरील संडास-बाथरुमच्या खिडक्यांना सध्या काचा नसून, ज्या खिडक्यांना अशा प्रकारच्या काचा आहेत त्या हाताने काढून टाकल्या जातात. त्यामुळे बाथरुमचा वापर करणा-या रुग्ण व नातेवाईकांना विशेषतः लेडीज पेशंट / नातेवाईकांना सदर बाथरुमचा वापर करतांना अडचणी येतात. संडास-बाथरुमच्या पाठीमागील बाजूस वॉल कंपाऊंड असून, सदर वॉल कंपाऊंडच्या भिंतीची उंची कमी आहे. तसेच त्याबाजूला वर्दळ नसल्याने, व रुग्णालयाच्या पश्चिमेकडील वॉलकंपाऊंडला पलीकडील रहिवाशांना आत येण्यासाठी नव्याने

गेट तयार करणेत आल्याने, रुग्णालयच्या पश्चिमेकडील असलेल्या लोकवस्तीमधील काही अज्ञात व्यक्ती पहाटेच्या वेळी सदर ठिकाणी येऊन खिडकीतून आतमध्ये हात घालणे, तसेच आतमध्ये डोकावणे असे प्रकार होत असल्याच्या रुग्ण व नातेवाईकांच्या तक्रारी येतात. त्यासाठी श्री साईनाथ रुग्णालय इमारतीच्या संडास-बाथरुमच्या खिडक्यांना लोखंडी जाळया बसवून मिळणेकामी श्री साईनाथ रुग्णालयाने उपरोक्त संदर्भान्वये कळविले आहे.

श्री साईनाथ रुग्णालय इमारतीच्या संडास-बाथरुमच्या खिडक्यांना लोखंडी जाळया बसविण्याचे काम बाहेरील फॅब्रिकेटर्स / वर्कशॉपधारकांकडून करुन घेणेकामी खालीलप्रमाणे मटेरीअल व खर्च अपेक्षित आहे.

| अ.क्र. | तपशील / साईज | मागणी | दर (अंदाजे) | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१) | एम.एस.अँगल,<br>साईज :- २५ x २५ x ३ एम.एम. | १२४५<br>किलो. | रु. ६०/-<br>(प्रति किलो) | ७४,७००.०० |
| ०२) | एम.एस.स्क्वेअर जाळी,<br>साईज :- २५ x २५ x ४ एम.एम.<br>(३` उंचीची) | ८५०<br>रनिंग फूट | रु. ६५/-<br>(प्रति रनिंग फूट) | ५५,२५०.०० |
| | | | **पुर्णांकित रक्कम** | **१,२९,९५०.००** |

उपरोक्तप्रमाणे श्री साईनाथ रुग्णालय इमारतीच्या संडास-बाथरुमच्या खिडक्यांना लोखंडी जाळया बसविण्याचे काम बाहेरील फॅब्रिकेटर्स /वर्कशॉपधारकांकडून तयार करुन घेणेसाठी अंदाजे रक्कम रु. १,२९,९५०/- इतका खर्च अपेक्षित आहे.

सदर प्रस्तावास मान्यता मिळणेस व बाहेरील फॅब्रिकेटर्स / वर्कशॉपधारकांकडून कोटेशन बोलावून उपरोक्त काम करुन घेणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६०७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे श्री साईनाथ रुग्णालय इमारतीच्या संडास-बाथरुमच्या खिडक्यांना लोखंडी जाळया बसविण्याचे काम बाहेरील फॅब्रिकेटर्स/ वर्कशॉपधारकांकडून कोटेशन्स मागवून करुन घेणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रु.१,२९,९५०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.३६** **चहा कँटीनमधील जुने बॉटलकुलर बायबॅक करुन नवीन बॉटलकुलर खरेदी करणे बाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानचे मुख्य चहा कॅन्टीन व नविन भक्तनिवासस्थान (५०० रुम) कन्टीनकरीता दुध साठविणे व टिकवून ठेवणेकामी बॉटलकुलरचा वापर करण्यात येतो. सध्या वापरात असलेले बॉटलकुलर विद्युत विभागामार्फत दि.२०-०६-२००५ मध्ये मे.आर.टी.कराचीवाला, अहमदनगर यांचेकडून ब्लू स्टार मेक बॉटलकुलर ३०० लिटर क्षमतेचे ०२ नग खरेदी करण्यात आलेले होते. सदरचे बॉटलकुलरचा ७ वर्षापासून रात्रंदिवस वापर चालू असल्यामुळे सततच्या वापराने ते निकामी झालेले आहेत. विद्युत विभागामार्फत वारंवार दुरुस्तीही करण्यात आलेली आहे. मागील वर्षी दोन्ही बॉटलकुलरचा तळाकडील पत्रा खराब झाल्याने विद्युत विभागामार्फत नविन पत्रा बसवून व कलर करुन घेण्यात आलेले होते. परंतू सततच्या ओलाव्याने तळाकडील पत्रा व आतील बॉडी पुन्हा खराब झालेली आहे.

कमी गर्दीचे काळात मुख्य कॅन्टीनला दररोज सरासरी १,५०० लिटर दूध लागते, त्याचप्रमाणे ५०० रुम कॅन्टीनला दररोज सरासरी ८०० लिटर दूध लागते. दिवसेंदिवस साईभक्तांचे गर्दीचे प्रमाण वाढत असून उत्सव गर्दीचे काळात मुख्य कॅन्टीनला दररोज सरासरी १८०० ते २००० लिटर गाय दुध आवश्यकतेनुसार खरेदी करण्यात येते. तसेच ५०० रुम कॅन्टीनला उत्सव व गर्दीचे काळात १००० लिटर गाय दूध खरेदी करावे लागते. सध्या वापरात असलेले ०२ नग बॉटलकुलर ३०० लिटर क्षमतेचे असून दोन्ही मध्ये फक्त ६०० लिटर दूध साठविले जाते. व उर्वरित दूध कॅन्टीनकडील मोठया अॅल्युमिनियमच्या पातेल्यात तापवून गार करुन ठेवण्यात येते.

सध्या उन्हाळा ऋतू सुरु झाल्याने दूध खराब होण्याची शक्यता नाकारता येत नाही. ३०० लिटर क्षमतेचे ०५ नग बॉटलकुलर खरेदी करुन मुख्य कॅन्टीनसाठी ०३ नग बॉटलकुलर व ५०० रुम कॅन्टीनसाठी ०२ नग बॉटलकुलर ठेवता येईल. चहा कॅन्टीन करीता होणारा वाढीव दूधपुरवठा व दूध साठविण्याची सध्याची अडचण लक्षात घेता कॅन्टीन कडील जुने बॉटलकुलर विद्युत विभागामार्फत परत करुन (बायबॅक) कॅन्टीन करीता आडवे ०५ नग मोठया क्षमतेचे बॉटलकुलर खरेदी करणे अत्यंत गरजेचे आहे. सदरचे बॉटलकुलर विद्युत विभागाचे डेडस्टॉकला असल्याने बॉटलकुलर बाबत तांत्रिक बाबीं विषयींची माहिती विद्युत विभागाकडे असून विद्युत विभागामार्फत खरेदी करावे लागणार आहे. अशा प्रकारची संदर्भीय पत्रान्वये कॅन्टीन विभागाने बॉटलकुलरची मागणी केलेली आहे. कॅन्टीन विभागातील सध्या वापरात असलेले ०३ नग बॉटलकुलर व ०१ नग स्टॅबिलायझर बायबॅक करुन सदर ठिकाणी नवीन बॉटलकुलर खरेदी करावे लागणार आहे.

**०१). कॅन्टीन विभागाकडे वापरात असलेले जुने बॉटलकुलर बायबॅक करणेबाबत तपशील :-**

| अ.क्र. | बायबॅक तपशील | संख्या | घसारा किंमत | एकुण घसारा रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१) | ब्लू स्टार मेक, व्हर्टीकल टाईप, बॉटलकुलर, क्षमता :- ३०० लिटर | ०२ नग. | रु. ९,८४२.२१ | रु. ९,८४२.२१ |
| ०२) | व्होल्टास मेक, व्हर्टीकल टाईप, डि-फ्रिजर, क्षमता :- ३०० लिटर | ०१ नग. | रु. ५,२६०.२५ | रु. ५,२६०.२५ |
| ०३) | व्होल्टास मेक, स्टॅबिलायझर | ०१ नग. | रु. ०,०९६.२७ | रु. ०,०९६.२७ |

**०२). कॅन्टीन विभागाकडील जुने बॉटलकुलर ०३ नग व ०१ नग स्टॅबिलायझर बायबॅक करुन नविन बॉटलकुलर खरेदी करणेकामी येणा-या खर्चाचा तपशील पुढीलप्रमाणे.**

| अ.क्र. | तपशील / साईज | मागणी | दर (अंदाजे) | होणारी रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१) | व्होल्टास मेक, बॉटलकुलर, क्षमता :- ५०० लिटर, | ०५ नग. | रु. ६०,०००/- | रु. ३,००,०००/- |
| | | | एकुण रक्कम रुपये : | रु. ३,००,०००/- |

उपरोक्तप्रमाणे कॅन्टीन विभागाकडील जुने ०३ नग बॉटलकुलर व ०१ नग स्टॅबिलायझर बायबॅक करणेकामी तपशीलाप्रमाणे एकुण घसारा किंमत रुपये १५,१९८.७३ इतकी आहे. तसेच नविन खरेदी कराव्या लागणा-या बॉटलकुलर साठी एकुण अंदाजे रक्कम रुपये ३,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. तरी सदर बायबॅक कराव्या लागणा-या जुन्या बॉटलकुलर व स्टॅबिलायझर किंमत वजा करुन नविन बॉटलकुलर खरेदी करणेकामी अंदाजे रक्कम रुपये २,७४,८०१.२७ मात्र खर्च अपेक्षित आहे.

तरी चहा कॅन्टीनमधील जुने बॉटलकुलर बायबॅक करुन नवीन बॉटलकुलरची खरेदी कोटेशन मागवून खरेदी करणेस व येणा-या खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६०८ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे कॅंटीन विभागाकडील जुने बॉटलकुलर बायबॅक करुन नवीन बॉटलकुलर कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये २,७४,८०१.२७ मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-विद्युत विभागप्रमूख)

---

**विषय नं.३७ श्री साईबाबा संस्थानचे सर्व इमारतीमधील फॅन,टयुब साफसफाई व मेंटेनन्स करणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री समाधी मंदिरात, दर्शनलाईन हॉल, मंदिर परीसर, शांतिनिवास मधील कार्यालये, साईप्रसाद ०१ व ०२, अतिथीगृह, साईउदयान, सेवाधाम, शांतिनिकेतन, ५०० रुम, शैक्षणिक संकुल, श्री साईबाबा हॉस्पीटल, श्री साईनाथ रुग्णालय, व्दारावती इमारत, श्री साई प्रसादालय या सर्व ठिकाणी साईभक्तांकरीता साधारणत: ४४०० नग सिलींग फॅन, एक्झॉस्ट फॅन, स्टॅण्ड फॅन व साधारणत: ६१०० नग टयुब लाईट बसविलेल्या आहेत. या सर्व उपकरणांचा २४ तास वापर चालू असल्याने वातावरणातील धुळीकणांनी सर्व फॅन व टयुब खराब होतात. त्यामुळे सर्व विभागांची सिलींग फॅन, एक्झॉस्ट फॅन, स्टॅण्ड फॅन, टयुब साफसफाई व सर्व्हिसिंग करणेबाबत मागणी येत राहते. विद्युत विभागातील दैनंदिन मेन्टेनन्स कामे, वायरींग, इलेक्ट्रीक तक्रारींचे निवारण करणे, यामुळे फॅन, टयुब साफसफाईची व सर्व्हिसिंगची कामे पूर्ण करता येत नाही. त्यामुळे साई भक्तांचा संस्थानकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलतो.

त्याकरीता फॅन, टयुब साफसफाईची कामे वेळेत पूर्ण होण्याकरीता आऊटसोर्स पद्धतीने काम करुन घेता येईल. फॅन व टयुब मेन्टेनन्सकरीता येणा-या खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे.

| अ. क्र. | कामाचा तपशील | ठिकाण | संख्या | १ वर्षात साफसफाई करण्याची वेळ | दर (अंदाजे) | एकुण किंमत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१) | टयुब लाईट साफ करणे, सिलींग फॅन, एक्झॉस्ट फॅन, स्टॅण्ड फॅनची साफसफाई करणे व गरज भासल्यास सर्व्हिसिंग करणे. | समाधी मंदिर, चावडी, व्दारकामाई, म्युझिअम हॉल, सभामंडप | टयुबलाईट ६०० नग | १५ दिवसात ०१ वेळा | रु. ७/- | रु. १,००,८००/- |
| | | | सर्व प्रकारचे फॅन ४००नग | १५ दिवसात ०१ वेळा | रु. ७/- | रु. ०,६७,२००/- |
| | | शांतीनिवास भक्तनिवास दर्शनलाईन व अतिथीगृह इमारत व मंदिर परिसर | टयुबलाईट ५०० नग | महिन्यात ०१ वेळा | रु. ७/- | रु. ०,४२,०००/- |
| | | | सर्व प्रकारचे फॅन ५००नग | महिन्यात ०१ वेळा | रु. ७/- | रु. ०,४२,०००/- |
| | | साईउद्यान इमारत, मंगल कार्यालय, कनिष्ठ महाविद्यालय, साईप्रसाद नं.०१ व ०२, मुख्य भांडार सर्व ठिकाणचे जनरेटर रुम, साईनाथ छाया,सेवाधाम, भक्तनिवासस्थान (५०० रुम), शैक्षणिक संकुले | टयुबलाईट ५००० नग | ०६ महिन्यात ०१ वेळा | रु. ७/- | रु. ०,७०,०००/- |
| | | | सर्व प्रकारचे फॅन ३५००नग | ०६ महिन्यात ०१ वेळा | रु. ७/- | रु. ०,४९,०००/- |
| | | वरील सर्व फॅन पैकी गरज भासल्यास सर्व्हिसिंग करणे. | ५०० नग | - | रु.५०/- | रु. ०,२५,०००/- |
| | | | | **एकुण रक्कम :-** | | **रु. ३,९६,०००/-** |

सदर खर्च हा प्रती नग दाखविलेला असल्याने कंत्राटदार हा कितीही मनुष्यबळ वापरु शकतो, त्याचे खर्चाचे बंधन संस्थानवर राहणार नाही. फक्त कंत्राटदाराने आपण दिलेल्या संख्येइतके काम त्या मर्यादित कालावधीत पूर्ण करणे गरजेचे राहील. वरील साहित्य साफसफाई करतांना रिपेअरींग व मेन्टेनन्ससाठी लागणारे नविन साहित्य (जसे फॅन नटबोल्ट, फॅन रबरी गट्टे इ.) संस्थानमार्फत पुरविण्यात येईल. उपरोक्तप्रमाणे सर्व कामे एका वर्षासाठी कंत्राटी पद्धतीने करण्यासाठी अंदाजे रक्कम रुपये ३,९६,०००/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

तरी सदरचे काम कंत्राटी पद्धतीने एक वर्षासाठी ठेकेदाराकडून करुन घेणेस व येणा-या खर्चास मान्यता मिळावी, ही विनंती.

**निर्णय क्र.६०९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे श्री साईबाबा संस्थानचे सर्व इमारतीमधील फॅन,टयुब साफसफाई व मेंटेनन्सचे काम एक वर्षासाठी ठेकेदाराकडून कंत्राटी पध्दतीने करुन घेण्यास व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ३,९६,०००/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख

---

**विषय नं.३८** **डिझेल वाहतूकीकरीता ट्रॉलीसह टाकी खरेदी करणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थानचे मंदिर परीसर, ५०० रुम, साईनगर, धर्मशाळा, श्री साई प्रसादालय, साठवण तलाव याठिकाणी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचा सप्लाय खंडीत झाल्यानंतर पर्यायी वीजपुरवठयासाठी जनरेटरसेट बसविण्यात आलेले आहेत. महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचे दररोज ०६ ते १२ तास भारनियमन असते. याव्यतिरिक्त तातडीचे भारनियमन वेगळेच जसे भारनियमन वाढेल त्याप्रमाणात डिझेलची मागणी वाढते. आपल्याला भारनियमनाच्या कालावधीनुसार दररोज कमीत-कमी ५०० ते जास्तीत जास्त १५०० लिटर पर्यंत डिझेल हे शिर्डी, सावळविहीर येथील पेट्रोल पंपावरुन तसेच टंचाई काळात बाहेरगावच्या पेट्रोल पंपावरुन देखील डिझेल खरेदी करुन जनरेटर चालवावे लागते.

डिझेल वाहतुकीसाठी आतापर्यंत आपण संस्थानच्या ४०७ या ट्रकमध्ये २०० लिटर क्षमतेच्या टाक्या ठेऊन त्यामध्ये डिझेल आणतो. या डिझेल टाक्या गाडीतून प्रत्येक जनरेटर रुमला खाली कराव्या लागतात. ट्रकची / गाडीची उंची जास्त असल्याने टाक्या गाडीतून खाली घेतांना दबल्या जाऊन खराब होतात. कालांतराने त्यामधून बॅरलला चीर जाऊन डिझेल गळती होते. त्यामुळे गाडीमध्ये सर्वत्र डिझेल पसरुन या गाडीचा दुस-या कामासाठी उपयोग करता येत नाही. तसेच टाक्या वारंवार खराब होत असल्याने वर्षभरात ०५ झोनसाठी दरवेळेस ०६ टाक्या याप्रमाणे आपल्याला १०० ते १५० लोखंडी बॅरल खरेदी करावे लागतात. एका रिकाम्या बॅरलची किंमत अंदाजे रु.७००/- इतकी असून वर्षाला १०० ते २०० बॅरल लागतात.

यासाठी वॉटर टँकप्रमाणे डिझेल ट्रॉली टाकीसह असल्यास व त्यावर डिझेल मापक सयंत्र लावल्यास आपणाला पंपावरुन आणलेले डिझेल प्रत्येक झोनसाठी मोजून देता येईल. डिझेल टाक्यांचा खर्च वाचेल व डिझेल वाहतूक धोका विरहित करता येईल. शिवाय ट्रकमध्ये डिझेल टाकी सांडल्याने त्या ट्रकचा वापर मर्यादित होत होता (भाजीपाला वगैरेसाठी) तो थांबेल. या प्रकारचा डिझेल वाहतुक ट्रॉलीसह टाकी नाशिक येथे भरलेल्या औद्योगिक प्रदर्शनात या संदर्भात चौकशी केली असता फक्त ट्रॉलीसह टाकीची किंमत अंदाजे रक्कम रुपये ३,९०,०००/- इतकी असल्याचे सांगितले. याबाबत मा.व्यवस्थापन समितीच्या दि.२६-०३-२०११ रोजी झालेल्या सभेतील विषय नं.२६ निर्णय क्र.२३६ अन्वये हा विषय स्थगित ठेवण्यात आला होता.

डिझेल वाहतुकीसाठी ट्रॉलीसह टाकी खरेदी करणे अत्यंत गरजेचे असल्याने सदरचा ट्रॉलीसह टाकी खरेदी कोटेशन मागवून करणेस व त्यासाठी येणा-या अंदाजे रक्कम रु.३,९०,०००/- मात्र खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६१०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद डिझेल वाहतुकीसाठी ट्रॉलीसह टाकी कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रु.३,९०,०००/- मात्र खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-विद्यूत विभागप्रमुख)

---

**विषय नं.३९** **पाणीपुरवठा विभाग कार्यालयात ए.सी. बसविणे बाबत**

**प्रस्ताव-** पाणीपुरवठा विभागाचे संदर्भीय पत्रानुसार पाणीपुरवठा विभागाचे कार्यालयासाठी संस्थानचे शांतीनिवास इमारतीमध्ये तिस-या मजल्यावर कार्यालय देण्यात आलेली आहे. सदरच्या रुममध्ये नैऋत्य दिशेकडील कोप-यामध्ये विभाग प्रमुख यांना कामकाज करणेसाठी कॅबीन बनविण्यात आलेली आहे. सदरच्या कॅबीनमध्ये जाणेसाठी उत्तर दिशेस दरवाजा बनविण्यात आलेला आहे. दरवाज्यासमोर रुमकरीता दोन दरवाजे असल्याने त्यामधून गरम हवा कॅबीनमध्ये येते. कॅबीनच्या दक्षिण दिशेकडील बाजूस खालील दर्शन रांगेचा स्पेस मोकळा असल्याने व त्यामधून दर्शनरांगेतील साईभक्तांचे वावराने गरम हवा वर येत असल्याने सदरची बाजू कायमस्वरुपी बंद करण्यात आलेली आहे. त्यामुळे उत्तर दिशेकडून येणारी गरम हवा कॅबीनमध्ये येऊ नये यासाठी कॅबीनचा दरवाजा बंद करुन घ्यावा लागतो. तर दक्षिण बाजूस दर्शन रांगेचा स्पेस मोकळा असल्याने ती बाजू बंद केलेली आहे. यामुळे सदरच्या कॅबीनमध्ये हवा खेळती नसल्याने उबट वातावरण तयार होते. उन्हाळयात याचा मोठया प्रमाणावर त्रास होतो. याकरीता सदरच्या कॅबीनमध्ये ए.सी.बसविल्यास कॅबीनमधील वातावरण आल्हाददायक राहील. तरी पाणीपुरवठा विभागाने

त्यांचे कार्यालयामध्ये तयार करण्यात आलेल्या कॅबीनमधील हवा थंड राहावी म्हणून ए.सी.बसवून देणेबाबत मागणी केलेली आहे.

विद्युत विभागाकडे सध्या ए.सी.शिल्लक नसल्याने ए.सी.खरेदी करुन बसवून दयावा लागणार आहे. खरेदी कराव्या लागणा-या ए.सी.चा तपशील खालीलप्रमाणे.

| Sr.No. | Discription | Qty. | Rate | Amount |
|---|---|---|---|---|
| 01) | Voltas Make,<br>3 Star, Air Conditionar<br>Capacity : 1.1/2 TR. | 01 Nos. | Rs. 38,500/- | **Rs. 38,500/-** |

सदरील ए.सी.दुकानदारांकडून कोटेशन मागवून खरेदी करावा लागणार असून याकामी अंदाजे रक्कम रुपये ३८,५००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

सदर प्रस्तावावर विचार होऊन प्रस्तावास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६११ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे पाणीपुरवठा विभाग कार्यालयात ए.सी. कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ३८,५००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.४० श्री साईप्रसादालय पश्चिम बाजूचे वाहनतळाचे विद्युतीकरणाचे टेंडर व्यतिरिक्त कामातील बीलाच्या रकमेस मान्यता मिळणे बाबत**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक १०-१०-२०१० रोजी झालेल्या सभेत विषय क्र.०५ निर्णय क्र.७९१ अन्वये श्री साई प्रसादालय पश्चिम बाजूचे वाहनतळाचे स्ट्रीट लाईट पोल व इलेक्ट्रीकल काम करुन देणेकामी मे.ज्योत इलेक्ट्रीकल इंजिनिअर ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर,नाशिक यांना जा.नं.एसएसएस / विद्युत / ९९७९ / २०१० दि.१७-१०-२०१०अन्वये रू.४,२८,६७०/- इतक्या रक्कमेचा कार्यादेश देण्यात आलेला आहे. त्यानुसार मे.ज्योत इलेक्ट्रीकल इंजिनिअर ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर, नाशिक यांनी दि.३०-०५-२०११ रोजी काम पूर्ण केलेले असून दि. २०-०५-२०११ चे पत्रान्वये फायनल बील सादर केलेले आहे. मे.ज्योत इलेक्ट्रीकल इंजिनिअर ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर, नाशिक यांनी सादर केलेल्या फायनल बीलामध्ये टेंडरनुसार रक्कम रुपये ३,०५,८०९/- इतक्या रकमेचे काम झालेले असून टेंडर व्यतिरिक्त रक्कम रु.१,२१,२३६/-इतक्या खर्चाचे जादा काम झालेले आहे. एकुण टेंडर कामाची व जादा मिळून फायनल बीलाची रक्कम रु.४,२७,०४५/- इतकी झालेली आहे, जी कामाच्या एकुण मंजूर रकमेपेक्षा कमी आहे.

टेंडरमधील कामाव्यतिरिक्त स्ट्रीट लाईट पोलच्या केबल करिता ट्रेंच खोदाई करुन वीट,वाळू वापरुन केबल टाकणे तसेच केबलसोबत अर्थिंग तार टाकणे,स्ट्रीट लाईट पोलला कलर देणे, केबलकरिता बांधण्यात आलेल्या चेंबरवरील झाकण, ग्लॅण्ड इत्यादी कामे करावी लागलेली आहे. या जादा कामासह झालेल्या अंतीम बीलाची रक्कम रुपये ४,२७,०४५/- ही कामाच्या मंजूर झालेल्या रक्कम रूपये ४,२८,६७०/- पेक्षा कमी आहे. बीलाचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | तपशील | रक्कम |
|---|---|---|
| ०१) | मूळ कामाची मंजूर रक्कम | रु. ४,२८,६७०.०० |
| ०२) | अ). टेंडरनुसार झालेल्या कामाची रक्कम | रु. ३,०५,८०९.०० |
| | ब). टेंडर व्यतिरिक्त कामाची रक्कम | रु. १,२१,२३६.०० |
| ०३) | एकुण झालेली कामाची रक्कम ( २ अ + २ ब) | रु. ४,२७,०४५.०० |

तरी एकुण कामाची मूळ मंजूर रक्कम रु. ४,२८,६७०/- इतकी असून टेंडरनुसार रु. ३,०५,८०९/- व टेंडर व्यतिरिक्त कामाची रु.१,२१,२३६/- मिळून रुपये ४,२७,०४५/- इतकी बीलाची रक्कम झालेली आहे. एकुण झालेला खर्च हा मूळ मंजूरी रकमेपेक्षा कमीच आहे. फक्त टेंडर व्यतिरिक्त कराव्या लागलेल्या कामास व त्यापोटी बीलाच्या खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६१२ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे श्री साईप्रसादालय पश्चिम बाजूचे वाहनतळाचे विद्युतीकरणाचे टेंडर व्यतिरिक्त कामाची रु.१,२१,२३६/- मात्रची बीलाच्या रकमेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.४१ श्री साईबाबा संस्थानचे सर्व पॉवरींग स्टॅण्डबाय जनसेटच्या डिझेल इंजिनचे सन २०१२-१३ साठी वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट देणे बाबत.**

**निर्णय क्र.६१३ उपरोक्त प्रस्तावाबाबत व्यवस्थापन समितीचे दि.१४.०७.२०१२ चे सभेतील निर्णय क्र.४७५ अन्वये चर्चा होऊन निर्णय पारित झालेला असल्याने सदरहू प्रस्ताव मागे घेण्यात आला.** (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.४२ चपाती /पुरीकरीता रेडीमेड आटा खरेदी करणे बाबत**

**प्रस्ताव-** सध्या श्री साई प्रसादालयामध्ये वार्षिक सरासरीनुसार दर्रोज ३४,००० साईभक्त प्रसादभोजन घेत आहेत.म्हणजेच वर्षभरात सुमारे १,२४,१०,००० साईभक्त प्रसादभोजन घेतात.दररोज व ७५०० अन्नपाकीटांची विक्री होत आहे. सरासरी वर्षभरात२७,३७,५०० अन्नपाकीटांची विक्री होते. ३४,०००

साईभक्तांना प्रसादभोजनासाठी व ७५०० अन्नपाकीटासाठी दररोज ३६ क्विंटल गव्हाचा आटा लागतो. त्यासाठी एक वर्षाकरीता सुमारे १३००० क्विंटल गहु खरेदी करण्यात येतो. दिवसेंदिवस साईभक्तांचे गर्दीचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे भविष्यामध्ये ३६ क्विंटलपेक्षा जादा आट्याची गरज भासणार आहे.

यापुर्वी उपरोक्तकामी एक वर्षासाठी लागणारा सुमारे १३,००० क्विंटल गहु माहे मार्च, एप्रिल मध्ये एकाच वेळी खरेदी करण्यात येत असे. सदर गव्हाचा साठा संस्थान मध्यवर्ती भांडार इमारतीत व कोपरगांव येथील वेअर हाऊसमध्ये साठविण्यात येत असे. त्याकामी वेअर हाऊसला मासिक भाडे भरावे लागत असे. सध्या दि.३०/०५/२०१२ रोजीचे मा.त्रिसदस्य समितीच्या निर्णनूसार ४ महिण्यासाठी जाहीर निवीदा बोलावून गहु खरेदी करण्यात येत आहे.

वरीलप्रमाणे ३६ क्विंटल आटा दळणेसाठी ऑनलाईन चक्की युनिट वापरण्यात येत आहे. सदर ३६ क्विंटल आटा दळणेसाठी डिस्टोनर मशिनसाठी प्रती शिफ्टला २ कर्मचारी व गिरणीसाठी ३ कर्मचारी असे ५ कर्मचारी लागतात. त्यानूसार २ शिफ्टसाठी १० कर्मचारी लागतात. त्याचप्रमाणे मध्यवर्ती भांडारमधून गहु वाहुन आणणेकामी प्रती शिफ्टला २ कर्मचारीप्रमाणे दोन शिफ्टसाठी ४ कर्मचारी लागतात.

गहु खरेदी केल्यानंतर साठा करणे, वहातूक, निवडणे व दळणेकामी लागणारे मनुष्यबळ, घट-तुट, गोडाऊन भाडे, फ्युमिगेशन, इलेक्ट्रीसिटी खर्च, मशिनरी घसारा या सर्व कामासाठी प्रती क्विंटल आटा तयार करण्यास खालीलप्रमाणे अंदाजे खर्च होतो.

| अ.नं. | ३६ क्विंटल आटा तयार करणेस मजुरी खर्च | कर्मचारी संख्या | मजुरी दर | एकूण रक्कम रू. पै. |
|---|---|---|---|---|
| १ | प्रीक्लिनर व डिस्टोनर मशिन ऑपरेटर (प्रती शिफ्टसाठी ०२ प्रमाणे) | ०४ | | |
| २ | गिरणी चालक (प्रती शिफ्टसाठी ०३ प्रमाणे) | ०६ | | |
| ३ | मध्यवर्ती भांडार ते प्रसादालय वहातुक करणारे कर्मचारी (प्रती शिफ्ट ०२ प्रमाणे) | ०४ | | |
| | **एकूण कर्मचारी =** | **१४ x** | **२६६ /-** | **= ३७२४.००** |
| **मजुरीची एकूण रक्कम = ३७२४/- इ३६ क्विंटल = १०३/- एक क्विंटलसाठी मजुरी खर्च** | | | | |
| ४ | १ क्विंटल (१०० किलो) गहु किंमत रु. | | | १७००.०० |
| ५ | १ क्विंटल गहु वाहतूक, निवडणे,दळणे मजुरी खर्च रु. | | | १०३.०० |
| ६ | १ क्विंटल गव्हामध्ये १ किलो घट-तुट खर्च | | | १७.०० |
| ७ | १ क्विंटल गव्हासाठी मशिनरी घसारा/मेन्टेनंन्स १ % (१८२०/- (४+५+६) | | | १८.२० |
| ८ | १ क्वि.गव्हासाठी गिरणी,डिस्टोनर,प्रीक्लीनर,आटा चाळणी,इले.खर्च (विद्युत विभागाचे सोबतचे तक्त्यानूसार) | | | २०७.०० |
| | **१ क्विंटल गहु आटयासठी येणारा खर्च रुपये =** | | | **२०४५.००** |

संस्थानला प्रति क्विंटल आटा तयार करणेस सुमारे रु.२०४५/- पर्यंत खर्च येतो. याशिवाय जर संपुर्ण वर्षासाठीचा गहु एकदम खरेदी केल्यास सुमारे २ कोटी रक्कम एकदम गुंतवावी लागते. त्याशिवाय गहु साठविणे, किटकांपासून सुरक्षित ठेवणे, कोपरगांव गोडावून भाडे,विमा, कोपरगांव ते शिरडी वहातुक करणे या सर्व गोष्टींचा विचार केल्यास त्याकामी पर्याय म्हणून रेडीमेड आटा वापरणे सोईस्कर होऊ शकेल.

सध्या मार्केटमध्ये अन्नपुर्णा, शक्तीभोग, सम्राट, कॅप्टनकुक वगैरे दर्जेदार कंपन्यांचा ब्रँडेड आटा उपलब्ध आहे. त्याची किंमतही साधारणतः प्रती क्विंटलकरीता रु.१८००/- ते १९००/- चे आहे. जर आपण प्रत्येक महिण्यासाठी लागणाराच आटा खरेदी करुन वापरला तर सुमारे २ कोटीची गुंतवणूक करणेची आवश्यकता भासणार नाही. साठा करणे, फ्युमिगेशन करणे,वहातूक करणे वगैरे कामे कमी होतील. सदरील कामे कमी झालेमुळे पर्यायी मनुष्यबळ वाचणार आहे.तसेच काही प्रमाणात खर्चही कमी होईल. (रु.२०४५-१८०० ते १९०० = १४५ ते २४५ प्रती क्विंटल)

दिनांक १६/०५/२०१२ रोजी लखनौ येथील श्री संजय पांडे अॅण्ड फॅमिली यांनी ३०० गोणी रेडीमेड आटा देणगी म्हणून दिलेला होता.सदरील आटा दैंनदिन वापरला असता, सदर रेडीमेड आटयाच्या चपाती/पुरीची क्वालिटी चांगली झालेली होती. रेडीमेड आटयापासून तयार होणारी पुरी ही मऊ असल्याचे निदर्शनास आलेले आहे.

तरी वरीलप्रमाणे सर्व बाबींचा विचार होऊन गहु खरेदी करुन आटा बनविणे ऐवजी रेडीमेड आटा खरेदी करुन वापरणेकामी प्रशासकीय मान्यतेसाठी मा.त्रीसदस्य समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.६१४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, चपाती /पुरीकरीता अन्नपुर्णा, शक्तीभोग, सम्राट, कॅप्टनकुक वगैरे दर्जेदार कंपन्यांचा ब्रँडेड आटा निविदा मागवून खरेदी करण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय विभाग)

---

**विषय नं.४३** **ए.सी., नॉन ए.सी रुममधील बाथरुम समोरील कापडी पायपूसणी खरेदीबाबत**

**प्रस्ताव-** द्वारावती भक्तनिवास इमारतीमध्ये प्रत्येक एसी, नॉन एसी रूमचे बाथरुम समोर कापडी पायपुसणी टाकण्यात आलेल्या होत्या परंतु सततच्या वापराने त्या आता खराब झालेल्या आहेत. भक्तांना चांगली

सुविधा पुरविण्यासाठी व भक्तांच्या तक्रारी येऊ नये याकरीता त्याचे जागी नवीन चांगल्या प्रतीच्या कापडी पायपुसणी खरेदी करणे आवश्यक आहे.

या विभागात एकूण ३१६ रुम असून प्रत्येक एका रुमसाठी दोन याप्रमाणे ६३२ नगाची आवश्यकता आहे. त्याचा खर्चाचा तपशील खालील प्रमाणे.

| अ.नं. | कापडी पायपुसणी तपशील | साईज | एकूण खरेदी संख्या | अंदाजे प्रती नग दर | एकूण अंदाजे किंमत |
|---|---|---|---|---|---|
| १ | कॉटन | २ फुट x १.६" फुट | ६३२ | १००/- | ६३,२००/- |
| (अक्षरी अंदाजे रुपये त्रेसंष्ट हजार दोनशे) | | | | | |

उपरोक्त प्रमाणे पायपुसणी खरेदी करणे कामी रु.६३,२००/- खर्च अपेक्षित आहे.तरी सदरचे खर्चास मंजुरी मिळणेस व दरपत्रक मागवुन खरेदी करणेबाबतचा प्रस्ताव मा.त्रीसदस्य समितीचे सभेपुढे निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.६१५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, व्दारावती भक्तनिवस इमारतीमध्ये ए.सी., नॉन ए.सी रुममधील बाथरुम समोरील कापडी पायपूसणी दरपत्रके मागवून खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रु.६३,२००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक,व्दारावती )

---

**विषय नं.४४** **साईउद्यान इमारतीत नवीन सोलर सिस्टीमचे गरम पाणी वाटपाचे दर ठरविणे बाबत**

**प्रस्ताव-** विदयुत विभागामार्फत साईउदयान इमारतीवर सोलर वॅाटर हिटींग सिस्टीम बसवून कार्यान्वीत करुन देण्यात आलेली आहे .श्री साईबाबा संस्थानचे सार्दउदयान इमारतीमध्ये १६ हॅाल असून सध्या ८ हॅाल साईभक्तांच्या वास्तव्यासाठी देण्यात येतात. तसेच हॅालच्या मध्यभागी मोकळया जागेत १३२ लॅाकर आहेत. व दुस-या बाजूला ३६ रुम असून त्या इमारतीमध्ये १२२५ साईभक्त वास्तव्यासाठी दररोज असतात. सकाळचे वेळेस साईभक्तांना संडास बाथरुमसाठी सार्वजनिक संडास बाथरुमची सोय करणेत आलेली आहे .तसेच सध्या सोलर वॅाटर हिटींग सिस्टीमचे गरम पाण्याचे दोन्ही बाजूस तिनही माळयावर सार्वजनिक नळ काढले आहे.त्या ऐवजी दोन्ही बाजुचे मध्यभागी एक नळ गरम पाण्याचा काढला तर प्रत्येक माळयावर एक कर्मचारी लावून गरम पाणी वाटप करुन घेता येईल. सध्या साईभक्त साईसंस्थान एम्प्लॅाईज क्रेडीट को.ऑप सोसायटीला रोख पैसे देवून त्या ठिकाणाहून गरम पाणी घेवून स्नान करतात. सुरवातीला काहीकाळ सोलरचे गरमपाणी मिळते सोलरचे गरमपाणी संपले नंतर बॅायलरने गरम केलेले पाणी भक्तांना पुरविले जाते. काही साईभक्त गरम पाण्याचा वापर न करता थंड पाण्याने अंघोळ करतात.त्यामुळे त्यांचे कडुन गरमपाण्याचा सेवाआकार आकारला जात नाही .

संस्थानच्या सेवाधाम व साईउदयान या दोन ठिकाणा व्यतिरिक्त इतर सर्व इमारतीमध्ये गरम पाण्याचा चार्ज रुम घेताने पावतीमध्ये आकारला जातो .साईबाबा भक्तनिवास या ठीकाणी सोलर सिस्टीम बसविलेली आहे.या ठिकाणी भक्तांकडुन ३/- रुपये प्रमाणे गरमपाण्याचा सेवाआकार घेतला जात असून त्यापैकी ५० % रक्कम साईसंस्थान एम्प्लॅाईज क्रेडीट को.ऑप सोसायटीला पाण्याचा वाहतूकीच्या मोबदल्यात दिला जातो . व ५० % रक्कम संस्थानचे खाती जमा होते .

साईप्रसाद येथे सोलर सिस्टीम नाही अशा ठिकाणी साईसंस्थान एम्प्लॅाईज क्रेडीट को.ऑप सोसायटीने बॅायलर बसवून गरम पाण्याची सोय केलेली आहे .त्याचाही सेवाआकार ३/- रुपये प्रमाणे पावतीमध्ये भक्ताकडुन घेतला जात असून त्यापैकी रुपये २/- सोसायटीला व १/- रुपया संस्थानला अशा दोन्ही पध्दतीत सोसायटी मार्फत साईभक्तांना गरमपाण्याचा पुरवठा केला जातो.

०१.साईबाबा भक्तनिवासस्थान येथे सोलर सिस्टीम कार्यान्वित असून सोलर सिस्टीमचे गरम पाणी प्रत्येक माळयावर विंग प्रमाणे स्टोअरमध्ये ठेवलेले असून सोसायटी कर्मचा-यामार्फत प्रत्येक रुममध्ये पावतीवर दाखविलेल्या माणसाप्रमाणे गरमपाण्याच्या बादल्या पुरविल्या जातात गरमपाण्याचा सेवाआकार पावती करतांना संगणकामध्येच प्रति माणसी ०३/- रुपये प्रमाणे सेवाआकार घेतला जातो त्यातील रुपये १.५०पैसे सोसायटीला सेवाआकार म्हणून देण्यात येतो व १.५० पैसे संस्थानकडे जमा करतात.

०२. व्दारावती येथेही सोलर सिस्टीम कार्यान्वित असून प्रत्येक रुममध्ये सोलर सिस्टीमचा गरमपाण्याचा नळ दिलेला आहे .साध्या रुमचा दर ३ कॅाटसाठी ५००/- रुपये व A/C रुमचा दर ३ कॅाटचा ९००/- रुपये असा निश्चित केलेला असल्यामुळे त्याच दरात भक्तांना गरमपाणी पुरविले जाते.गरमपाण्याचा वेगळा चार्ज आकारला जात नाही .परंतू काही रुमला सोलर सिस्टीमचे पाणी मिळणेस अडचण आल्यास अशा वेळेस सोसायटीकडील बॅायलर मार्फत गरमपाणी पुरविले जाते सोसायटी कडुन बॅायलरचे किती पाणी पुरविले गेले त्याचे बील सोसायटीकडुन घेऊन त्यांना १.५० पैसे प्रमाणे बील अदा केले जाते.

साईउदयान येथे सोलर वॅाटर हिटींग सिस्टीमने गरमपाणी सुरु झालेले आहे .व सेवाधाम येथे बॅायलर द्वारे गरमपाणी करुन भक्तांना दिले जाते.तरी दोन्ही ठिकाणचा गरमपाण्याचा सेवाआकार रुम देतांना पावतीमध्ये घेण्याचा विचार व्हावा असे वाटते साईउदयान मधील हॅालचे बाजूस साईभक्त जास्त असतात त्यामुळे पावती झाल्यावर पावती वरील साईभक्तांचे संख्ये प्रमाणे गरम पाण्याची तिकीटे देता येतील पुस्तकाची छपाई सोसायटीकडून करुन घेता येईल.मात्र सेवाधाम व साईउदयान या दोन्ही ठिकाणचे

सोसायटीला बॉयलरच्या ठिकाणी २/- रुपये तर सोलर वॅाटर हिटींग सिस्टीमचे ठिकाणी १ /- रुपया सेवाआकार देता येईल .

साईउदयान येथील अंघोळीचे बाथरुम हे जनरल असुन हॅाल व रुमचे बाहेर बाजूला आहे. एका माळयावर एका बाजूला रुम व एका बाजूला हॅाल आहे मध्यवर्ती संडास बाथरुम आहे . गरम पाणी वाटपासाठी बसणारा कर्मचारी मध्यवर्ती ठिकाणी बसून गरम पाण्याचा नळ चालू करुन बादली भरुन देईल व भक्त स्वतः जवळ असलेल्या शेजारच्या जनरल बाथरुममध्ये बादली भरुन घेवून जाईल. सदर अंघोळीसाठी हॅाल रुम मध्ये असलेला भक्तच असावा व त्यांनी पैसे भरलेले असावेत म्हणून पावती करतानाच अंघोळीचे प्रति बादली रुपये ३/- घेणे सोईचे ठरेल तथापी कुणीही शेजारचे मोकळे बाथरुम मधून बादली आणून गरम पाणी घेवू नये व गरम पाण्याचा गैरवापर दुरुपयोग होवू नये म्हणून गरम पाणी पेड तिकीटाचा वापरकरता येईल म्हणजे खोली भाडे पावतीमध्ये खोलीत असलेल्या भक्तांचे संख्येच्या प्रमाणत भक्ताचे अंघोळीचे पैसे घेतलेले असावेत म्हणजे खोलीतील भक्ताना ती तिकीटे वाटून देता येईल सदर भक्ताने सोसायटी कर्मचारी यांना तिकीट दाखवायचे व कर्मचा-याने तिकीट फाडुन भक्ताला गरमपाण्याची बादली भरुन दयायची म्हणजे गरमपाण्याचे पैसे भरलेल्या भक्तालाच गरम पाणी देता येईल इतरांना देता येणार नाही .या ठिकाणी गरम पाणी रक्कम पेड अशा प्रकाराची तिकीट छापुन घ्यावे लागतील .येथील पाणी वाटप सोलर सिस्टीमचे केल्यास सोसायटी कर्मचारी एका जागेवर बसून वाटप करणार आहे या कामी संस्थान कडून सोसायटीला रक्कम प्रति बादली ०१/- रुपया द्यावे असे मत आहे व ज्यावेळी बॅायलरचे गरम पाणी देण्यात येईल त्यावेळी सोसायटीस प्रति बादली रुपये ०२/- व संस्थानला रुपये ०१/- प्रति बादली घेता येईल असे मत आहे तरी सदर विषयावर चर्चा होऊन निर्णय होणेस विनंती .

**निर्णय क्र.६१६ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-अधिक्षक,साईप्रसाद निवासस्थाने)

---

**विषय नं.४५ लॅाण्ड्रीतील हायड्रोएक्सट्रॅक्टर मशिन (३० किलो क्षमतेचे) खरेदी करणेबाबत**

**प्रस्ताव-** साईबाबा भक्तनिवासस्थान विभागाकडील लॅाण्ड्री विभागात एका खोलीत वॅाशिंग मशिन (५० किलो क्षमतेचे)आहे या मशिन मध्ये दोन शिप्ट (६ते१४ व १४ ते २२) मिळुन साधारणपणे १००० नग कपडे धुतले जातात ते शेजारील हायड्रोएक्सट्रॅक्टर मशिन मध्ये कपडे पिळले जातात,दुस-या खोली मध्ये वॅाशिंग मशिन (३०किलो क्षमतेचे) आहे या मशिन मध्ये दोन शिप्ट (६ ते १४ व १४ ते २२) मिळुन साधारणपणे ५०० नग कपडे धुतले जातात त्याचे शेजारी हायड्रोएक्सट्रॅक्टर मशिन आहे. पैकी मोठे वॅाशिंग मशिन शेजारील हायड्रोएक्सट्रॅक्टर मशिन पुरवठा आदेश क्र.जा.नं.एसएसएस/वशी/ साभनि/ २०००. दि.१४/०२/२००० .रुपये ७३,७०३/- (अक्षरी रुपये त्र्याहत्तर हजार सातशे तीन मात्र) खरेदी करुन दि.१४/०६/२००० पासुन मशिन कार्यान्वित केलेले आहे.

लॅाण्ड्रीतील मशिनरी या मे.रामसन्स गारमेंन्ट फिनिशिंग इक्वीपमेंन्ट, बेंगलोर या कंपनीकडुन खरेदी करण्यात आलेल्या आहे.मशिनरीं नादुरुस्त झाल्यास दुरुस्तीची कामे कंपनीचे पुणे येथे असलेल्या शाखेकडुन करुन घ्यावी लागतात.या करीता ते स्वखर्चाने येऊन कामे करुन देतात त्याचे चार्जेस घेत नाही.हायड्रोएक्सट्रॅक्टर मशिन (कपडे पिळण्याचे मशिन)यापुर्वी नादुरुस्त झाल्याने व ते जागेवर दुरुस्त होत नसल्याने दि.२२/१२/२००८ व दि.१८/१२/२०१० रोजी दोन वेळेस बेंगलोर येथुन कंपनीतुन संस्थानचे वाहनाने ने-आण करुन दुरुस्त केलेले आहे कंपनीने त्यावेळी संस्थानकडुन दुरुस्तीचे बील घेतलेले नाही.सदर मशिन सुमारे १२ वर्षापासुन सतत वापरात आहे व दोनवेळा आपले वाहनातुन बेंगलोर येथुन दुरुस्त करुन आणले आहे.

आता याच मशिनचा आवाज येऊ लागला असुन सदर मशिन केव्हाही बंद पडण्याची शक्यता नाकारता येत नाही.कामाची तातडी व आवश्यकता विचारात घेता नविन हायड्रोएक्सट्रॅक्टर मशिन (३० किलो क्षमतेचे) खरेदी करावे लागेल.आपणाकडील उपलब्ध माहितीनुसार हायड्रोएक्सट्रॅक्टर मशिन खालील कंपन्या मार्फत निर्माण केले जातात.

१) मे.रामसन्स गारमेंन्ट फिनिशिंग इक्वीपमेंन्ट प्रा.लि., ३२०, म्हैसुर रोड बेंगलोर.

२) स्टार व्हाइटर्स लॅाण्ड्री इक्वीपमेंन्ट ॲन्ड सर्व्हिसेस प्रा.लि.सिकंदराबाद.

३) स्पेक्ट्रम गारमेंन्ट फिनिशिंग इक्वीपमेंन्ट प्रा.लि.उद्योग विहार,हरीयाणा,गुरगाव,नवि दिल्ली.

हायड्रोएक्सट्रॅक्टर मशिन (३० किलो क्षमतेचे) खरेदीकामी अंदाजे रुपये १,३०,०००/- (अक्षरी रुपये एक लाख तीस हजार मात्र) खर्च अपेक्षित आहे.सदरचा खर्च यंत्रसामुग्री खरेदी खाती असलेल्या रकमेतुन करता येईल.

तरी लॅाण्ड्रीकरीता नविन हायड्रोएक्सट्रॅक्टर मशिन (३० किलो क्षमतेचे) खरेदी विभागामार्फत विहित पध्दतीने खरेदी करणेस व येणा-या खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६१७ यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे भकतनिवासस्थान इमारतीकडे असलेल्या लॅाण्ड्रीकरीता नविन हायड्रोएक्सट्रॅक्टर मशिन (३० किलो क्षमतेचे) खरेदी विभागामार्फत विहित पध्दतीने कोटेशन्स**

**मागवून खरेदी करणेस व येणा-या अंदाजे रक्कम रुपये १,३०,०००/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक,भक्तनिवासस्थान)

---

**विषय नं.४६ साईआश्रम मधील ३० रुम पोलिसांकरीता आरक्षित करणे बाबत**

**प्रस्ताव-** मा.पोलिस अधिक्षक सो,अहमदनगर यांनी त्यांचे कडील दि.२६.०४.२०१२ रोजीचे क्रमांक कक्ष-१ (८) पोक/ रुम /३६५२/१२ नुसार.

शिर्डी येथे सतत महत्वाच्या /अतिमहत्वाच्या व्यक्ती,उच्च पदस्थ अधिकारी येत असतात.सदर व्यक्तींच्या सुरक्षेकरीता कायम स्वरुपी गार्ड ठेवावे लागतात व मोठया प्रमाणात पोलिस बंदोबस्त पुरवावा लागतो.सदर बंदोबस्तकामी राज्यातील इतर जिल्ह्यांतून पोलिस अधिकारी व कर्मचारी हे शिर्डी येथे बंदोबस्तासाठी येत असतात.तसेच शिर्डी हे अतिसंवेदनशिल ठिकाण असल्याने तेथे जिल्ह्यातून देखील कायमस्वरुपी मोठया प्रमाणात पोलिस बंदोबस्त ठेवला जातो.तसेच संपूर्ण भारतातून पोलिस अधिकारी व कर्मचारी हे शिर्डी येथील सुरक्षा व्यवस्थेच्या अध्यायनासाठी येत असतात,त्यांचे राहण्याची सोय होणेकरीता रुमची आवश्यकता आहे.

सदर बंदोबस्तासाठी येणाऱ्या पोलिस अधिकारी व कर्मचारी यांची संख्या विचारात घेता,त्यांच्या निवास व्यवस्थेच्या दृष्टीने पोलिस विभागाकडे आवश्यकतेनुसार निवासासाठी जागा अपुरी पडत आहे तसेच शिर्डी सारख्या महत्वाच्या ठिकाणच्या निवासासाठीचा खर्च पोलिस अधिकारी व कर्मचारी यांना परवडणारा नाही.

त्यामुळे श्री रमणी देवी हे साईबाबा संस्थान,शिर्डी यांना बांधून देत असलेल्या १५०० रुम्सपैकी ३० रुम ह्या शिर्डी येथे बंदोबस्तासाठी येणाऱ्या पोलिस अधिकारी व कर्मचारी यांचेसाठी कायम स्वरुपी आरक्षित करुन मिळणेस विनंती आहे. अशी मा.पोलिस अधिक्षकसो,अहमदनगर यांनी पत्राद्वारे विनंती केलेली आहे

मा.पोलिस अधिक्षक सो यांनी दिलेल्या पत्रामध्ये ३० रुम कायम स्वरुपी आरक्षित करुन मिळण्याची मागणी आहे. तथापी सदरच्या रुम्स संस्थान नियमानुसार सेवाआकार घेऊन आरक्षित करावयाच्या किंवा विनामुल्य याबाबत पत्रात खुलासा करण्यात आलेला नाही.

साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी साठी महाराष्ट्र शासनाने पारित केलेल्या महाराष्ट्र अधिनियम क्रं.१४ मध्ये कलम नं.१७ (३) मध्ये चविश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्यशासनाच्या लिखित पूर्व मंजुरीने असेल त्या खेरीज समितीकडून एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता, भाडे पट्याने देण्यात येणार नाही. किंवा गहान टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्यसंक्रामित करण्यात येणार नाही." अशी तरतुद करण्यात आलेली आहे.

तरी उपरोक्त प्रमाणे एकुण परिस्थीती विचारात घेता मा.पोलिस अधिक्षक सो, अहमदनगर यांचे पत्रास अनुसरुन खालील मुद्यावर निर्णय होणेस विनंती.

**१)** मा.पोलिस अधिक्षक साहेब,अहमदनगर यांचे मागणीनुसार साईआश्रम इमारतीमधील ३० खोल्या कायम स्वरुपी पोलिस विभागीय कर्मचाऱ्यांचे निवासासाठी आरक्षित ठेवायच्या किंवा कसे ?

**२)** खोल्या कायम स्वरुपी आरक्षित ठेवायच्या झाल्यास संबधितांकडून संस्थान नियमानुसार सेवाआकार घ्यावयाचा किंवा संबधितांचे निवासासाठी विनामुल्य खोल्या द्यावयाच्या.

खोल्या आरक्षित करावयाच्या झाल्यास सन २००४ या अधिनियमातील तरतूदीनुसार त्या एक वर्ष कालावधीसाठी आरक्षित करावयाच्या किंवा या कारणांसाठी अधिनियमातील तरतूदीनुसार प्रस्ताव मान्यतेसाठी शासनाकडे सादर करावा याबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६१८ यावर सविस्तर चर्चा होऊन, सदर प्रस्ताव अमान्य करण्यात आला.**

(कार्यवाही-अधिक्षक,व्दारावती भक्तनिवास)

---

**विषय नं.४७ नवीन प्रेसधारकांचे नांव निवडक प्रेसधारकांचे यादीत समाविष्ठ करुन घेणे बाबत.**

**प्रस्ताव-** मे.श्रीरंग ऑफसेट,इंदौर (मध्यप्रदेश) यांचे दि.२६.०३.२०१२ चे पत्रान्वये संस्थान प्रकाशित पुस्तके/ फोटो/ श्री साई दैनंदिनी/दिनदर्शिका छपाई कामासाठी संस्थान अधिकृत निवडक प्रेसधारकांचे यादीत नाव समाविष्ट करुन घेणेविषयी विनंती पत्र दिले आहे.

मे.श्रीरंग ऑफसेट,इंदौर यांची चर्नी रोड, मुंबई (महाराष्ट्र) या ठिकाणी शाखा असून, त्यांचेकडे गजनान महाराज, शेगांव संस्थानचे छपाईचे काम चालू आहे. तसेच त्यांचेकडे उच्चदर्जाचे अनेक प्रकारचे ग्रंथाचे छपाईचे काम केले जाते. त्यांनी सन २००६ मध्ये संस्थान प्रकाशित श्री साई सच्चरित सार हिंदी दोहावली - प्रथम आवृत्तीच्या ५००० प्रतींची बल्लारपूर कंपनीचा कागद वापरुन, चांगल्या प्रकारे कव्हर,बायडींग, अक्षर जुळणी आतील फोटोंची छपाई करुन दिलेली आहे.

पुस्तके/फोटो,दैनंदिनी/दिनदर्शिका छपाई कामासाठी संस्थान अधिकृत निवडक प्रेसधारकांचे यादीत नाव समाविष्ट करणेसाठी संस्थानचे नियमाप्रमाणे त्यांची वार्षिक उलाढाल २ कोटीच्या वर आहे, व आवश्यक निकषानुसार ते पात्र आहेत.

पुस्तके/फोटो/श्री साई दैनंदिनी/दिनदर्शिका छपाईकामासाठी मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार ठरवून दिलेल्या निकषानुसार २९ अधिकृत प्रेसधारकांची यादी करण्यात येऊन त्यांचेकडून दरपत्रके मागविण्यात येतात निम्नतम दर असणा-या प्रेसधारकांना छपाई कामाचे आदेश देऊन काम करुन घेण्यात येते.

२९ अधिकृत निवडक प्रेसधारकातील काही प्रेसधारक दरपत्रके भरत नसल्यामुळे संस्थानची स्टेशनरी, वेळ वाया जातो. त्यामुळे २९ अधिकृत निवडक प्रेसधारकातील जे प्रेसधारक दरपत्रके भरत नाही. अशा प्रेसधारकांची नावे वगळणेबाबत स्वतंत्र टिपणी अलाहिदा सादर करण्यात येईल.

मे.श्रीरंग ऑफसेट,इंदौर (मध्यप्रदेश) यांची चर्नी रोड, मुंबई (महाराष्ट्र) या ठिकाणी शाखा असून त्यांची वार्षिक उलाढाल ही २ कोटीच्या वर असून, मा.व्यवस्थापन समितीने ठरवून दिलेल्या निकषानुसार निवडक यादीत घेणेस ते पात्र आहेत.

सबब मे.श्रीरंग ऑफसेट,इंदौर (मध्यप्रदेश) यांचे नाव संस्थान अधिकृत निवडक प्रेसधारकांच्या यादीत समाविष्ट करणेस मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.६१९ यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.श्रीरंग ऑफसेट, इंदौर (मध्यप्रदेश) यांचे नाव संस्थान अधिकृत निवडक प्रेसधारकांच्या यादीत समाविष्ट करणेत यावे. तसेच ज्या प्रेसधारकांचे नांव संस्थानचे अधिकृत निवडक यादीत आहेत मात्र मागील ०३ वर्षापासून संस्थानची दरपत्रके भरलेली नाहीत अशा प्रेसधारकाचे नांवे निवडक प्रेसधारक यादीतून कमी करण्यात यावे असे ठरले.**

(कार्यवाही-अधिक्षक,प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.४८ श्री जयसिंह निंबाळकर लिखित श्री साईकथामृत -मराठी व गुजराथी भाषेतील पुस्तके संस्थानव्दारे प्रकाशित करणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री. जयसिंह ब. निंबाळकर, बडोदा यांनी श्री साईंचे सत्य चरित्र मराठी व गुजराथी या पुस्तकातील निवडक कथांचे संकलन करुन "साईकथामृत" मराठी व गुजराथी पुस्तक लिहीले आहे. सदर पुस्तकांचे संस्थानद्वारा प्रकाशन करणेस मा.व्यवस्थापन समितीचे दि.१०.०१.२००८ चे सभेतील निर्णय क्र.६८ अन्वये मान्यता असून, इकडील जा.नं.३७८७ दि.१०.०३.२००८ नुसार पुस्तकाचे प्रकाशनासाठी सीडी पाठविणेबाबत श्री. निंबाळकर यांना कळविले होते. तथापि श्री. निंबाळकर यांनी प्रकृती बरी नसल्याने पुस्तकांची सीडी वेळेत देणे शक्य झालेले नसून, आता सी.डी. तयार असून, त्या पाठविणेबाबत परवानगी द्यावी असे दि.२६.०२.२०१२ चे पत्रान्वये कळविले आहे. दरम्यान चार वर्षाचा काळ गेला आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२४.०५.२००८ चे सभेतील निर्णय क्र.४१५नुसार वाढत्या प्रकाशनांची संख्या लक्षात घेता खाजगी प्रकाशनाचे हक्क स्विकारु नयेत असा निर्णय संमत झालेला आहे. प्रकाशनांची संख्या खुपच वाढली आहे. शिवाय उक्त पुस्तके "श्री साईंचे सत्य चरित्र" - मराठी व गुजराथी ग्रंथातील निवडक कथांचे संकलन करुनच छापले आहे. पुस्तकांची द्विरुक्ती होत आहे. सदर पुस्तके प्रकाशित केल्यास हवा तसा प्रतिसाद मिळणार नाही.

तरी उपरोक्त परिस्थितीचा विचार करता, तसेच मा.व्यवस्थापन समितीचे दि.२४.०५.२००८ चे सभेतील निर्णय क्र.४१५ नुसार वाढत्या प्रकाशनांची संख्या लक्षात घेता, सदर पुस्तकांचे प्रकाशन संस्थानद्वारा करणे शक्य होणार नसल्याचे श्री. जयसिंह निंबाळकर यांना कळविता येईल.

**निर्णय क्र.६२० यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री जयसिंह निंबाळकर लिखित श्री साईकथामृत -मराठी व गुजराथी भाषेतील पुस्तके संस्थानव्दारे प्रकाशित करणेबाबत करण्यात आलेली विनंती अमान्य करण्यात आली.**

(कार्यवाही-अधिक्षक,प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.४९ ह.भ.प दासगणूकृत श्री साईनाथ स्तवन मंजरी (मराठी) पुस्तीकेचा तामिळ भाषेत अनुवाद करणेस अनुमती देणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्रीमती शिवप्रिया,पुणे यांनी दि.१९.०४.२०१२ चे पत्रान्वये ह.भ.प.दासगणूकृत श्री साईनाथ स्तवन मंजरी - मराठी या संस्थान प्रकाशित पुस्तीकेचा - तामिळ भाषेत अनुवाद करणेस परवानगी मागितली आहे. सदर पुस्तीकेचे पुढील प्रकाशनाचे सर्व हक्क विनाअट त्या संस्थानला देणार आहेत.

सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ च्या कलम नं.१७ ठ मध्ये "श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहीतीचा प्रचार- प्रसार करील आणि साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील" अशी तरतूद आहे.

संस्थानचे अधिकृत प्रकाशन श्री साईनाथ स्तवन मंजिरी -मराठी या वरुन त्या तामिळ भाषेत अनुवाद करणार आहेत.

संस्थानमार्फत श्री साईनाथ स्तवन मंजरी - तामिळ भाषेत प्रकाशित झालेली नाही.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२४.०५.२००८ चे सभेत निर्णय क्र.४१५ अन्वये संस्थानद्वारा प्रकाशित होणा-या प्रकाशनांची वाढती संख्या विचारात घेऊन "इतर कुठल्याही अन्य खाजगी प्रकाशनांचे हक्क स्वीकारण्यात येऊ नयेत" असा निर्णय पारित झाला आहे".

अधिनियमातील तरतुदीनुसार साईबाबांचे जीवन कार्याचा प्रसार - प्रचार सर्व भाषेत व्हावा म्हणून तामिळ भाषेत स्तवन मंजरी असणे आवश्यक आहे.

तथापि संस्थानचे नियमाप्रमाणे पुस्तीका प्रकाशनापूर्वी, केलेला अनुवाद मुळ प्रकाशनाबर हुकूम असून, अनुवाद करतांना कोणताही फेरबदल केला नसलेबाबत पुणे विद्यापिठाचे प्रमाणपत्र सादर करणेस त्यांना सांगता येईल. सर्व बाबींची पूर्तता झाल्यानंतरच पुस्तीका संस्थानद्वारा प्रकाशित करणेबाबत कार्यवाही करणेत येईल.

सबब श्रीमती शिवप्रिया,पुणे यांना श्री साईनाथ स्तवन मंजरी - मराठी या संस्थान प्रकाशित पुस्तीकेचा - तामिळ भाषेत अनुवाद करणेस अनुमती देणेकामी निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.६२१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीमती शिवप्रिया,पुणे यांना ह.भ.प दासगणूकृत श्री साईनाथ स्तवन मंजरी (मराठी) पुस्तीकेचा तामिळ भाषेत अनुवाद करणेस मान्यता देण्यात आली. याकामी त्यांनी संस्थानचे नियमाप्रमाणे पुस्तक प्रकाशनापूर्वी केलेला अनुवाद योग्य असलेबाबत पुणे विद्यापीठाचे प्रमाणपत्र सादर करणेबाबत त्यांना सांगण्यात यावे असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षकप्रकाशने विभाग)

---

**विषय नं.५०** **अर्वाचीन भक्त लिलामृत (चार अध्याय) मराठी पुस्तकाचा हिंदी भाषेत अनुवाद करणेस अनुमती देणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री राजेंद्र जसूजा व श्री संजय तिवारी, भोपाळ यांनी दि.२४.०४.२०१२ चे पत्रान्वये अर्वाचीन भक्त लीलामृत (चार अध्याय) मराठी या पुस्तकाचे हिंदी भाषेत अनुवाद करणेस व तो संस्थानद्वारा प्रकाशन करणेस अनुमती मागीतली आहे. याबाबत त्यांना कोणतेही मानधन नको आहे. तसेच प्रकाशनाचे सर्व हक्क ते संस्थानला विनाअट देणार आहेत.सदर पुस्तकाचे प्रकाशन संस्थानने करावे अशीही विनंती त्यांनी केली आहे.

कै.ह.भ.प.दासगणू महाराज हे साईबाबांचे समकालीन भक्त होते. साईचरित्रामध्ये त्यांचा अनेक ठिकाणी उल्लेख आलेला आहे. संस्थान प्रकाशित कै.गो.र.दाभोळकरकृत साईसच्चरित - मराठी ग्रंथाइतकेच सदर पुस्तीका प्रमाणित मानली जाते. सदर पुस्तीकेच्या मराठी आवृत्तीस भक्तांचा मोठ्या प्रमाणात प्रतिसाद आहे.

सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ च्या कलम नं.१७ ठ मध्ये "श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहीतीचा प्रचार- प्रसार करील आणि साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील" अशी तरतूद आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२४.०५.२००८ चे सभेत निर्णय क्र.४१५ अन्वये संस्थानद्वारा प्रकाशित होणा-या प्रकाशनाची वाढती संख्या विचारात घेऊन "इतर कुठल्याही अन्य खाजगी प्रकाशनांचे हक्क स्वीकारण्यात येऊ नयेत" असा निर्णय पारित झाला आहे".

अधिनियमातील तरतुदीनुसार साईबाबांचे जीवन कार्याचा प्रसार - प्रचार सर्व भाषेत व्हावा म्हणून हिंदी भाषेत अर्वाचीन भक्त लीलामृत (चार अध्याय) असणे आवश्यक आहे.

तथापि संस्थानचे नियमाप्रमाणे पुस्तीका प्रकाशनापूर्वी, केलेला अनुवाद मुळ प्रकाशनाबर हुकूम असून, अनुवाद करतांना कोणताही फेरबदल केला नसलेबाबत पुणे विद्यापिठाचे प्रमाणपत्र सादर करणेस त्यांना सांगता येईल. सर्व बाबींची पूर्तता झाल्यानंतरच पुस्तीका संस्थानद्वारा प्रकाशित करणेबाबत कार्यवाही करणेत येईल.

सबब श्री राजेंद्र जसूजा व श्री संजय तिवारी, भोपाळ यांना अर्वाचीन भक्त लीलामृत (चार अध्याय)- मराठी या संस्थान प्रकाशित पुस्तीकेचा- हिंदी भाषेत अनुवाद करणेस व तो संस्थानद्वारा प्रकाशन करणेस अनुमती देणेस मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.६२२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री राजेंद्र जसूजा व श्री संजय तिवारी, भोपाळ यांना अर्वाचीन भक्त लीलामृत (चार अध्याय) मराठी पुस्तकाचा हिंदी भाषेत अनुवाद करणेस मान्यता देण्यात आली. याकामी त्यांनी संस्थानचे नियमाप्रमाणे पुस्तक प्रकाशनापूर्वी केलेला अनुवाद योग्य असलेबाबत पूणे विद्यापीठाचे प्रमाणपत्र सादर करणेबाबत त्यांना सांगण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही- अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.५१** **श्री दासगणकृत चार अध्याय या पुस्तकाचा गुजराथी भाषेतील अनुवाद प्रकाशित करणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री राकेश पटेल, सुरत यांनी दि.०६.१०.२०११ चे पत्रान्वये संस्थान प्रकाशित श्री दासगणुकृत चार अध्याय मराठी पुस्तकाचा गुजराथी भाषेत अनुवाद करणेस अनुमती मागीतली होती, तसेच सदर पुस्तकाच्या प्रथम १००० प्रती ते संस्थानला देणगीदाखल देणार असुन त्या स्विकारणेस व सदर पुस्तक संस्थानव्दारा प्रकाशित करावे अशी विनंती केली होती. पुस्तकाचे कॉपीराईट ते विनाअट संस्थानला देणार आहेत.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४, कलम नं.१७ ठ नुसार श्री साईबाबांचें जीवन त्यांचे कार्य , त्यांच्या लीला व शिकवण याबाबतचा उपयुक्त माहितीचा प्रचार प्रसार करील आणि साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा प्रसार करील या तरतुदीनुसार गुजराथी भाषिक भाविकांना उक्त पुस्तकाचा लाभ व्हावा म्हणुन सदर पुस्तकाची गुजराथी भाषेत अनुवाद करणेस अनुमती मिळणेबाबत विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर केला होता.

मा.व्य.समिती सभा दि.१४.०१.२०१२ निर्णय क्र.८९ नुसार श्री राकेश पटेल, सुरत यांना उक्त पुस्तकाचा गुजराथी भाषेत अनुवाद करणेस परवानगी देण्यात आली असुन, सदरचा अनुवाद त्यांनी पुणे विद्यापीठाकडुन प्रमाणीत करुन आणावा असे ठरले आहे.

इकडील जा.नं.६०१४ दि.२९.०२.२०१२.अन्वये मा.व्य.समिती सभेतील निर्णयानुसार कार्यवाही करणेस श्री राकेश पटेल, सुरत यांना कळविणेत आले होते.

श्री राकेश पटेल, सुरत यांनी पुणे विद्यापीठा ऐवजी पश्चिम क्षेत्रीय भाषा केंद्र,पुणें यांचे पत्र क्र.१-३१/२०११-१२ दि.२९.०३.१२ नुसार प्रमाणपत्र सादर केले आहे. सदर भाषा केंद्र भारत सरकारचे भारतीय भाषा संस्थान, मानव संसाधन विकास मंत्रालय, उच्च शिक्षा विभाग, अंतर्गत पुणे स्थीत सरकारी केंद्र आहे. प्रमाणपत्राचे अवलोकन करता, श्री राकेश पटेल यांच्या सांगण्यावरुन श्री उदयराज बी जोशी यांनी अनुवाद केला असुन, सदर अनुवाद गुजराथी भाषा तज्ज्ञ डॉ मधु संपट, निवृत्त प्रपाठक पश्चिम विभागीय भाषा केंद्र, पुणे यांनी पाहिला असुन, तो मुळ पुस्तकाबर हुकुम झालेला आहे,गुजराथी भाषेतील अनुवाद प्रकाशित करण्यास हरकत नसावी, असे डॉ कलिका मेहता, प्राचार्या, यांनी प्रमाणित केले आहे. श्री राकेश पटेल यांचे सांगण्यावरुन श्री उदयराज बी. जोशी यांनी उक्त पुस्तकाचा गुजराथी भाषेत केलेला अनुवाद, पश्चिम क्षेत्रीय भाषा केंद्र, पुणे, हे पुणे विद्यापीठ समकक्ष असल्याने त्यांचे प्रमाणपत्रास अधीन राहुन सदर पुस्तक संस्थानव्दारा प्रकाशित करणेस हरकत नाही असे नम्र मत आहे.

सबब श्री दासगणुकृत चार अध्याय मराठी पुस्तकाच्या श्री राकेश पटेल यांनी देणगीदाखल दिलेल्या १००० प्रती स्विकारणेस व पुस्तकाचे संस्थानव्दारा प्रकाशन करणेस मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.६२३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री दासगणुकृत चार अध्याय मराठी पुस्तकाच्या श्री राकेश पटेल यांनी देणगीदाखल दिलेल्या १००० प्रती स्विकारणेस व या पुस्तकाचे संस्थानव्दारा प्रकाशन करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.५२** **श्री साईनाथ सगुणोपासना (इंग्रजी आरती अर्थासह) अनुवादक श्रीमती झरीन या पुस्तीकचा गुजराथी भाषेत अनुवाद करणेस अनुमती देणेबाबत**

**प्रस्ताव-** श्री राकेश पी.पटेल,सुरत यांनी दि.०८.०६.२०१२ पत्रान्वये संस्थान प्रकाशित श्री सदगुरु साईनाथ सगुणोपासना (इंग्रजी आरती ) अनुवादक श्रीमती झरीन या पुस्तीकेचा गुजराथी भाषेत अनुवाद करणेस अनुमती मागीतली असून, सदर पुस्तीका संस्थानद्वारा प्रकाशित करावी अशी विनंती केली आहे. याबाबत त्यांना कोणतेही मानधन नको आहे, तसेच प्रकाशनाचे सर्व हक्क ते संस्थानला विनाअट देणार आहेत. पुस्तीकेच्या १००० प्रती ते देणगी दाखल देणार आहेत.

संस्थान मार्फत कै.कृ.जा.भिष्म यांनी रचलेल्या मराठी आरतीचा गुजराथी भाषेत अनुवाद प्रकाशित करण्यात आलेला आहे. परंतु सदर पुस्तीकेत आरतीचा अर्थ सांगितलेला नाही. संस्थान प्रकाशित इंग्रजी आरती अर्थासह श्रीमती झरीन तारापोरवाला यांनी तयार केली आहे. गुजराथी साईभक्तांना बाबांच्या आरतीचा अर्थ समजावा या हेतूने त्यांनी इंग्रजी आरती पुस्तीकेचा गुजराथी भाषेत अनुवाद करणेस परवानगी मागितली आहे.

सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ च्या कलम नं.१७ ठ मध्ये "श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहीतीचा प्रचार- प्रसार करील आणि साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील" अशी तरतूद आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२४.०५.२००८ चे सभेत निर्णय क्र.४१५ अन्वये संस्थानद्वारा प्रकाशित होणा-या प्रकाशनाची वाढती संख्या विचारात घेऊन "इतर कुठल्याही अन्य खाजगी प्रकाशनांचे हक्क स्वीकारण्यात येऊ नयेत" असा निर्णय पारित झाला आहे".

तथापि संस्थानमार्फत इंग्रजी आरतीचा गुजराथी भाषेत अनुवाद अर्थासह प्रकाशित नसल्याने, अधिनियमातील तरतुदीनुसार साईबाबांचे जीवन कार्याचा प्रसार - प्रचार सर्व भाषेत व्हावा म्हणून अर्थासह गुजराथी भाषेत आरती पुस्तीका असणे आवश्यक आहे. हिंदी, बंगाली, पंजाबी,तेलगू, तामिळ,इंग्रजी भाषेत आरतीची पुस्तके अर्थासह उपलब्ध आहेत.

संस्थानचे नियमाप्रमाणे पुस्तीका प्रकाशनापूर्वी, केलेला अनुवाद मुळ प्रकाशनाबर हुकूम असून, अनुवाद करतांना कोणताही फेरबदल केला नसलेबाबत पुणे विद्यापिठाचे प्रमाणपत्र सादर करणेस त्यांना सांगता येईल. सर्व बाबींची पूर्तता झाल्यानंतरच पुस्तीका संस्थानद्वारा प्रकाशित करणेबाबत कार्यवाही करणेत येईल.

सबब श्री राकेश पटेल,सुरत यांना श्री सद्‌गुरु साईनाथ सगुणोपासना (आरती इंग्रजी अर्थासह) अनुवादक श्रीमती झरीन या संस्थान प्रकाशित पुस्तीकेचा गुजराथी भाषेत अनुवाद करणेस अनुमती देणेकामी व उपरोक्त नमुद केलेप्रमाणे त्यांनी कार्यवाही पूर्ण केल्यानंतर सदर पुस्तीका संस्थानद्वारा प्रकाशित करणेस मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.६२४ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री राकेश पी.पटेल,सुरत यांना श्री साईनाथ सगुणोपासना (इंग्रजी आरती अर्थासह) अनुवादक श्रीमती झरीन या पुस्तीकचा गुजराथी भाषेत अनुवाद करणेस मान्यता देण्यात आली. याकामी त्यांनी संस्थानचे नियमाप्रमाणे पुस्तक प्रकाशनापूर्वी केलेला अनुवाद योग्य असलेबाबत पुणे विद्यापीठाचे प्रमाणपत्र सादर करणेबाबत त्यांना सांगण्यात यावे असे ठरले.**

(कार्यवाही-अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.५३ श्रींचे समाधी मंदिराचे व्ही.आय.पी.तील फोटो इतरत्र हलविणेबाबत.**

**प्रस्ताव-** समाधी मंदिरामध्ये श्रींचे दर्शनासाठी साईभक्त, ग्रामस्थ, व्ही.आय.पी.मान्यवर येतात. त्याचप्रमाणे ज्यावेळी समाधी मंदिरामध्ये महत्वाचे व अतिमहत्वाचे व्यक्ती दर्शन घेतात. त्यावेळी त्यांचा संस्थानचे अतीने सत्कार करण्यात येतो. सदर सत्कार श्रींचे समाधी मंदिरातील गर्दीचे प्रमाण लक्षात घेता समाधी मंदिराचे दक्षिणेकडे एक खोली आहे. सदर खोलीमध्ये संस्थानमार्फत पूर्वी श्री साईबाबांचे फोटोचे एक कॅलेन्डर लावलेले असायचे व फक्त अति महत्वाचे मान्यवरांनाच याठिकाणी नेऊन सत्कार करण्यात येत असत. सध्या या व्ही.आय.पी.कक्षामध्ये कालांतराने श्रींची द्वारकामाई फोटो ठेवण्यात आला आहे. तसेच हा फोटो श्रींचे द्वारकामाईतील फोटोची प्रतिकृती आहे व त्यास नंतर चांदीची फ्रेम लावणेत आली व हा फोटो लाकडी मखरामध्ये ठेवणेत आलेला आहे.

असे आढुळुन येते की, काही ग्रामस्थ, तसेच दर्शनार्थी साईभक्त श्रींचे व्ही.आय.पी मधील फोटोचे दर्शन घेण्यासाठी आग्रह धरतात. त्यामुळे श्रींचे व्ही.आय.पी.मधील फोटोचे महत्व श्रींचे समाधी प्रमाणेच जास्त वाढत असल्याचे दिसते. वास्तवीक व्ही.आय.पी.मधील फोटोची व्ही.आय.पी रुममध्ये काही एक परंपरा नाही अथवा इतिहास नाही. परंतु, त्यास लोक व्ही.आय.पी रुममध्ये महत्व देत असल्याचे दिसते. वास्तवीक सदरचा फोटो व्ही.आय.पी. रुममधुन हालविणे आवश्यक आहे. स्थानिक लोक तसेच बाहेरील भक्तही व्ही.आय.पी.चे फोटोचे दर्शनाचा आग्रह धरुन व्ही.आय.पी.मध्ये येतात. त्यावेळी इतर व्ही.आय.पी. तेथे असतात. त्यांचाही विचार न करता, न विचारता ते व्ही.आय.पी.रुममध्ये येतात व दर्शन घेतात हे योग्य नाही, असे वाटते.

तरी सदरचा फोटो द्वारावती भक्तनिवासस्थान अथवा सभागृह येथे हालविणेस व संबंधीत विभागाकडे वर्ग करणेत यावा असे नम्र मत आहे. याबाबत निर्णय होणेस विनंती आहे.

**निर्णय क्र.६२५ यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू विषय स्थगित ठेवण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही-अधिक्षक,मंदिर विभाग)

---

**विषय नं.५४ साईटेक प्रकल्पाच्या नुतनीकृत Revised Development Plan ची नोंद घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समितीचे विविध निर्णयांनुसार माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत मा. श्री. के. व्ही. रमणी सो. यांचे मार्गदर्शनाखाली साईटेक प्रकल्प उभारणीची कार्यवाही हाती घेण्यात आलेली आहे. त्यानुसार कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी यांना प्रकल्प उभारणाी साठीचा कार्यादेश देण्यात आलेला आहे. साईटेक प्रकल्प एकुण ६ टप्प्यामध्ये कार्यान्वीत करण्यात येणार आहे. करारनाम्यानुसार प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यातील पहिली कार्यप्रणाली संस्थानने स्विकारल्यापासून १८ महिन्याच्या कालावधीत साईटेक प्रकल्प उभारणीचे काम पुर्ण करावयाचे आहे.

करारनाम्यानुसार प्रकल्प उभारणीचे काम जानेवारी २०१० ला सुरु होऊन जुन २०११ ला पुर्ण होणे अपेक्षित होते. साईटेक प्रकल्प उभारणीच्या सुरवातीच्या काळात सर्व्हर रुम व नेटवर्क उभारणीचे काम हाती घेण्यात आले होते. सर्व्हर रुम उभारणीचे ठिकाण सुरवातीला मंदिर परिसरातील जुने आयटी विभागात ठरले होते, परंतु श्री साईबाबांच्या समाधीचा शतक महोत्सवास होणारी संभाव्य गर्दि लक्षात घेता मंदिर परिसरातील कार्यालय भविष्यकाळात हलविण्यात आले तर सर्व्हर रुम ही हालवावी लागेल हे लक्षात घेऊन सर्व्हर रुमची जागा बदलविण्यात आलेली आहे. तसेच शिर्डीत नेहमी असणारी साईभक्तांची गर्दी तसेच रस्त्याच्या दुतार्फा असलेली दुकानांची गर्दी यामुळे संस्थानचे विविध विभागांना नेटवर्कद्वारे जोडण्याठी आवश्यक असलेली फायबर केबल टाकणेसाठी अनेक अडचणी आल्या. उपरोक्तप्रमाणे प्रकल्प उभारणीचे कामात आलेल्या अडचणींमुळे प्रकल्प ठरविलेल्या वेळेत कार्यान्वीत करण्यास विलंब झालेला आहे.

प्रकल्पातील पहिल्या टप्प्यातील कार्यप्रणाली या दि. १५/०७/२०११ राजी कार्यान्वीत करण्यात ओलेल्या आहेत. या कार्यप्रणाली पुढीलप्रमाणे आहेत :-

१. ऑनलाईन सर्व्हिसेस
२. दर्शन पास
३. प्रसादालय कुपन विक्री
४. रुम रिझर्वेशन

कॉग्नीझंट कंपनीबरोबर झालेल्या करारनाम्यानुसार प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत करण्यात ओलेली पहिली कार्यप्रणाली स्वीकारल्यापासून १८ महीन्याच्या कालावधीत उर्वरीत कार्यवाही पुर्ण होणे अपेक्षीत होते. परंतु प्रकल्प उभारण्याच्या कामात आलेल्या विविध अडचणींमुळे प्रकत्प निर्धारीत वेळेत पुर्ण करणे अशक्य

झालेले होते. प्रकल्पसाठी तयार करण्यात आलेल्या करारनाम्यानुसार कॉग्नीझंट कंपनी व श्री साईबाबा संस्थान यांना सहमतीने निर्धारीत वेळेत बदल करण्याचा अधिकार (SOW Clause No.४.१) आहे.

सदर करारनाम्यानुसार कॉग्नीझंट कंपनीने साईटेक प्रकल्प उभारणीसाठी सुधारीत Revised deployment plan पुढीलप्रमाणे सादर केलेला आहे.

Revised SaiTech Development Plan

१. Infrastructure Milestones :

| Sr.No. | Infra Projects | Old Date of Completion | New Date of Completion |
|---|---|---|---|
| 01. | Reliance – Airtel - Internet Auto fail over | 09.04.2010 | 30.06.2012 |
| 02. | Reliance RF implementation | 09.04.2010 | 30.04.2012 |
| 03. | Remote Infocenter set up | 09.04.2010 | 31.07.2012 |
| 04. | Backup links for remote Infocenters | 09.04.2010 | 30.09.2012 |
| 05. | DR implementation | 09.04.2010 | 30.07.2012 |

२. Application Milestones :

| Sr. No. | Milestone | Old Date of Completion | New Date of Completion (Go-Live) |
|---|---|---|---|
| 1 | Release 1 A (Online System, Prasadalay - I, Accommodation, Darshan Pass PI) | 31.05.2010 | 14.07.2011 |
| 2 | Release 1 B (Finance System, Inventory System, Prasadalay - II) | 31.05.2010 | 14.07.2012 |
| | Release 2 (Donation, Cheque DD, Postal MO)) | 31.08.2010 | 03.09.2012 |
| 3 | Release 3 – A (Life Membership, Saileela Membership, Book Store and Book Shop, Canteen, Telephone Billing,) | 30.11.2010 | 10.09.2012 |
| 4 | Release 3 – B (Cloth Store and Cloth Shop, Laddu Prasad (ERP) | 30.11.2010 | 17.09.2012 |
| 5 | Release 4-A (Legal Department, Guest Information, Water Supply, Inward/Outward Tracking, Kiosk) | 28.02.2011 | 03.12.2012 |
| 6 | Release 4-B (Meeting Section , Medical Aid, Construction, Electrical Dept.) | 28.02.2011 | 04.01.2013 |
| 7 | Release 5 (Vehicle Dept, HR & Payroll, Labour, Education Complex , Information systems for Sr. officers(RTI Incl), Security Dept.) | 31.05.2011 | 16.02.2013 |
| 8 | Release 6 (Festival Budgeting & Mgmt., Record Maintenance, Q-mgmt. phase-2, Integration with HMS system, MIS) | 30.06.2011 | 28.03.2013 |
| 9 | Release 7 (Proxy & Email integration/ setup<br>Old Data Migration | -- | 28.03.2013 |
| 10 | Final Integration: Review, monitoring and tuning of all 37 SaiTech implemented systems for features, performance and user feedback. | -- | 31.03.2013 |

उपरोक्त प्रमाणे, सुधारीत Released SaiTech Development Plan ला तांत्रिक समितीचे अध्यक्ष, मा.श्री.के.व्ही. रमणी सो. यांनी दि.२७.०६.२०१२ रोजीचे ई-मेलद्वारे मान्यता दिलेली आहे. तसेच संस्थानने सदरच्या Revised Plan ला मान्यता आहे.

उपरोक्तप्रमाणे, SaiTech Review Deployment Plan ची नोंदी घेणेसाठी , सदर प्रस्ताव मा. त्रिसदस्य समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.६२६ उपरोक्त प्रस्तावाची नोंद घेण्यात आली. तथापि, साईटेक प्रकल्पाच्या संबंधीत माहितीचे सादरीकरण मा.व्यवस्थापन समितीच्या पुढील सभेपुढे करण्यात यावे, असे ठरले.**

(कार्यवाही-आय.टी. विभागप्रमुख)

---

**विषय नं. ५५ श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को ऑप सोसायटी यांचे मंदिर परिसरातील गाळे परिसराबाहेर स्थलांतरीत करणे बाबत.**

**प्रस्ताव-** १) श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप सोसायटी, शिर्डी यांना मंदीर परिसरात (दिक्षीत वाड्या जवळ) सन १९९१ पासून २ स्टॉल चालविणेस परवानगी देण्यात आली होती. त्यामध्ये वेळोवेळी सोसायटीच्या मागणी नुसार व मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने भक्तांचे सोयीसाठी प्रस्तुत स्टॉलची संख्या वाढून ती सन २०१० पर्यंत ६ स्टॉल पर्यंत गेलेली आहे.

२) मा.व्यवस्थापन समितीने सोसायटीस सन २००३ पासून वेळोवेळी दिलेल्या मुदतवाढी बाबतची माहिती खालील तक्त्यात दर्शविली आहे.

| अ.क्र. | मा.व्यवस्थापन समिती सभा दिनांक | वापरास दिलेला कालावधी |
|---|---|---|
| १ | दि. १५-१७/०७/२००० | दि. ०१/०७/२००३ ते दि. ३०/०६/२००४ |
| २ | दि. २०/०६/२००४ | दि. ०१/०७/२००४ ते दि. ३१/०५/२००५ |
| ३ | दि. ०८/०५/२००५ | दि. ०१/०६/२००५ ते दि. ३१/०५/२००६ |
| | | दि. ०१/०६/२००६ ते दि. ३१/०५/२००७ |
| | | दि. ०१/०६/२००७ ते दि. ३१/०५/२००८ |
| ४ | दि. २४/०५/२००९ | दि. ०१/०६/२००८ ते दि. ३१/०५/२००९ |
| ५ | दि. १०/०१/२०१० | दि. ०१/०६/२००९ ते दि. ३१/०५/२०१० |
| ६ | दि. ०४/०७/२०१०<br>(मंदीर परिसरातील ६ गाळे/ स्टॉल सोडून ) | दि. ०१/०६/२०१० ते दि. ३१/०५/२०११ |
| ७ | दि. १४/०१/२०१२<br>(मंदीर परिसरातील ६ गाळे/ स्टॉल सोडून ) | दि. ०१/०६/२०११ ते दि. ३१/०५/२०१२ |

३) **अ)** मा.व्यवस्थापन समितीचे दि. १०/०१/२०१० रोजीचे सभेतील आयत्या वेळचा विषय नं. ८९ निर्णय क्र. १९२ नुसार मा.विश्वस्तांचे सुचनेनुसार . " संस्थान परिसरातील जनसंपर्क कार्यालय, रेल्वे रिझर्वेशन काऊंटर व संस्थान कर्मचाऱ्यांची श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट को.ऑप सोसायटी साठी देण्यात आलेले सर्व स्टॉल जुने प्रसादालय परिसरात हलविण्यात यावे" असे ठरले तसेच

**ब )** मा.व्यवस्थापन समितीचे दि. ०४/०७ /२०१० रोजीचे सभेतील विषय नं. ७६ ने श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप सो.लि.शिर्डी यांना चालविण्यास देण्यात आलेल्या व्यवसायांच्या गाळ्यांना मुदतवाढ देणेबाबतचा विषय सादर केला होता. त्यावर निर्णय क्र. ५९७ ने सविस्तर चर्चा होवून "व्यवस्थापन समितीचे दि. १०/०१/२०१० चे सभेतील निर्णय क्र. १९२ अन्वये ठरलेनुसार संस्थान मंदीर परिसरातील श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप सोसायटीस देण्यात आलेले गाळे मंदीर परिसराबाहेर हलविल्यासच मुदतवाढ देण्यात यावी. तसेच उर्वरित उपरोक्त गाळ्यांना लिव्ह ॲण्ड लायसेन्स तत्वावर पुढील एक वर्षासाठी पुर्वीचे मासिक परवाना फी मध्ये १०% वाढ करुन मुदतवाढ देण्यात यावी," असे ठरले आहे.

४) दि.१०/०१/२०१० व दि.०४/०७/२०१० चे ठरावास अनुसरुन मंदीर परिसरातील स्टॉल्स् / गाळे स्थलांतरीत करण्याबाबत श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे.को. सोसायटीस १) दि. ०९/०४/२०१०, २) दि. २९/०५/२०१०, ३) दि. २०/०७/२०१०, ४) दि.१४ /०२/२०११, ५) दि. ०१/०६/२०११, ६) दि. १७/०९/२०११, ७) दि. ०४/११/२०११, ८) दि. २७/०२/२०१२, ९) दि. १२/०३/२०१२ , या ९ पत्राने व तोंडी सुचनेव्दारे कळविणेत आले होते. परंतु सोसायटीने सदर स्टॉलचे स्थलांतर अद्यापही केलेले नाही.

५) श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे.को. सोसायटीस मंदीर परिसराबाहेरील व्यवसायांना दिलेली मुदत दि. ३१/०५/२०११ रोजी संपुष्टात आल्याने सोसायटीचे दि.०२/०४/२०११ रोजीचे पत्राने पुढील मुदतवाढ मिळणेस विनंती केली होती. त्यावर दि.२४/०७/२०११ रोजी मा.व्यवस्थापन समितीचे सभेततील विषय नं ७२ व निर्णय क्र.५६३ ने "..संस्थान मंदिर परिसरातील सोसायटीस देण्यात आलेले गाळे मंदीर परिसराबाहेर न हलविल्याने सदरचा प्रस्ताव स्थगीत ठेवण्यात यावा असे ठरले.." त्यानुसार जा.क्र. एसएसएस/ वशी- विधी / ३११२/२०११ दि.१७/०९/२०११ चे पत्राने सोसायटीस मंदिर परिसरातील प्रस्तुत गाळे स्थलांतरीत करणेबाबत कळविण्यात आले होते. परंतु सोसायटीने गाळे / स्टॉल स्थलांतरीत करणेबबात कार्यवाही केलेली नाही.

६) दि. १४/०१/२०१२ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत श्री साई संस्थान ए.क्र.को-ऑप सोसायटी शिर्डी यांना चालविण्यास देण्यात आलेल्या मंदीर परिसरातील व परिसरा बाहेरील गाळ्यांना / स्टॉलला मुदतवाढ देण्याबाबतचा विषय मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता. त्यावर निर्णय क्र. १२७ अन्वये सविस्तर चर्चा होवून, " मंदीर परिसरातील गाळे परिसरा बाहेर हलविण्याबाबत त्वरीत कार्यवाही करावी यासाठी त्यांना पत्र देण्यात यावे .." असे ठरले. त्यास अनुसरुन समाधी मंदीर परिसरातील सर्व गाळे संस्थान परिसरातुन इतरत्र हलविणेबाबत कार्यवाही त्वरीत करावी त्याबाबतची संपुर्ण जबाबदारी सोसायटीवर राहील असे सोसायटीस जा.क्र.६२६३/२०१२ दि.१२/०३/२०१२ पत्राने कळविणेत आलेले आहे. परंतु अद्यापही सोसायटीकडुन गाळे / स्टॉल स्थलांतरीत करणेबाबत कार्यवाही झालेली नाही.

तरी श्री साई संस्थान एम्प्लॉइज क्रे.को-ऑप सोसायटीचे मंदीर परिसरातील गाळे / स्टॉल स्थलांतरीत करणे बाबतचे निर्णयासाठी सादर.

**निर्णय क्र.६२७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद कोर्टात केस दाखल असल्याने सदरहू विषय स्थगित ठेवण्यात यावा असे ठरले.** (कार्यवाही-विधी अधिकारी)

---

**विषय नं. ५६** **श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट को.ऑप सोसायटी लि.शिर्डी यांना लिव्ह ॲण्ड लायसेन्स तत्वावर वापरास देण्यात आलेल्या व्यवसायांचे जागेवाबत परवानगी मुदतवाढी बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे.को. सोसायटी, शिर्डी यांना साईभक्तांचे सोईचे दृष्टीने संस्थान परिसरात खालील तक्त्यात दर्शविल्या प्रमाणे उपक्रम चालविणेसाठी लिव्ह ॲन्ड लायसन्स तत्वावर जागा वापरासाठी दि.०१/०६/२०११ ते दि. ३१/०५/२०१२ याकालावधीसाठी प्रती गाळ्यास रु. ५,५००/- परवाना फी व विद्युत बिल वेगळे आकारुन मुदतवाढ देण्यात आलेली आहे. साईभक्तांच्या सेवेसाठी व सोयीसाठी मा.व्यवस्थापन मंडळाचे दि. १४/०१/२०१२ रोजीचे ठरावांस अनुसरुन सदर परवानगी दिलेली आहे.

**१) क्लोकरुम व्यवस्था.**

| अ.नं. | व्यवसायाचे नांव | कालावधी | मा.परवाना फी | ठिकाण | आदेश क्र. |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | क्लोकरुम<br>१) सुलभ क्लोकरुम,<br>२ ) साईप्रसाद नं.१<br>३) साईप्रसाद नं.१ रुम नं.१३ व<br>रुम नं. १४<br>४) व्दारावती निवासस्थान क्लोकरुम | दि.०१/०६/२०११ ते दि. ३१/०५/२०१२<br>--//--<br>--//--<br>--//--<br>--//-- | रु. ५,५००/-<br>रु. ५,५००/-<br>रु. ५,५००/- डिपॉझीट प्रती रुम रु. ५०,०००/-<br>रु. ५,५००/- डिपॉझिट प्रती रुम रु. ५०,०००/-<br>रु. ५,५००/- डिपॉझिट प्रती स्टॉल रु. १०,०००/- | १)सुलभ शौचालय इमारत<br>२) चहा कॅन्टीन शेजारी रुम.<br>३) चहा कॅन्टीन चे उत्तरेकडील रुम.<br>४) द्वारावती निवासस्थान गेटलगत. | जा.क्र.एसएसएस वशी / ६२३५ /२०१२ दि.१२ /०३/२०१२ |

सदर व्यवसाय चालविण्यास स्टॉल / गाळ्यांना संस्थानने सोसायटीस आदेश क्र. ६२३५/२०१२ दि. १२/०३/२०१२ ने मुदतवाढ दिलेले आहे.

**२) कारपार्किंग व्यवस्था.**

श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे.को. सोसायटी, शिर्डी यांना साईभक्तांचे सेवेसाठी व सोयीसाठी संस्थानचे नविन भक्तनिवासस्थान परिसरात (५०० रुम) लायसेन्स फी रु. ५७,०६४/- व धर्मशाळा परिसर (२०० रुम) लायसेन्स फी रु. १४,२६८/- आकारुन लिव्ह ॲन्ड लायसन्स तत्वावर कारपार्किंग चालविणेस दि. ३१/०५/२०१२ अखेर परवानगी देण्यात आलेली आहे. ( सोसायटीने दि. २०/०४/२०१२ चे पत्राने कारपार्किंग व्यवस्था चालू ठेवणेस मुदतवाढ मागीतली आहे.)

**३) मोबाईल कॅमेरा क्लोकरुम व्यवस्था.**

श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे.को. सोसायटी, शिर्डी यांचे मार्फत खालील तक्त्यात दर्शविले प्रमाणे संस्थान परिसरात जागा साईभक्तांचे मोबाईल कॅमेरा क्लोकरुम ठेवणेस परवानगी दिलेली आहे. सदर मुदत दि. ३१/०५/२०१२ अखेर संपत आहे.

| अ.नं. | व्यवसायाचे नांव | कालावधी | मा.परवाना फी | ठिकाण | आदेश क्र. |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | १) मोबाईल कॅमेरा क्लोकरुम,<br>२) मोबाईल कॅमेरा क्लोकरुम. | दि.०१/०६/२०११ ते दि. ३१/०५/२०१२<br>--//-- | रु. ५,५००/- डिपॉझीट प्रती स्टॉल रु. १०,०००/-<br>रु. ५,५००/- डिपॉझीट प्रती स्टॉल रु. १०,०००/- | साईप्रसाद नं.१ इमारतीचे जवळील पत्राशेड मधे.<br>साईउद्यान परिसर पिंपळवाडी रोडलगत पत्राशेड | जा.क्र.एसएसएस वशी / ६२३५ /२०१२ दि.१२ /०३/२०१२ |

**४) पादत्राणे गृह व्यवस्था.**

| अ.नं. | व्यवसायाचे नांव | कालावधी | मा.परवाना फी | ठिकाण | आदेश क्र. |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | १) पादत्राणे गृह | दि.०१/०६/२०११ ते दि. ३१/०५/२०१२ | रु. ५,५००/- डिपॉझीट प्रती स्टॉल रु. १०,०००/- | साईप्रसाद नं.१ इमारतीचे जवळील | जा.क्र.एसएसएस वशी / ६२३५ /२०१२ दि.१२ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | २) पादत्राणे गृह | --//-- | रु. ५,५००/- डिपॉझीट प्रती स्टॉल रु. १०,०००/- | पत्राशेड मधे. साईउद्यान परिसर पिंपळवाडी रोडलगत. पत्राशेड | /०३/२०१२ |

**५) दुध व दुग्धजन्य पदार्थ व्यवस्था.**

| अ.नं. | व्यवसायाचे नांव | कालावधी | मा.परवाना फी | ठिकाण | आदेश क्र. |
|---|---|---|---|---|---|
| १ | <u>दुध व दुग्धजन्य पदार्थ स्टॉल</u><br>१) दुध स्टॉल नं.२,<br>२) दुध स्टॉल नं.५, | दि.०१/०६/२०११ ते दि. ३१/०५/२०१२<br>--//-- | रु. ५,५००/-<br>रु. ५,५००/- | १) साईप्रसाद नं. १ परिसर - स्टॉल<br>२) स्वागत कक्ष परिसर - स्टॉल | जा.क्र.एसएसएस वशी / ६२३५ /२०१२ दि.१२ /०३/२०१२ |

**६) प्रसाद व नॉव्हेल्टी स्टोअर व्यवस्था.**

| अ.नं. | व्यवसायाचे नांव | कालावधी | मा.परवाना फी | ठिकाण | आदेश क्र. |
|---|---|---|---|---|---|
| १ | <u>प्रसाद नॉव्हेल्टी</u><br>१) नॉव्हेल्टी स्टोअर नं.-३,<br>२ ) प्रसाद स्टोअर नं.०२, | दि.०१/०६/२०११ ते दि. ३१/०५/२०१२<br>--//-- | रु. ५,५००/-<br>रु. ५,५००/- | १) धर्मशाळा ब्लॉक नं.१,<br>२) धर्मशाळ ब्लॉक नं.२, | जा.क्र.एसएसएस वशी / ६२३५ /२०१२ दि.१२ /०३/२०१२ |

**७) एस.टी.डी.बुथ व्यवस्था.**

| अ.नं. | व्यवसायाचे नांव | कालावधी | मा.परवाना फी | ठिकाण | आदेश क्र. |
|---|---|---|---|---|---|
| १ | <u>एस.टी.डी.बुथ</u><br>१) एस.टी.डी.-०१,<br>२) एस.टी.डी.-०२, | दि.०१/०६/२०११ ते दि. ३१/०५/२०१२<br>--//-- | रु. ५,५००/-<br>रु. ५,५००/- | १) साईप्रसाद नं. १ पॉ. हाऊस समोर स्टॉल<br>२) धर्मशाळा परिसर (२००रुम) गाळा | जा.क्र.एसएसएस वशी / ६२३५ /२०१२ दि.१२ /०३/२०१२ |

साईभक्तांच्या सोईसाठी श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे.को. सोसायटी, शिर्डी यांना उपरोक्त प्रमाणे लिव्ह ॲन्ड लायसन्स तत्वावर जागा वापरास दिलेल्या परवानगीची मुदत दि. ३१/०५/२०१२ रोजी संपुष्टात येत आहे. सोसायटी यांनी प्रस्तुत जागेत व्यवसाय चालविण्यासाठी ५ वर्षासाठी परवानगी मिळावी अशा आशयाचे सोबतचे ७ अर्ज सादर केलेले आहेत.

श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे.को. सोसायटी, शिर्डी उपरोक्त व्यवसायचे बरोबरच प्रसादालय परिसरांत पश्चिम उत्तर गेटजवळ प्रसाद नॉव्हेल्टी स्टॉल चालवित आहे . त्याच प्रमाणे मंदीरपरिसरातील पश्चिम दक्षिण गेट नं. ४ लेंडी बागेजवळ पादत्राणे स्टॉल चालवत आहे. सदर वाढीव स्टॉलचा उल्लेख त्यांनी उपरोक्त अर्जात केलेला नाही . तसेच संबंधीत विभाग म्हणजे संरक्षण विभाग , चौकशी विभागाचाही याबाबत रिपोर्ट नाही .तेव्हा सदरचा वापर बाबत संबंधीत विभागाकडुन माहिती घेऊन रेग्युलाईज करणे बाबतचा विचार करावा लागणार आहे.

संस्थानचे अधिनियम कलम १७ (३) प्रमाणे प्रमाणे संस्थानची स्थावर मालमत्ता शासनाच्या पुर्व परवानगी शिवाय एक वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी (Alinate) संक्रमित करता येत नाही. No immovable property vested in the Trust shall be leased for more than a year, or mortgaged, sold or otherwise alienated by the committee, except with the previous sanction in writing of the State Government. अशी सदरची तरतुद आहे. श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे.को. सोसायटी, शिर्डी यांचे प्रस्तुतचे अर्जात विनंती केलेप्रमाणे त्यांना त्यांचे व्यवसायासाठी ५ वर्षाकरीता संस्थानची जागा संक्रमित करता येणार नाही.

तरी श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे.को. सोसायटी संस्थान नोकरांची सहकारी संस्था आहे. संस्थानचे मान्यतेने साईभक्तांचे सेवेसाठी व सोयीसाठी सेवाभावी संस्था म्हणून आवश्यक ते पुरक व्यवसाय करणे हे संस्थेचे उद्देशामध्ये नमुद आहे. याबाबतचा विचार करता दि. ०१/०६/२०१२ ते दि. ३१/०५/२०१३ या एक वर्षासाठी उपरोक्त उपरोक्त जागा वापरांस : सदर ठिकाणी चालविणेस पुर्वीचे_मासिक परवाना

फी मध्ये २०% वाढ करुन व मिटर रिडींग प्रमाणे विद्युत आकार वेगाळा आकारुन मुदतवाढ देणेबाबतचे विचारार्थ सादर .तसेच त्यांनी इतर उपरोक्त ठिकाणी जे वाढीव व्यवसाय सुरु केले आहेत . त्याबाबतचे जागा वापर यांची माहिती संबंधीत विभागाकडुन घेऊन, त्या कालावधीपासुन मासिक परवाना फी आकारता येईल .

सोसायटीचे मंदीर परिसरातील स्टॉल संस्थान हद्दीतून काढून टाकणेबाबत त्यांना सुचीत करण्यात आलेले आहे. सोसायटीचे पदाधिकारी समवेत या मुद्यावर चर्चा झालेली आहे. श्री संजय काळे यांनी मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथील पी.आय.एल. नं. २५/२०१२ संजय काळे विरुध्द संस्थान या जनहित याचीकेमध्ये संस्थानचे अधिनियम कलम १७ (३) प्रमाणे टेंडर / नोटीस न काढता सदर सेवा पतपेढी मार्फत सुरु आहे. याबाबत श्री संजय काळे यांची तक्रार / आक्षेप आहे. ही बाब विचारात घेता श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे.को. सोसायटी शिर्डी यांना वापरांस दिलेली जागा / गाळ्यास मुदतवाढ देणे / न देणेबाबतचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.६२८** **यावर सविस्तर चर्चा होऊन,सदरहू गाळ्यांची प्रत्यक्ष पहाणी करुन अंतिम निर्णय घेण्यात यावा असे ठरले.** (कार्यवाही-विधी अधिकारी)

---

**विषय नं.५७** **मयत अनुकंपा तत्वावर कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने संस्थानमध्ये नोकरी मिळणेबाबत श्री मंगेश रामदास पाटणकर यांचा अर्ज.**

**प्रस्ताव-** श्री मंगेश रामदास पाटणकर रा.शिर्डी यांनी त्यांचे वडील कै.रामदास बाळासाहेब पाटणकर यांचे संस्थान सेवेत असतांना निधन झालेने अनुकंपा तत्वावर कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने नोकरी मिळणेबाबत दि.१४/०५/२०१२ रोजी अर्ज सादर केलेला आहे. अर्जाचा सुधारीत विहीत नमुना तयार करण्यात आलेला आहे त्यास अनुसरुन अर्जदाराने अर्ज सादर केला आहे. सदर अर्जासोबत त्यांनी खालीलप्रमाणे कागदपत्रे सादर केलेली आहेत.

१) श्री मंगेश रामदास पाटणकर यांचा शाळा सोडल्याचा दाखला सदर दाखल्यानुसार जन्मतारीख ०९/०५/१९९१ अशी असल्याने त्यांचे आजमितीस वय २२ वर्ष आहे.
२) श्री मंगेश पाटणकर यांचे इ.१० वी उतीर्णचे महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांचेकडील प्रमाणपत्र तसेच ११ वी पास असलेचे गुणपत्रक
३) मा.तहसिलदार, राहाता यांचेकडील दि.०९/०१/२०१२ चे श्रीमती शोभा पाटणकर व श्री गणेश पाटणकर यांनी श्री मंगेश पाटणकर यांना नोकरीवर घेण्यास संमती बाबतचे प्रतिज्ञापत्र
४) दिवंगत रामदास पाटणकर यांच्या शिधापत्रिकेवरील श्री मंगेश रा.पाटणकर यांचे नावाची नोंद.

रामदास बाळासाहेब पाटणकर हे संस्थानचे साईप्रसाद निवासस्थान विभागाकडे वर्ग ४ कर्मचारी या पदावर सेवेत होते. त्यांचे दि.२४/१२/२०११ रोजी निधन झालेले असून त्यांच्या झालेल्या सेवेबाबतची माहिती खालील प्रमाणे-

०१) दिवंगत कर्मचाऱ्यांचे नांव :- रामदास बाळासाहेब पाटणकर
०२) मृत्युचे वेळी हुद्या व विभाग :- वर्ग ४ कर्मचारी, साईप्रसाद निवासस्थान विभाग
०३) संस्थानमधील सेवेचा कालावधी :- दि. १७/०३/१९८२ ते दि.२४/१२/२०११ एकूण सेवा २९ वर्षे ०९ म.
०४.मृत्यु दिनांक :- २४/१२/२०११

अनुकंपा तत्वावर नेमणूक देतांना मयत कर्मचाऱ्याची पत्नीचे वय ४० वर्षाचे आत असल्यास त्यांना प्राधान्याने नोकरीवर घेतले जाते. या करीता कर्मचाऱ्याने त्याच्या हयातीत करुन दिलेले विहीत नमूनयातील नॉमिनेशन (Form 'F' See Sub - Rule (१) of Rule ६ - " Nomination made herein invalidates my previous nomination. ") फॉर्ममध्ये संबंधीत व्यक्तीचे नांव असलेबाबत व त्याबाबत खातरजमा करुन अशा नेमणूका दिल्या जातात.

कै.रामदास पाटणकर हे हयात असतांना त्यांची ग्रॅच्यूएटी ॲक्ट १९७२ चे नियम नं.६ (१) नुसारचे दि.२२/०७/१९९१ नॉमीनेशन पत्रात सौ शोभा रामदास पाटणकर, वय वर्ष - २२ यांची (Nominees) वारसदार म्हणून नेमणूक केलेली आहे. श्रीमती शोभा पाटणकर यांचे शाळा सोडल्याचे दाखल्यानुसार त्यांची जन्मतारीख २२/१०/१९६६ आहे. त्यानुसार त्यांचे वय आज रोजी ४५ वर्ष आहे. सबब त्यांचे वय वर्ष ४० च्या पुढे असल्याने श्रीमती पाटणकर व श्री गणेश पाटणकर (अर्जदार यांचा मोठा भाऊ) यांनी मा.तहसिलदार, राहाता यांचेकडील रु.१०० चे स्टॅम्प पेपरवर श्री मंगेश रामदास पाटणकर यांना नोकरीवर घेण्यास आमची संमती असलेबाबत प्रतिज्ञापत्र सादर केलेले आहे.

महाराष्ट्र शासन निर्णय क्र.अकंपा-१०००-प्र.क्र.२०/२०००,आठ मंत्रालय मुंबई ३२ दि.२८/०३/२००१ व महाराष्ट्र शासन निर्णय क्र.अकंपा-१००४-प्र.क्र.५१/२००४,आठ मंत्रालय मुंबई ३२ दि.२२/०८/२००५ सुधारीत शासन निर्णय २ (२) नुसार शासकीय सेवेत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांचे एका पात्र नातेवाईकांस अनुकंपा कारणास्तव शासकीय सेवेत घेण्याची तरतूद आहे. त्यास अनुसरुन संस्थान सेवेत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांचे एका पात्र नातेवाईकास मानवतेच्या

दृष्टीकोणातून यापुर्वी अनुकंपाकारणास्तव संस्थान सेवेत घेण्यात आलेले आहे. त्यानुसार श्री मंगेश रामदास पाटणकर हे उपरोक्त निर्णयानुसार पात्र आहेत. तथापी -

शासन निर्णय क्र.सासंवि-२००९/४३३/(३७/०९) का.सोळा मुंबई-३२ दि.०७/०८/२००९ श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डीचे कर्मचारी आकृतीबंधास मान्यता मिळाली आहे. त्यात वर्ग ४ च्या कर्मचाऱ्यांची १२३९ स्थायी पदे मंजूर आहेत. सद्य स्थितीनुसार वर्ग ४ चे पदावर १३९९ इतके कर्मचारी भरलेले आहेत. त्यानुसार सध्या वर्ग ४ चे १६० कर्मचारी अतिरिक्त आहेत.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.१९/११/२०११ चे सभेतील निर्णय क्र.७६५ खालीलप्रमाणे झालेला आहे.

"सध्या संस्थान आस्थापनेवर वर्ग ४ ची पदे रिक्त नाहीत. त्यामुळे संस्थान सेवेत असतांना मयत झालेल्या कर्मचाऱ्यांचे नातेवाईकांना तूर्त लेबर कॉन्ट्रॅक्टरमार्फत संस्थानमध्ये कामास घेण्यात यावे व त्यांना कॉन्ट्रॅक्टरमार्फत किमान वेतनाप्रमाणे वेतन देण्यात यावे. "

उपरोक्त निर्णयानुसार यापूर्वीच्या अर्जदारांना लेबर कॉन्ट्रॅक्टरमार्फत प्रसादालय विभागाकडे कंत्राटी पध्दतीने कामावर घेण्यात आलेले आहे.

शासन निर्णय क्र.अकंपा-१०९३/प्र.क्र.९०/९३/आठ दि.२६/१०/१९९४ अन्वये अनुकंपा कारणास्तव शासकीय सेवेत नोकरी देण्याबाबतची सुधारित नियमावलीमध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे.

"एखाद्या कुटुंबात मृत कर्मचाऱ्याचा नातेवाईक पूर्वीच सेवेत असेल, तथापी तो त्याच्या कुटूंबातील अन्य सदस्यांना आधार देत नसेल तर अशा प्रकरणात त्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती हलाखीची आहे किंवा कसे हे ठरविताना नियुक्ती अधिकाऱ्याने अत्याधिक दक्षता घ्यावी, जेणेकरुन सेवेत असलेला सदस्य कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत नाही या नावाखाली अनुकंपा तत्वावरील नियुक्तीचा दुरुपयोग केला जाणार नाही. "

उपरोक्त शासन निर्णयातील तरतूद राज्यशासन सेवेतील अनुकंपा नियुक्तीची योजना प्रचलित कार्यपद्धती व योजनेच्या तरतुदीत सुधारणा करण्याबाबतच्या शासन निर्णय क्र.अकंपा-१००४/ प्र.क्र.५१/ २००४/आठ, मंत्रालय, मुंबई-३२ दि.२२/०८/२००५ मध्ये कायम केलेल्या आहेत.

दिवंगत रामदास पाटणकर यांचा मोठा मुलगा नामे श्री गणेश रामदास पाटणकर हे लेबर कॉन्ट्रॅक्टर यांचेमार्फत सुरक्षा विभागाकडे पहारेकरी या पदावर डिसेंबर २००६ पासून कामास आहे. तथापी ते आई वडीलांतून विभक्त असून वेगळे राहत आहेत व त्यांची शिधापत्रिका वेगळी आहे. याबाबत श्री गणेश पाटणकर यांनी अर्ज व सोबत शिधा पत्रिका सादर केलेली आहे.

उपरोक्त शासन निर्णय व दिवंगत पाटणकर यांचा मुलगा यांचा लेखी अर्ज विचारात घेता दिवंगत रामदास बाळासाहेब पाटणकर यांचे जागेवर त्यांचा दुसरा मुलगा नामे श्री मंगेश रामदास पाटणकर यास लेबर कॉन्ट्रॅक्टरमार्फत कामास घेणेबाबतच्या प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६२९ यावर सविस्तर चर्चा होऊन, शासन निर्णय व दिवंगत पाटणकर यांचा मुलगा यांचा लेखी अर्ज विचारात घेता दिवंगत रामदास बाळासाहेब पाटणकर यांचे जागेवर त्यांचा दुसरा मुलगा नामे श्री मंगेश रामदास पाटणकर यास लेबर कॉन्ट्रॅक्टरमार्फत कंत्राटी पध्दतीने कामावर घेण्यात यावे असे ठरले.**
(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

---

**विषय नं.५८ मयतं अनुकंपा तत्वावर कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने संस्थानमध्ये नोकरी मिळणेबाबत श्रीमती निर्मला सुभाष सोनवणे, यांचा अर्ज.**

**प्रस्ताव-** श्रीमती निर्मला सुभाष सोनवणे, रा.शिर्डी यांनी त्यांचे पती कै.सुभाष शिवराम सोनवणे यांचे संस्थान सेवेत असतांना निधन झालेने अनुकंपा तत्वावर कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने नोकरी मिळणेबाबत दि.२८/०५/२०१२ रोजी अर्ज सादर केलेला आहे. अर्जाचा सुधारीत विहीत नमुना तयार करण्यात आलेला आहे त्यास अनुसरुन अर्जदाराने अर्ज सादर केला आहे. सदर अर्जासोबत त्यांनी खालीलप्रमाणे कागदपत्रे सादर केलेली आहेत.

१) श्रीमती निर्मला सुभाष सोनवणे यांचा शाळा सोडल्याचा दाखला सदर दाखल्यानुसार त्यांचे आजमितीस वय ३९ वर्ष ०६ महिने आहे.

२) मा.तहसिलदार, राहाता यांचेकडील दि.१६/०१/२०१२ चे दोन्ही नावाचे व्यक्ती एकच असलेबाबत प्रतिज्ञापत्र

३) दिवंगत सुभाष सोनवणे यांच्या शिधा पत्रिकेवरील श्रीमती निर्मला सुभाष सोनवणे यांचे नांवाची नोंद.

४) भारत निवडणूक आयोग यांचेकडील निर्मला सुभाष सोनवणे यांचेनावे ओळखपत्र

५) दिवंगत सुभाष सोनवणे यांचा मुलगा नामे राजेंद्र सुभाष सोनवणे यांचा शाळा सोडल्याच्या दाखल्यानुसार जन्मतारीख ०१/१०/१९९५ असल्याने त्यांचे आजमितीस वय - १६ वर्ष ०२ महिने (अज्ञान)

सुभाष शिवराम सोनवणे हे संस्थानचे संरक्षण विभागाकडे वर्ग ४ कर्मचारी या पदावर सेवेत होते. त्यांचे दि.२१/१२/२०१२ रोजी निधन झालेले असून त्यांच्या झालेल्या सेवेबाबतची माहिती खालील प्रमाणे

०१) दिवंगत कर्मचाऱ्यांचे नांव :- सुभाष शिवराम सोनवणे
०२) मृत्युचे वेळी हुद्दा व विभाग :- वर्ग ४ कर्मचारी, संरक्षण विभाग
०३) संस्थानमधील सेवेचा कालावधी:- दि. ०४/१२/२००६ ते दि.२०/१२/२०११ एकूण सेवा ०५ वर्षे
०४.मृत्यु दिनांक :- २१/१२/२०११

अनुकंपा तत्वावर नेमणूक देतांना मयत कर्मचाऱ्याची पत्नीचे वय ४० वर्षाचे आत असल्यास त्यांना प्राधान्याने नोकरीवर घेतले जाते. या करीता कर्मचाऱ्याने त्याच्या हयातीत करुन दिलेले विहीत नमून्यातील नॉमिनेशन (Form 'F' See Sub - Rule (१) of Rule ६ - " Nomination made herein invalidates my previous nomination.") फॉर्ममध्ये संबंधीत व्यक्तीचे नांव असलेबाबत व त्याबाबत खातरजमा करुन अशा नेमणूका दिल्या जातात.

कै.सुभाष सोनवणे हे हयात असतांना त्यांची ग्रॅच्यूएटी ॲक्ट १९७२ चे नियम नं.६ (१) नुसारचे दि.०७/०३/२००८ नॉमीनेशन पत्रात सौ.निर्मला सुभाष सोनवणे, वय वर्ष - ३० यांची (Nominees) वारसदार म्हणून नेमणूक केलेली आहे. श्रीमती निर्मला सोनवणे यांचे शाळा सोडल्याचे दाखल्यानुसार त्यांची जन्मतारीख ०१/०६/१९७२ आहे. त्यानुसार त्यांचे वय आज रोजी ३९ वर्ष आहे. सबब त्यांचे वय वर्ष ४० च्या आत असल्याने श्रीमती निर्मला सोनवणे यांनी नोकरीसाठी अर्ज केलेला आहे.

महाराष्ट्र शासन निर्णय क्र.अकंपा-१०००-प्र.क्र.२०/२०००,आठ मंत्रालय मुंबई ३२ दि.२८/०३/२००१ व महाराष्ट्र शासन निर्णय क्र.अकंपा-१००४-प्र.क्र.५१/२००४,आठ मंत्रालय मुंबई ३२ दि.२२/०८/२००५ सुधारीत शासन निर्णय २ (२) नुसार शासकीय सेवेत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांचे एका पात्र नातेवाईकांस अनुकंपा कारणास्तव शासकीय सेवेत घेण्याची तरतूद आहे. त्यास अनुसरुन संस्थान सेवेत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांचे एका पात्र नातेवाईकास मानवतेच्या दृष्टीकोणातून यापुर्वी अनुकंपाकारणास्तव संस्थान सेवेत घेण्यात आलेले आहे. त्यानुसार श्रीमती निर्मला सोनवणे हे उपरोक्त निर्णयानुसार पात्र आहेत. तथापी -

शासन निर्णय क्र.सासंवि-२००९/४३३/(३७/०९) का.सोळा मुंबई-३२ दि.०७/०८/२००९ श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डीचे कर्मचारी आकृतीबंधास मान्यता मिळाली आहे. त्यात वर्ग ४ च्या कर्मचाऱ्यांची १२३९ स्थायी पदे मंजूर आहेत. सद्य स्थितीनुसार वर्ग ४ चे पदावर १३९९ इतके कर्मचारी भरलेले आहेत. त्यानुसार सध्या वर्ग ४ चे १६० कर्मचारी अतिरिक्त आहेत.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.१९/११/२०११ चे सभेतील निर्णय क्र.७६५ खालीलप्रमाणे झालेला आहे.

"सध्या संस्थान आस्थापनेवर वर्ग ४ ची पदे रिक्त नाहीत. त्यामुळे संस्थान सेवेत असतांना मयत झालेल्या कर्मचाऱ्यांचे नातेवाईकांना तूर्त लेबर कॉन्ट्रॅक्टरमार्फत संस्थानमध्ये कामास घेण्यात यावे व त्यांना कॉन्ट्रॅक्टरमार्फत किमान वेतनाप्रमाणे वेतन देण्यात यावे. "

उपरोक्त निर्णयानुसार यापूर्वीच्या अर्जदारांना लेबर कॉन्ट्रॅक्टरमार्फत प्रसादालय विभागाकडे कंत्राटी पध्दतीने कामावर घेण्यात आलेले आहे.

शासन निर्णय क्र.अकंपा-१०९३/प्र.क्र.९०/९३/आठ दि.२६/१०/१९९४ अन्वये अनुकंपा कारणास्तव शासकीय सेवेत नोकरी देण्याबाबतची सुधारित नियमावलीमध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे.

"एखाद्या कुटुंबात मृत कर्मचाऱ्याचा नातेवाईक पूर्वीच सेवेत असेल, तथापी तो त्याच्या कुटूंबातील अन्य सदस्यांना आधार देत नसेल तर अशा प्रकरणात त्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती हलाखीची आहे किंवा कसे हे ठरविताना नियुक्ती अधिकाऱ्याने अत्याधिक दक्षता घ्यावी, जेणेकरुन सेवेत असलेला सदस्य कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत नाही या नावाखाली अनुकंपा तत्वावरील नियुक्तीचा दुरुपयोग केला जाणार नाही. "

उपरोक्त शासन निर्णयातील तरतूद राज्यशासन सेवेतील अनुकंपा नियुक्तीची योजना प्रचलित कार्यपद्धती व योजनेच्या तरतुदीत सुधारणा करण्याबाबतच्या शासन निर्णय क्र.अकंपा-१००४/ प्र.क्र. ५१/ २००४/ आठ, मंत्रालय, मुंबई-३२ दि.२२/०८/२००५ मध्ये कायम केलेल्या आहेत.

उपरोक्त शासन निर्णय व दिवंगत सोनवणे यांची पत्नी नामे श्रीमती निर्मला सुभाष सोनवणे यांचा लेखी अर्ज विचारात घेता दिवंगत सुभाष शिवराम सोनवणे यांचे जागेवर त्यांची नामे श्रीमती निर्मला सुभाष सोनवणे यांना लेबर कॉन्ट्रॅक्टरमार्फत कामास घेणेबाबतच्या प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६३०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शासन निर्णय व दिवंगत सोनवणे यांची पत्नी नामे श्रीमती निर्मला सुभाष सोनवणे यांचा लेखी अर्ज विचारात घेता दिवंगत सुभाष शिवराम सोनवणे यांचे जागेवर त्यांची पत्नी नामे श्रीमती निर्मला सुभाष सोनवणे यांना लेबर कॉन्ट्रॅक्टरमार्फत कंत्राटी पध्दतीने कामावर घेण्यात यावे असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

---

**विषय नं.५९** **मयत अनुकपा तत्वावर कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने संस्थानमध्ये नोकरी मिळणेबाबत श्री नितीन बबन कहांडळ, यांचा अर्ज.**

**प्रस्ताव-** श्री नितीन बबन कहांडळ रा.शिर्डी यांनी त्यांचे वडील कै.बबन सबाजी कहांडळ यांचे संस्थान सेवेत असतांना निधन झालेने अनुकंपा तत्वावर कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने नोकरी मिळणेबाबत दि.१७/०५/२०१२ रोजी अर्ज सादर केलेला आहे. अर्जाचा सुधारीत विहीत नमुना तयार करण्यात आलेला आहे त्यास अनुसरुन अर्जदाराने अर्ज सादर केला आहे. सदर अर्जासोबत त्यांनी खालीलप्रमाणे कागदपत्रे सादर केलेली आहेत.

१) श्री नितीन यांचा शाळा सोडल्याचा दाखला सदर दाखल्यानुसार जन्मतारीख १२/०३/१९९२ अशी असल्याने त्यांचे आजमितीस वय २० वर्ष आहे.

२) श्री नितीन कहांडळ यांचे इ.०९ वी उतीर्णचे शाळा सोडल्याचा दाखला सादर केलेला आहे.

३) श्रीमती शिला कहांडळ व कु.शितल बबन कहांडळ तसेच सौ.वैशाली मनोज शिंदे (वैशाली बबन कहांडळ (अनुक्रमे अर्जदाराची आई व बहीनी) यांनी मा.तहसिलदार, राहाता यांचेकडील श्री नितीन बबन कहांडळ यांना नोकरीवर घेण्यास संमती असलेबाबत दि.२१/०२/२०१२ चे प्रतिज्ञापत्र

४) दिवंगत कहांडळ यांच्या शिधापत्रिकेवरील श्री नितीन बबन कहांडळ यांचे नांवाची नोंद.

बबन सबाजी कहांडळ हे संस्थानचे साईबाबा भक्तनिवासस्थान विभागाकडे वर्ग ४ कर्मचारी या पदावर सेवेत होते. त्यांचे दि.२३/०१/२०१२ रोजी निधन झालेले असून त्यांच्या झालेल्या सेवेबाबतची माहिती खालील प्रमाणे

| | |
|---|---|
| ०१) दिवंगत कर्मचाऱ्यांचे नांव | :- बबन सबाजी कहांडळ |
| ०२) मृत्युचे वेळी हुद्या व विभाग | :- वर्ग ४ कर्मचारी, साईबाबा भक्तनिवासस्थान विभाग |
| ०३) संस्थानमधील सेवेचा कालावधी | :- दि. १६/०३/१९८२ ते दि.२२/०१/२०१२ एकूण सेवा २९ वर्षे ०९ म. |
| ०४.मृत्यु दिनांक | :- २३/०१/२०१२ |

अनुकंपा तत्वावर नेमणूक देतांना मयत कर्मचाऱ्याची पत्नीचे वय ४० वर्षाचे आत असल्यास त्यांना प्राधान्याने नोकरीवर घेतले जाते. या करीता कर्मचाऱ्याने त्याच्या हयातीत करुन दिलेले विहीत नमून्यातील नॉमिनेशन (Form 'F' See Sub - Rule (१) of Rule ६ - " Nomination made herein invalidates my previous nomination.") फॉर्ममध्ये संबंधीत व्यक्तीचे नांव असलेबाबत व त्याबाबत खातरजमा करुन अशा नेमणूका दिल्या जातात.

कै.बबन कहांडळ हे हयात असतांना त्यांची ग्रॅच्यूएटी ॲक्ट १९७२ चे नियम नं.६ (१) नुसारचे दि.२२/०७/१९९१ नॉमीनेशन पत्रात सौ.शिला बबन कहांडळ, वय वर्ष - २१ यांची (Nominees) वारसदार म्हणून नेमणूक केलेली आहे. श्रीमती शिला कहांडळ यांचे शाळा सोडल्याचे दाखल्यानुसार त्यांची जन्मतारीख २०/०१/१९७० आहे. त्यानुसार त्यांचे वय आज रोजी ४२ वर्ष आहे. सबब त्यांचे वय वर्ष ४० च्या पुढे असल्याने श्रीमती शिला कहांडळ व कु.शितल बबन कहांडळ तसेच सौ.वैशाली मनोज शिंदे (वैशाली बबन कहांडळ (अनुक्रमे अर्जदाराची आई व बहीनी) यांनी मा.तहसिलदार, राहाता यांचेकडील रु.१०० चे स्टॅम्प पेपरवर श्री नितीन बबन कहांडळ यांना नोकरीवर घेण्यास आमची संमती असलेबाबत दि.२१/०२/२०१२ चे प्रतिज्ञापत्र सादर केलेले आहे.

महाराष्ट्र शासन निर्णय क्र.अकंपा-१०००-प्र.क्र.२०/२०००, आठ मंत्रालय मुंबई ३२ दि.२८/०३/२००१ व महाराष्ट्र शासन निर्णय क्र.अकंपा-१००४-प्र.क्र.५१/२००४,आठ मंत्रालय मुंबई ३२ दि.२२/०८/२००५ सुधारीत शासन निर्णय २ (२) नुसार शासकीय सेवेत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांचे एका पात्र नातेवाईकांस अनुकंपा कारणास्तव शासकीय सेवेत घेण्याची तरतूद आहे. त्यास अनुसरुन संस्थान सेवेत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांचे एका पात्र नातेवाईकास मानवतेच्या दृष्टीकोणातून यापुर्वी अनुकंपाकारणास्तव संस्थान सेवेत घेण्यात आलेले आहे. त्यानुसार श्री नितीन बबन कहांडळ हे उपरोक्त निर्णयानुसार पात्र आहेत. तथापी -

शासन निर्णय क्र.सासंवि-२००९/४३३/(३७/०९) का.सोळा मुंबई-३२ दि.०७/०८/२००९ श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डीचे कर्मचारी आकृतीबंधास मान्यता मिळाली आहे. त्यात वर्ग ४ च्या कर्मचाऱ्यांची १२३९ स्थायी पदे मंजूर आहेत. सद्य स्थितीनुसार वर्ग ४ चे पदावर १३९९ इतके कर्मचारी भरलेले आहेत. त्यानुसार सध्या वर्ग ४ चे १६० कर्मचारी अतिरिक्त आहेत.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.१९/११/२०११ चे सभेतील निर्णय क्र.७६५ खालीलप्रमाणे झालेला आहे.

"सध्या संस्थान आस्थापनेवर वर्ग ४ ची पदे रिक्त नाहीत. त्यामुळे संस्थान सेवेत असतांना मयत झालेल्या कर्मचाऱ्यांचे नातेवाईकांना तूर्त लेबर कॉन्ट्रॅक्टरमार्फत संस्थानमध्ये कामास घेण्यात यावे व त्यांना कॉन्ट्रॅक्टरमार्फत किमान वेतनाप्रमाणे वेतन देण्यात यावे."

उपरोक्त निर्णयानुसार यापूर्वीच्या अर्जदारांना लेबर कॉन्ट्रॅक्टरमार्फत प्रसादालय विभागाकडे कंत्राटी पध्दतीने कामावर घेण्यात आलेले आहे.

शासन निर्णय क्र.अकंपा-१०९३/प्र.क्र.९०/९३/आठ दि.२६/१०/१९९४ अन्वये अनुकंपा कारणास्तव शासकीय सेवेत नोकरी देण्याबाबतची सुधारित नियमावलीमध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे.

" एखाद्या कुटुंबात मृत कर्मचाऱ्याचा नातेवाईक पूर्वीच सेवेत असेल, तथापी तो त्याच्या कुटूंबातील अन्य सदस्यांना आधार देत नसेल तर अशा प्रकरणात त्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती हलाखीची आहे किंवा कसे हे ठरविताना नियुक्ती अधिकाऱ्याने अत्याधिक दक्षता घ्यावी, जेणेकरुन सेवेत असलेला सदस्य कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत नाही या नावाखाली अनुकंपा तत्वावरील नियुक्तीचा दुरुपयोग केला जाणार नाही. "

उपरोक्त शासन निर्णयातील तरतूद राज्यशासन सेवेतील अनुकंपा नियुक्तीची योजना प्रचलित कार्यपद्धती व योजनेच्या तरतुदीत सुधारणा करण्याबाबतच्या शासन निर्णय क्र.अकंपा-१००४/ प्र.क्र.५१/ २००४/आठ, मंत्रालय, मुंबई-३२ दि.२२/०८/२००५ मध्ये कायम केलेल्या आहेत.

उपरोक्त शासन निर्णय व दिवंगत कहांडळ यांचा मुलगा नामे श्री नितीन बबन कहांडळ यांचा लेखी अर्ज विचारात घेता दिवंगत बबन सबाजी कहांडळ यांचे जागेवर त्यांचा मुलगा नामे श्री नितीन कहांडळ यास लेबर कॉन्ट्रॅक्टरमार्फत कामास घेणेबाबतच्या प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६३१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शासन निर्णय व दिवंगत कहांडळ यांचा मुलगा नामे श्री नितीन बबन कहांडळ यांचा लेखी अर्ज विचारात घेता दिवंगत बबन सबाजी कहांडळ यांचे जागेवर त्यांचा मुलगा नामे श्री नितीन कहांडळ यास लेबर कॉन्ट्रॅक्टरमार्फत कंत्राटी पध्दतीने कामावर घेण्यात यावे असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

---

**विषय नं.६०** **मयत अनुकंपा तत्वावर कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने संस्थानमध्ये नोकरी मिळणेबाबत श्री.दिपक दत्तात्रय सोमवंशी यांचा अर्ज.**

**प्रस्ताव-** श्री दिपक दत्तात्रय सोमवंशी, रा.शिर्डी यांनी त्यांचे वडील कै.दत्तु रामनाथ सोमवंशी यांचे संस्थान सेवेत असतांना निधन झालेने अनुकंपा तत्वावर कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने नोकरी मिळणेबाबत दि.०८/०५/२०१२ रोजी अर्ज सादर केलेला आहे. अर्जाचा सुधारीत विहीत नमुना तयार करण्यात आलेला आहे त्यास अनुसरुन अर्जदाराने अर्ज सादर केला आहे. सदर अर्जासोबत त्यांनी खालीलप्रमाणे कागदपत्रे सादर केलेली आहेत.

१) श्री दिपक दत्तात्रय सोमवंशी यांचा शाळा सोडल्याचा दाखला सदर दाखल्यानुसार जन्मतारीख २७/०१/१९९४ अशी असल्याने त्यांचे आजमितीस वय १८ वर्ष ०४ म.आहे.

२) श्री दिपक सोमवंशी यांचे इ.०८ वी उतीर्णचे शाळा सोडल्याचा दाखला सादर केलेला आहे.

३) श्रीमती लता दत्तु सोमवंशी व कु.कोमल दत्तु सोमवंशी, राहूल दत्तु सोमवंशी (अनुक्रमे अर्जदाराची आई व लहान बहीन व भाऊ (अज्ञान) यांनी मा.तहसिलदार, राहाता यांचेकडील श्री दिपक दत्तात्रय सोमवंशी यांना नोकरीवर घेण्यास संमती असलेबाबत दि.१४/०३/२०१२ चे प्रतिज्ञापत्र

४) दिवंगत सोमवंशी यांच्या शिधापत्रिकेवरील श्री जालींदर सोमवंशी यांचे नांवाची नोंद.( दिपक दत्तात्रय सोमवंशी व जालींदर दत्तु सोमवंशी या दोन्ही नावाची व्यक्ती एकच असलेबाबत मा.तहसिलदार राहाता यांचेकडील दि.१४/०५/२०१२ चे प्रतिज्ञापत्र सादर केलेले आहे.)

दत्तु रामनाथ सोमवंशी हे संस्थानचे प्रसादालय विभागाकडे वर्ग ४ कर्मचारी या पदावर सेवेत होते. त्यांचे दि.१०/०२/२०१२ रोजी निधन झालेले असून त्यांच्या झालेल्या सेवेबाबतची माहिती खालील प्रमाणे

०१) दिवंगत कर्मचाऱ्यांचे नांव :- दत्तु रामनाथ सोमवंशी
०२) मृत्युचे वेळी हुद्या व विभाग :- वर्ग ४ कर्मचारी, प्रसादालय विभाग
०३) संस्थानमधील सेवेचा कालावधी :- दि. ०४/१२/२००६ ते दि.०९/०२/२०१२ एकूण सेवा ०५ वर्षे ०१ म.
०४) मृत्यु दिनांक :- १०/०२/२०१२

अनुकंपा तत्वावर नेमणूक देतांना मयत कर्मचाऱ्याची पत्नीचे वय ४० वर्षाचे आत असल्यास त्यांना प्राधान्याने नोकरीवर घेतले जाते. या करीता कर्मचाऱ्याने त्याच्या हयातीत करुन दिलेले विहीत नमून्यातील नॉमिनेशन (Form 'F' See Sub - Rule (१) of Rule ६ - " Nomination made herein invalidates my previous nomination.") फॉर्ममध्ये संबंधीत व्यक्तीचे नांव असलेबाबत व त्याबाबत खातरजमा करुन अशा नेमणूका दिल्या जातात.

कै.दत्तु सोमवंशी हे हयात असतांना त्यांची ग्रॅच्यूएटी ॲक्ट १९७२ चे नियम नं.६ (१) नुसारचे दि.०५/१२/२००७ नॉमीनेशन पत्रात सौ.हिराबाई रामनाथ सोमवंशी (आई) वय वर्ष - ५०, श्री रामनाथ त्रिंबक सोमवंशी (वडील) वय वर्षे ६० तसेच पत्नी नामे सौ.लता दत्तु सोमवंशी वय वर्ष २५ यांची (Nominees) वारसदार म्हणून नेमणूक केलेली आहे. मयत सोमवंशी यांची पत्नी नामे श्रीमती लता दत्तु सोमवशी यांचे शाळा सोडल्याचे दाखल्यानुसार त्यांची जन्मतारीख २०/१०/१९७६ आहे. त्यानुसार त्यांचे वय आज रोजी ३५ वर्ष ७ महिने असे आहे. सबब त्यांचे वय वर्ष ४० च्या आत आहे. तथापी त्यांचा मुलगा दिपक दत्तात्रय सोमवंशी यांनी नोकरी मिळणेबाबत अर्ज केला असून श्रीमती लता दत्तु सोमवंशी व कु.कोमल दत्तु सोमवंशी, राहूल दत्तु सोमवंशी (अनुक्रमे अर्जदाराची आई व लहान बहीन, भाऊ(अज्ञान) यांनी मा.तहसिलदार, राहाता यांचेकडील रु.१०० चे स्टॅम्प पेपरवर श्री दिपक दत्तात्रय सोमवंशी यांना नोकरीवर घेण्यास आमची संमती असलेबाबत दि.१४/०३/२०१२ चे प्रतिज्ञापत्र सादर केलेले आहे.

महाराष्ट्र शासन निर्णय क्र.अकंपा-१०००-प्र.क्र.२०/२०००,आठ मंत्रालय मुंबई ३२ दि.२८/०३/२००१ व महाराष्ट्र शासन निर्णय क्र.अकंपा-१००४-प्र.क्र.५१/२००४,आठ मंत्रालय मुंबई ३२ दि.२२/०८/२००५ सुधारीत शासन निर्णय २ (२) नुसार शासकीय सेवेत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांचे एका पात्र नातेवाईकांस अनुकंपा कारणास्तव शासकीय सेवेत घेण्याची तरतूद आहे. त्यास

अनुसरुन संस्थान सेवेत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांचे एका पात्र नातेवाईकास मानवतेच्या दृष्टीकोणातून यापुर्वी अनुकंपाकारणास्तव संस्थान सेवेत घेण्यात आलेले आहे. त्यानुसार श्री दिपक दत्तात्रय सोमवंशी हे उपरोक्त निर्णयानुसार पात्र आहेत. तथापी -

शासन निर्णय क्र.सासंवि-२००९/४३३/(३७/०९) का.सोळा मुंबई-३२ दि.०७/०८/२००९ श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डीचे कर्मचारी आकृतीबंधास मान्यता मिळाली आहे. त्यात वर्ग ४ च्या कर्मचाऱ्यांची १२३९ स्थायी पदे मंजूर आहेत. सद्य स्थितीनुसार वर्ग ४ चे पदावर १३९९ इतके कर्मचारी भरलेले आहेत. त्यानुसार सध्या वर्ग ४ चे १६० कर्मचारी अतिरिक्त आहेत.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.१९/११/२०११ चे सभेतील निर्णय क्र.७६५ खालीलप्रमाणे झालेला आहे.

" सध्या संस्थान आस्थापनेवर वर्ग ४ ची पदे रिक्त नाहीत. त्यामुळे संस्थान सेवेत असतांना मयत झालेल्या कर्मचाऱ्यांचे नातेवाईकांना तूर्त लेबर कॉन्ट्रॅक्टरमार्फत संस्थानमध्ये कामास घेण्यात यावे व त्यांना कॉन्ट्रॅक्टरमार्फत किमान वेतनाप्रमाणे वेतन देण्यात यावे. "

उपरोक्त निर्णयानुसार यापूर्वीच्या अर्जदारांना लेबर कॉन्ट्रॅक्टरमार्फत प्रसादालय विभागाकडे कंत्राटी पध्दतीने कामावर घेण्यात आलेले आहे.

शासन निर्णय क्र.अकंपा-१०९३/प्र.क्र.९०/९३/आठ दि.२६/१०/१९९४ अन्वये अनुकंपा कारणास्तव शासकीय सेवेत नोकरी देण्याबाबतची सुधारित नियमावलीमध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे.

" एखाद्या कुटुंबात मृत कर्मचाऱ्याचा नातेवाईक पूर्वीच सेवेत असेल, तथापी तो त्याच्या कुटूंबातील अन्य सदस्यांना आधार देत नसेल तर अशा प्रकरणात त्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती हलाखीची आहे किंवा कसे हे ठरविताना नियुक्ती अधिकाऱ्याने अत्याधिक दक्षता घ्यावी, जेणेकरुन सेवेत असलेला सदस्य कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत नाही या नावाखाली अनुकंपा तत्वावरील नियुक्तीचा दुरुपयोग केला जाणार नाही. "

उपरोक्त शासन निर्णयातील तरतूद राज्यशासन सेवेतील अनुकंपा नियुक्तीची योजना प्रचलित कार्यपद्धती व योजनेच्या तरतुदीत सुधारणा करण्याबाबतच्या शासन निर्णय क्र.अकंपा-१००४/ प्र.क्र.५१/ २००४/ आठ, मंत्रालय, मुंबई-३२ दि.२२/०८/२००५ मध्ये कायम केलेल्या आहेत.

उपरोक्त शासन निर्णय व दिवंगत सोमवंशी यांचा मुलगा नामे श्री दिपक दत्तात्रय सोमवंशी यांचा लेखी अर्ज विचारात घेता दिवंगत सोमवंशी यांचे जागेवर त्यांचा मुलगा नामे श्री दिपक दत्तात्रय सोमवंशी यास लेबर कॉन्ट्रॅक्टरमार्फत कामास घेणेबाबतच्या प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६३२** **शासन निर्णय व दिवंगत सोमवंशी यांचा मुलगा नामे श्री दिपक दत्तात्रय सोमवंशी यांचा लेखी अर्ज विचारात घेता दिवंगत सोमवंशी यांचे जागेवर त्यांचा मुलगा नामे श्री दिपक दत्तात्रय सोमवंशी यास लेबर कॉन्ट्रॅक्टरमार्फत कंत्राटी पध्दतीने कामावर घेण्यात यावे असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

---

**विषय नं.६१** **रिक्त असणारी प्रशासकीय अधिकारी, अधीक्षक, वगैरे पदे पदोन्नतीने भरणेबाबत.**

**प्रस्ताव-** शासनाकडून सेवानियमांस मिळणाऱ्या मान्यतेच्या अधीन राहून आकृतीबंधानुसार स्थायी मंजूर विविध पदांवर पात्र कर्मचाऱ्यांना पदोन्नती देणेसाठी तत्वतः मान्यता मिळणेबाबतचा विषय मा.व्यवस्थापन समिती दि.१९/११/२०११ रोजीच्या सभेत सादर करण्यात आलेला होता. सदरचे विषयावर खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेला आहे.

शासनाकडून सेवाप्रवेश नियमास मिळणाऱ्या मान्यतेच्या अधीन राहून मंजूर कर्मचारी आकृतीबंधानुसार विविध हुद्देवरील रिक्त पदांवर पात्र कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यास तत्वता मान्यता देण्यात आली. विविध रिक्त पदांवर कर्मचाऱ्यांना पदोन्नती देतांना, पदोन्नती द्यावयाचे पद व त्या पदावर पदोन्नती देण्यासाठी पात्र असलेला संवर्ग, पदोन्नती पदाची शैक्षणिक पात्रता पदोन्नती द्यावयाच्या कर्मचाऱ्यांचे गोपनीय अहवाल व पदोन्नतीच्या पदावर काम करण्याची त्यांची कुवत इत्यादी बाबी विचारात घेण्यात याव्यात.

श्री साईबाबा संस्थान हे जागतीक किर्तीचे देवस्थान असून देशविदेशातून साईभक्त शिर्डी येथे श्री साईंचे दर्शनासाठी येतात. शिर्डी येथे येणाऱ्या भक्तांना दैनंदिन आवश्यक त्या सर्व पायाभूत सेवा सुविधा योग्य पध्दतीने देणे हा संस्थान प्रशासनाचा उद्देश आहे. त्या दृष्टीने सध्या विविध योजना कार्यान्वीत करण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून संस्थानमध्ये जागतीक दर्जाचा आय.टी.प्रोजेक्ट राबविण्यात येत असून, संस्थानचे सर्व विभागांचे संगणीकरण करण्यात येत आहे या आधीची टाईपरायटरची जागा आता संगणकाने घेतली आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांना संगणकाचे ज्ञान असणे आवश्यक झाले असुन प्राप्त परिस्थितीत ही काळाची गरज आहे. त्यामुळे पदोन्नती द्यावयाचे पदावर, पदोन्नतीसाठी पात्र असलेल्या संवर्गातील कर्मचाऱ्याची संबंधित पदावर काम करण्याची कुवत व गुणवत्ता तपासण्यासाठी प्रात्यक्षिक संगणकीय चाचणी व लेखी परिक्षा घेण्यात यावी व परिक्षामध्ये मिळणाऱ्या गुणानुसार त्यांची शैक्षणिक पात्रता विचारात घेऊन पदोन्नती देण्यात यावी. या परिक्षेत पदोन्नतीस अपात्र ठरणाऱ्या अथवा गुणवत्ता प्राप्त न होणाऱ्या कर्मचाऱ्यांना संधी देण्याचे दृष्टीने त्यांना सहा महिन्याची मुदत देऊन त्यांची पुन्हा समिती समोर फेर परिक्षा घेण्यात यावी.

या परिक्षेचे आयोजन करण्यासाठी सल्लागार म्हणून श्री.प्रशांत खंबसवाडकर, नाशिक यांची नियुक्ती करण्यात यावी. तसेच पदनिहाय रिक्त पदांवर पदोन्नती देण्यासाठी मा.ना.राधाकृष्ण एकनाथराव

विखेपाटील, मा.श्री.सुरेश गोरक्षनाथ वाबळे, मा.श्री.शैलेश श्रीहरी कुटे, मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर व मा.श्री.अशोक भिमाशंकर खांबेकर या पाच सदस्यांची समिती गठीत करण्यात येत असून या समितीसमोर परिक्षेची कार्यवाही करण्यात येऊन कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यात यावी.

कर्मचाऱ्यांना वरिष्ठ पदांवर पदोन्नती द्यावयाची कार्यवाही ही विभागांतर्गत परिक्षा घेऊन करावयाची असल्याने जात-प्रवर्ग आरक्षणाबाबत विचार करण्यात येऊ नये अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

वरील निर्णयानुसार वर्ग-४ पदावरील कर्मचाऱ्यापैकी ज्या कर्मचाऱ्यांनी लगतच्या पदाची शैक्षणिक पात्रता (उदा.कुपन विक्रेता, लिपीक-टंकलेखक, तारतंत्री व इतर) पूर्ण केलेली आहे. अशा सर्व कर्मचाऱ्यांची दि.२६/०२/२०१२ रोजी उपरोक्त समितीचे समोर लेखी व प्रात्यक्षिक परिक्षा घेण्यात येऊन संबंधीत पदावर पदस्थापना/पदोन्नती देणेबाबतची कार्यवाही करण्यात आलेली आहे. प्रस्तावीत भरती नियमातील तरतूद खालीलप्रमाणे आहे.

**Appointment to the posts in the Trust Service shall be made either :-**

(a) for all appointments by promotion and nomination roster will be applicable as per Government of Maharashtra.

(b) by promotion of a suitable Sansthan employee on the basis of seniority subject to fitness from amongst the persons holding the posts, possessing the qualifications and experience specified in the Schedule appended with theses regulations, or

(c) by nomination from amongst the candidates who posses the requisite qualifications as specified in the Schedule appended with these regulations.

Procedure for nomination Vacant Post, Roster, Advertisement, Test/Interview selection list, Appointment etc. within ६ months. The selection list will be effective for २ days.

The posts which are to filled by nomination and promotion, the ratio shall be ५०:५०

(d) by deputation of a suitable person form amongst the person holding equivalent post in the Government.

याशिवाय जी पदे पदोन्नतीने भरणेबाबत प्रस्तावीत सेवाप्रवेश नियमात तरतूद करण्यात आलेली आहे अशी रिक्त पदे पदोन्नतीने भरावयाच्या पदाबाबत सेवानियमास शासनाकडून अद्याप मंजूरी न मिळालेने व मंजूर नियमातील प्रमोशन/सरळ सेवेचे प्रमाण (Ratio) निश्चित न झालेने आरक्षणाबाबत संस्थानमध्ये सुस्पष्ठ नियमावली झालेली नाही. परंतु संस्थानमध्ये कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांतूनच पदोन्नती होत असल्याने नव्याने बाहेरुन उमेदवार येणार नसल्याने संस्थानच्या प्रचलीत पध्दतीने पदोन्नतीसाठी रिक्त पदे भरणेकामी खालीलप्रमाणे निकष / कार्यपध्दती अवलंबणे बाबत निर्णय होणेस विनंती.

१) प्रशासकीय अधिकाऱ्यांची पदे यापुर्वी मुलाखतीने संस्थानमधील अधिक्षक पदावरील कर्मचाऱ्यांमधून भरलेली असल्याने सदर पदाची विहीत शैक्षणिक पात्रता पूर्ण असणाऱ्या कर्मचाऱ्यांतून मुलाखतीने भरणे. अशी पदे भरतांना रिक्त पदांची संख्या, लगतचे पाच वर्षाचे गोपनीय अभिलेख्यांची प्रतवारी, आरक्षण विचारात घेणे, मुलाखतीची तारीख निश्चित करणे इत्यादी.

सोबतच्या यादीतील उर्वरीत रिक्त पदे खालील बाबी विचारात घेऊन भरणे.

१) रिक्त पदांची संख्या
२) विहीत शैक्षणिक पात्रता
३) परिक्षेचा निकाल
४) लगतच्या पाच वर्षाचे गोपनीय अभिलेख
५) आरक्षण

पदोन्नतीने / पदस्थापनेने रिक्त पदे संस्थान कर्मचाऱ्यांमधून भरणेकामी उपरोक्तप्रमाणे धोरणात्मक निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६३३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचा दिवसेंदिवस वाढता व्याप व नवीन संगणकीय माहिती तंत्रज्ञानाचा वापर इत्यादी विचारात घेता सध्या रिक्त असणाऱ्या प्रशासकीय अधिकारी या पदांच्या ५०% पदांवर शासनाकडून महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांचेमार्फत निवड करण्यात आलेल्या तहसिलदार संवर्गातील व अन्य संवर्गातील अधिकाऱ्यांना प्रतिनियुक्तीवर घेण्यात यावे व उर्वरित ५०% पदे संस्थान सेवेतील कर्मचाऱ्यांमधून पदोन्नतीने घेणेत यावे आणि एक प्रशासकीय अधिकारी पद तांत्रिक दृष्टया संस्थानचे कामाचे स्वरुप पहाता संस्थानने ठरविलेल्या आवश्यक शैक्षणिक पात्रता व कामाचा अनुभव असलेल्या संवर्गातील घेणेबाबत प्रस्ताव सादर करावा.**

**तसेच अधिक्षक व इतर पदांवर पदोन्नती देणेबाबत यापूर्वी झालेल्या व्यवस्थापन समितीचे दिनांक १९.११.२०११ चे सभेतील निर्णय क्र. ७६५(०३) अन्वये करण्यात यावी असे ठरले.**

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

---

**विषय नं. ६२** **डॉ.नानासाहेब सारंगधर म्हस्के, उपवैद्यकीय संचालक यांचा मुदतवाढ, मानधनवाढ तसेच वैद्यकीय संचालक पदावर नेमणूक होणेबाबतचा अर्ज**

**प्रस्ताव-** डॉ. एन एस म्हस्के, उपवैद्यकीय संचालक, रुग्णालये यांनी अर्ज केला असुन सदर अर्जामध्ये नमुद केले आहे की, "I undersigned Dr. N. S. Mhaske working as Dy. Medical Director from 6th Aug 2007. Since last 2 yrs. I am holding additional charge of Medical Director.

Kindly consider my application for the above post. I expect remuneration Rs. 75,000/- pm."

डॉ एन एस म्हस्के यांची दि.०६/०८/२००७ पासून संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पीटलकडे मानधनावर उपवैद्यकिय संचालक या पदावर नेमणूक करण्यात आलेली असून त्यांची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| **संपुर्ण नाव** | डॉ. नानासाहेब सारंगधर म्हस्के |
| **शैक्षणिक पात्रता** | एम बी बी एस, डी सी एच |
| **जन्म तारीख व वय** | दि. ०३/०६/१९४३, वय ३ ६९ वर्ष |
| **पुर्वीचा अनुभव** | ०१)प्रशासकिय सचिव, पीएमटी,लोणी -२५वर्षे<br>०२) वैद्यकिय संचालक - पदमश्री विखे पाटील मेडीकल कॉलेज व हॉस्पीटल विळदघाट.अ.नगर -०३ वर्षे |
| **मानधनावर हजर तारीख व झालेली सेवा** | दि. ०६/०८/२००७, ०४ वर्षे ११ महिने |
| **सध्याचे मानधन** | रु. ६५,०००/- |
| **वैद्यकिय संचालक या पदाचा अतिरिक्त कार्यभार तारीख** | दि. ०५/०४/२०१० पासून |

डॉ. श्री नानासाहेब म्हस्के यांची जा.नं.एसएसएस/वशी०१/१२२२३/२००७ दि. ०४/०८/०७ अन्वये संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटलकडे उपवैद्यकिय संचालक या पदावर प्रथम एक वर्ष कालावधीकरीता प्रतिमहा रुपये ३०,०००/- एकत्रित मानधनावर नेमणूक करण्यात आली होती. त्यानुसार ते दिनांक ०६/०८/२००७ रोजी कामावर हजर झाले होते. तदनंतर डॉ म्हस्के यांना खालीलप्रमाणे वेळोवेळी मुदतवाढ देण्यात येऊन मानधनात वाढ करण्यात आलेली आहे.

| अ.नं. | वर्ष | आदेश क्रमांक व दिनांक | मुदतवाढ कालावधी | देण्यात आलेले मानधन |
|---|---|---|---|---|
| ०१ | सन २००८ | जा.नं.एसएसएस/वशी०१/३०४२/२००८ दि. ११/१०/०८ | एक वर्ष | रुपये ४५,०००/- |
| ०२ | सन २००९ | जा.नं.एसएसएस/वशी०१/२७२०/२००९ दि. १०/०८/०९ | एक वर्ष | रुपये ४५,०००/- |
| ०३ | सन २०१० | जा.नं.एसएसएस/एचआर/१४६/२०१० दि. १४/०९/२०१० | एक वर्ष | रुपये ५५,०००/- |
| ०४ | सन २०११ | जा.नं.एसएसएस/एचआर/५००/२०११ दि.२३/०८/२०११ | एक वर्ष | रुपये ६५,०००/- |

जा.नं.एसएसएस/वशी०१/१२३२/२०१० दि. १२/०४/२०१० अन्वये हॉस्पिटलचे तत्कालीन वैद्यकिय संचालक डॉ. श्री. सी. एस. बोबडे यांना सेवामुक्त करण्यात आल्याने, डॉ. म्हस्के यांचेकडे दिनांक ०५/०४/२०१० पासून वैद्यकिय संचालक पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आलेला आहे.

डॉ. एन.एस. म्हस्के, उपवैद्यकिय संचालक (सध्या प्रभारी वैद्यकिय संचालक) यांना देण्यात आलेली मुदतवाढ दिनांक ०५/०८/२०१२ रोजी संपुष्टात येत असल्याने, त्यांनी दि. २१/०६/२०१२ चे अर्जान्वये सेवा पुढे चालु ठेवून वैद्यकीय संचालक हे पद मिळणेस व रुपये ७५,०००/- इतके मानधन मिळणेकामी विनंती केली आहे.

श्री साईबाबा हॉस्पिटलचे आकृतीबंधामध्ये वैद्यकीय संचालक हे एक पद मंजूर असून या पदाची शैक्षणिक पात्रता, वेतनबॅन्ड, अनुभव व वयोमर्यादा पुढीलप्रमाणे प्रस्तावित केली आहे.

| पदाचे नाव | मंजुर पदसंख्या | शैक्षणिक अर्हता | वेतनबॅन्ड |
|---|---|---|---|
| वैद्यकीय संचालक | ०१ | १) वयोमर्यादा ५० वर्ष<br>२) एमबीबीएस/एमडी/एम एस<br>३) एम एच ए/डी एच ए/एम फील इन हॉस्पिटल मॅनेजमेंट<br>४) संबंधित कामकाजाचा / पदाचा किमान १० वर्ष अनुभव | १५६००-३९१००<br>ग्रेड पे ७६०० |

तरी डॉ. एन.एस.म्हस्के, उपवैद्यकिय संचालक, श्री साईबाबा हॉस्पिटल यांचे दि. २१/०६/२०१२ रोजीचे अर्जानुसार त्यांना मुदतवाढ मिळणे, मानधनात वाढ तसेच वैद्यकीय संचालक पद मिळणेबाबतचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६३४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, डॉ.नानासाहेब सारंगधर म्हस्के, उपवैद्यकीय संचालक यांचा मुदतवाढ, मानधनवाढ तसेच वैद्यकीय संचालक पदावर नेमणूक होणेबाबतची विनंती अमान्य करण्यात आली.**

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग/ वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.६३** **कंत्राटी पद्धतीचे सेवेची मुदतवाढ मिळणेबाबत श्री एकनाथ नानासाहेब वाघ, विशेष कार्य अधिकारी यांचा दि.१०.०६.२०१२ रोजीचा अर्ज**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.१२/०६/२०११ रोजीच्या सभेमध्ये खालील प्रमाणे निर्णय झालेला आहे.

**निर्णय :-** "श्री. इ.एन.वाघ व श्री. पी.बी. बोरावके माजी प्रशासकिय अधिकारी यांना रु.२१,०००/- एकत्रित मानधनावर एक वर्ष कालावधीसाठी विशेष कार्य अधिकारी (Oficer on Special Duty) या पदावर नेमणूक देण्यात यावी.

याच वेळी संस्थानचा दिवसेंदिवस वाढता व्याप व नवीन संगणकीय माहिती तंत्रज्ञानाचा वापर इत्यादी विचारात घेता रिक्त होणा-या प्रशासकिय अधिकारी पदावर शासनाकडून महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांचे मार्फत निवड करण्यात आलेल्या तहसिलदार पदावरील कर्मचा-यांना प्रतिनियुक्तीवर घेण्यात यावे या कामी प्रस्ताव शासनास सादर करावा. " असा निर्णय झालेला आहे.

सदर निर्णयानुसार श्री. एकनाथ नानासाहेब वाघ माजी. प्रशासकिय अधिकारी यांचे विनंती नुसार व मा.व्यवस्थापन समितीचे दि.१२/०६/२०१२ रोंजीचे सभेतील निर्णयानुसार जा.नं.एसएसएस/वशी-०१/१३८६/२०११ अन्वये श्री. इ.एन.वाघ यांची कंत्राटी पध्दतीने विशेष कार्य अधिकारी (Officer on Special Duty) या पदावर एक वर्ष कालावधीसाठी दरमहा रु.२१,०००/- एकत्रित मानधनावर नेमणूक करण्यात आलेली होती. त्यानुसार ते दि.१८/०६/२०११ रोजी कामावर हजर झाले होते. त्यांची एक वर्षाची मुदत दि.१७/०६/२०१२ अखेर संपुष्ठात आलेली आहे.

श्री. इ.एन.वाघ विशेष कार्य अधिकारी यांनी दि.१०/०६/२०१२ रोजीच्या अर्जाने " मी संस्थान मध्ये एकूण १७ वर्षे निष्कलंक व प्रामाणिक सेवा दिलेली आहे. यापुढेही मला सेवेची आवश्यकता असून सेवा देण्यासाठी मी शारीरिक व मानसिक दृष्टया सक्षम आहे मला सेवेची मुदतवाढ मिळावी. अशी विनंती केली आहे.

श्री.इ.एन. वाघ, विशेष कार्य अधिकारी (माजी प्रशासकिय अधिकारी) यांचे मुदतवाढ मिळणेबाबतच्या अर्जावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६३५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे नव्यानेच सुरु होत असलेल्या साईआश्रम भाग-०१ व साईआश्रम भाग -०२ या निवासस्थानाचे कामासाठी अनुभवी व्यक्तीची आवश्यकता असल्याने श्री. इ.एन. वाघ, माजी विशेष कार्य अधिकारी यांना पूर्वीचेच अटी शर्तीवर सहा महिने कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात यावी असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

---

**विषय नं.६४** **कंत्राटी पद्धतीचे सेवेची मुदतवाढ मिळणेबाबत श्री. प्रभाकर भिकोबा बोरावके, विशेष कार्य अधिकारी यांचा दि.१०.०६.२०१२ रोजीचा अर्ज**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.१२/०६/२०११ रोजीच्या सभेमध्ये खालील प्रमाणे निर्णय झालेला आहे.

**निर्णय :-** "श्री. इ.एन.वाघ व श्री. पी.बी. बोरावके माजी प्रशासकिय अधिकारी यांना रु.२१,०००/- एकत्रित मानधनावर एक वर्ष कालावधीसाठी विशेष कार्य अधिकारी (Oficer on Special Duty) या पदावर नेमणूक देण्यात यावी.

याच वेळी संस्थानचा दिवसेंदिवस वाढता व्याप व नवीन संगणकीय माहिती तंत्रज्ञानाचा वापर इत्यादी विचारात घेता रिक्त होणा-या प्रशासकिय अधिकारी पदावर शासनाकडून महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांचे मार्फत निवड करण्यात आलेल्या तहसिलदार पदावरील कर्मचा-यांना प्रतिनियुक्तीवर घेण्यात यावे या कामी प्रस्ताव शासनास सादर करावा. " असा निर्णय झालेला आहे.

सदर निर्णयानुसार श्री प्रभाकर भिकोबा बोरावके माजी. प्रशासकिय अधिकारी यांचे विनंती नुसार व मा.व्यवस्थापन समितीचे दि.१२/०६/२०१२ रोंजीचे सभेतील निर्णयानुसार जा.नं.एसएसएस/वशी-०१/१३८७/२०११ दि.१६/०६/२०११ अन्वये अन्वये श्री. पी.बी. बोरावके यांची कंत्राटी पध्दतीने विशेष कार्य अधिकारी (Officer on Special Duty) या पदावर एक वर्ष कालावधीसाठी दरमहा रु.२१,०००/- एकत्रित मानधनावर नेमणूक करण्यात आलेली होती. त्यानुसार ते दि.१८/०६/२०११ रोजी कामावर हजर झाले होते. त्यांची एक वर्षाची मुदत दि.१७/०६/२०१२ अखेर संपुष्ठात आलेली आहे.

श्री. पी.बी. बोरावके विशेष कार्य अधिकारी यांनी दि.११/०६/२०१२ रोजीच्या अर्जाने "मी कंत्राटी पध्दतीने विशेष कार्य अधिकारी म्हणून सेवेत आहे. माझा मुलगा मेकॅनिक इंजिनिअरिंगचे शिक्षण घेत आहे. त्याचे शिक्षण पूर्ण होण्यास अजुन ०२ वर्षाचा कालावधी आहे. त्याचे शिक्षण पूर्ण करण्यासाठी मला नोकरीची गरज आहे. माझा इतर कुठलाही व्यवसाय नसल्याने मला संस्थान सेवेची आवश्यकता आहे. तरी मला एक वर्ष मुदतवाढ मिळावी. "अशी विनंती केली आहे.

श्री. पी.बी. बोरावके विशेष कार्य अधिकारी (माजी प्रशासकिय अधिकारी ) यांचे मुदतवाढ मिळणेबाबतच्या अर्जावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६३६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे नव्यानेच सुरु होत असलेल्या साईआश्रम भाग-०१ व साईआश्रम भाग -०२ या निवासस्थानाचे कामासाठी अनुभवी व्यक्तीची आवश्यकता असल्याने श्री.**

**पी.बी. बोरावके माजी विशेष कार्य अधिकारी यांना पूर्वीचेच अटी शर्तीवर सहा महिने कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात यावी असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

---

**विषय नं.६५** **श्री. अण्णासाहेब कारभारी तुरकणे,लिपिक-टंकलेखक,सभा कामकाज विभाग,यांचा सेवा निवृत्तीनंतर कंत्राटी पद्धतीने सेवेत घेणेबाबतचे अर्जाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री आण्णासाहेब कारभारी तुरकणे, लिपीक टंकलेखक, सभा कामकाज विभाग यांनी दि.०७/०६/२०१२ चे अर्जाने खालीलप्रमाणे विनंती केलेली आहे.

"मी संस्थानचे विविध विभागात तसेच सन १९९५ पासून म्हणजे १७ वर्षापासून सभा कामकाज विभागात लिपीक टंकलेखक या पदावर अतिशय इमाने इतबारे सेवा केलेली आहे. संस्थानचे सेवा नियमाप्रमाणे मी दि.३०/०६/२०१२ रोजी सेवानिवृत्त होत आहे. माझी शरीर प्रकृती व स्वास्थ्य चांगले असून माझी यापूढे सेवा करण्याची इच्छा आहे तसेच मला कामाची गरज आहे. तरी मला सेवानिवृत्तीनंतर संस्थानमध्ये कंत्राटी पध्दतीने सेवा करण्याची संधी द्यावी. "

सदर अर्जावर प्र.सभा कामकाज विभाग प्रमुख यांनी " श्री अ.का.तुरकणे हे गेली १७ वर्षापासून सभा कामकाज विभागाकडे काम करत असून त्यांना सभा कामकाज विभागातील कामाची माहिती असल्याने त्यांना सेवानिवृत्तीनंतर संस्थानमध्ये कंत्राटी पध्दतीने मुदतवाढ देण्यास विनंती " असा अभिप्राय दिलेला आहे.

श्री तुरकणे हे दि.३०/०६/२०१२ अखेर त्यांचे विहित वयोमान पूर्ण होत असल्याने त्यांना जा.नं.एसएसएस वशी ०१/१६/२०१२ दि.०२/०४/२०१२ अन्वये सेवानिवृत्तीचा आदेश पारीत करण्यात आलेला आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८/०८/२०११ चे निर्णय क्र.६६१ मध्ये " येथून पुढे सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी सेवानिवृत्तीनंतर सेवेत मुदतवाढ मागितल्यास नाकारणेत येऊन सदर प्रस्ताव व्यवस्थापन समितीपुढे सादर करणेत येऊ नये असा झालेला आहे. "

श्री तुरकणे, लिपीक टंकलेखक, सभा कामकाज विभाग यांचा मुदतवाढीबाबतच्या प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६३७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू विषय स्थगित ठेवण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- अधिक्षक, आस्थापना)

---

**विषय नं.६६** **श्री गोविंद संभाजी खांडरे,प्र.अधिक्षक, अभिलेखा कक्ष यांचा नोकरीत मुदतवाढ मिळणेबाबतच्या अर्जाबाबत**

**प्रस्ताव-** श्री गोविंद संभाजी खांडरे, प्र.अधीक्षक, अभिलेख कक्ष यांनी दि.२८/०६/२०१२ चे अर्जाने खालीलप्रमाणे विनंती केलेली आहे.

" माझी संस्थानमधील सेवा ३१/०८/२०१२ रोजी संपुष्ठात येत आहे. मी सन १९८० पासून संस्थानमध्ये सेवा करीत आलो आहे. माझी प्रकृती सुदृढ आहे तसेच मी सध्या अभिलेख कक्ष विभागात प्र.अधीक्षक म्हणून काम पहात आहे. अभिलेख कक्षाकडे निरुपयोगी डेडस्टॉकचे भंगार साहित्य विल्हेवाट करणेबाबतचे महत्वाचे काम आहे. सध्या विभागामध्ये शासन मान्यतेची जवळजवळ १६ प्रकरणे पेंडीग आहेत आणखी काही डेडस्टॉक साहित्य जमा करुन त्या डेडस्टॉक साहित्याचा जाहीर लिलाव करण्याची माझी महत्वाची जबाबदारी आहे. तरी मला नोकरीत मुदतवाढ देऊन संस्थानमध्ये सेवा करण्याची संधी द्यावी. "

श्री खांडरे हे दि.३१/०८/२०१२ अखेर त्यांचे विहित वयोमान पूर्ण होत असल्याने त्यांना जा.नं.एसएसएस वशी ०१/१०१९/२०१२ दि.०८/०६/२०१२ अन्वये सेवानिवृत्तीचा आदेश पारीत करण्यात आलेला आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८/०८/२०११ चे निर्णय क्र.६६१ मध्ये " येथून पुढे सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी सेवानिवृत्तीनंतर सेवेत मुदतवाढ मागितल्यास नाकारणेत येऊन सदर प्रस्ताव व्यवस्थापन समितीपुढे सादर करणेत येऊ नये असा झालेला आहे. "

श्री खांडरे, प्रभारी अधीक्षक, अभिलेख कक्ष यांचा मुदतवाढीबाबतचा प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६३८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू विषय स्थगित ठेवण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- अधिक्षक, आस्थापना)

---

**विषय नं.६७** **सहाय्यक अभियंता (मेकॅनिक) व कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) यांचा परिविक्षाधीन कालावधी संपल्यामूळे संस्थान सेवेत कायम करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिरडी चे कर्मचारी मंजूर आकृतीबंधास व मा.व्यवस्थापन समितीचे दि.१२/०६/२०११ रोजीचे सभेंतील निर्णय क्र.४६८ नुसार श्री. अमृत गंगाधर जगताप यांची मेकॅनिकल विभागाकडे सहाय्यक अभियंता (मेकॅनिकल) (प्रत्यक्ष काम प्रसादालय विभाग) व श्री. अतुल एकनाथ

वाघ यांची मेकॅनिकल विभागाकडे सहाय्यक अभियंता (मेकॅनिकल) (प्रत्यक्ष काम वाहन विभाग ) या पदांवर तसेच सर्वश्री.मधुकर परशराम गव्हाणे, गंगाधर शंकर जाधव, स्वप्नील बाबासाहेब गायकवाड व अजय शिवराम पांडे यांची बांधकाम विभागाकडे कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) या पदावर एक वर्ष परिवीक्षाधीन कालावधीसाठी पदस्थापना करण्यात आलेली आहे. त्यानुसार ते कामावर हजर झालेले असून त्यांची तपशीलवार माहिती खालील प्रमाणे आहे.

| अ. नं. | कर्मचा-याचे नांव व हुद्दा वेतन बॅड व ग्रेड वेतन | शिक्षण | पदस्थापना तारीख | परिवीक्षाधीन कालावधी संपण्याची तारीख | वैद्यकिय पात्रता | संस्थान सेवेत कायम करणेची तारीख |
|---|---|---|---|---|---|---|
| **०१** | **०२** | **०३** | **०४** | **०५** | **०६** | **०७** |
| ०१ | श्री. अमृत गंगाधर जगताप सहाय्यक अभियंता (मेकॅनिकल) प्रत्यक्ष काम प्रसादालय विभाग ९३००-३४८०० ग्रेडवेतन रु.४४०० | डी.एम.ई एमएस सी आयटी | ०१/०७/२०११ | ३०/०६/२०१२ | २७/०७/२०११ च्या प्रमाणपत्रानुसार पात्र | ०१/०७/२०१२ |
| ०२ | श्री. अतुल एकनाथ वाघ सहाय्यक अभियंता (मेकॅनिकल ) प्रत्यक्ष काम वाहन विभाग ९३००-३४८०० ग्रेडवेतन रु.४४०० | डी.एम.ई एमएस सी आयटी | ०१/०७/२०११ | ३०/०६/२०१२ | २७/०७/२०११ च्या प्रमाणपत्रानुसार पात्र | ०१/०७/२०१२ |
| ०३ | श्री. मधुकर परशराम गव्हाणे कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) बांधकाम ९३००-३४८०० ग्रेडवेतन रु.४३०० | डी.सी.ई एमएस सी आयटी | ०१/०७/२०११ | ३०/०६/२०१२ | १६/०६/२०१२ च्या प्रमाणपत्रानुसार पात्र | ०१/०७/२०१२ |
| ०४ | श्री. गंगाधर शकर जाधव कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) बांधकाम ९३००-३४८०० ग्रेडवेतन रु.४३०० | डी.सी.ई एमएस सी आयटी | ०१/०७/२०११ | ३०/०६/२०१२ | १६/०६/२०१२ च्या प्रमाणपत्रानुसार पात्र | ०१/०७/२०१२ |
| ०५ | श्री. अजय शिवराम पांडे कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) बांधकाम ९३००-३४८०० ग्रेडवेतन रु.४३०० | डी.सी.ई एमएस सी आयटी | ०१/०७/२०११ | ३०/०६/२०१२ | २०/०६/२०१२ च्या प्रमाणपत्रानुसार पात्र | ०१/०७/२०१२ |
| ०६ | श्री. स्वप्नील बाबासाहेब गायकवाड कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) बांधकाम ९३००-३४८०० ग्रेडवेतन रु.४३०० | डी.सी.ई एमएस सी आयटी | ०१/०७/२०११ | ३०/०६/२०१२ | १६/०६/२०१२ च्या प्रमाणपत्रानुसार पात्र | ०१/०७/२०१२ |

सदर एक वर्षाचे परीवीक्षाधीन कालावधी मध्ये उपरोक्त अ.नं. ०१ ते ०६ वरील कर्मचारी यांचे काम व वर्तणूक कशी आहे ? ते हुकूमाप्रमाणे व योग्य रितीने कामे करतात किंवा कसे? त्यांचे बाबतीत काही प्रकरणे चालू अथवा प्रस्तावीत आहेत काय? त्यांना सेवेत कायम करावे अगर कसे ? याबाबत संबंधीत अधिक्षक/विभाग प्रमुख यांचेकडून अभिप्राय मागविण्यात आले होते. त्यानुसार -

उपरोक्त अ.नं. ०१ वरील कर्मचारी श्री. अमृत गंगाधर जगताप सहाय्यक अभियंता (मेकॅनिकल ) यांचे काम समाधानकारक असून ते हुकूमाप्रमाणे व योग्य रितीने कामे करतात. त्यांचे बाबतीत कोणतीही प्रकरणे चालू नाहीत. त्यांची सेवा पुढे चालू ठेवणेस हरकत नाही. " असे अभिप्राय अधिक्षक प्रसादालय विभाग यांनी दिले असून त्यावर प्रशासकिय अधिकारी (प्रसादालय ) यांची संमती दर्शक स्वाक्षरी आहे.

अ.नं. ०२ वरील कर्मचारी श्री.अतुल एकनाथ वाघ सहाय्यक अभियंता (मेकॅनिकल) यांची वर्तणूक चांगली असून ते हुकूमाप्रमाणे व योग्य रितीने कामे करीत आहेत. त्यांचेबाबत काही प्रकरणे चालू अथवा प्रस्तावीत नाहीत. त्यांची सहाय्यक अभियंता (मेकॅनिकल) या पदावर सेवा पुढे चालू ठेवणेस हरकत नाही. असे अभिप्राय प्र. वाहन विभाग प्रमुख यांनी दिले असून त्यांवर विशेष कार्य अधिकारी (वाहन विभाग) यांची संमती दर्शक स्वाक्षरी आहे.

त्याचप्रमाणे उपरोक्त अ.नं. ०३ ते ०६ वरील अनुक्रमे सर्वश्री. श्री. मधुकर परशराम गव्हाणे, श्री. गंगाधर शकर जाधव, श्री. अजय शिवराम पांडे , श्री. स्वप्नील बाबासाहेब गायकवाड कनिष्ठ-अभियंता (स्थापत्य) यांची कामे व वर्तणूक चांगली आहे. ते हुकूमाप्रमाणे व योग्य रितीने कामे करतात. त्यांचे बाबतीत काही प्रकरणे चालू अथवा प्रस्तावीत नाहीत. त्यांची कनिष्ठ -अभियंता (स्थापत्य ) या पदावर संस्थान नियमाप्रमाणे सेवा चालू ठेवणेबाबत शिफारस करण्यात येत आहे. असे अभिप्राय वरिष्ठ मुख्य अभियंता बांधकाम यांनी दिले असून त्यावर विशेष कार्य अधिकारी (बांधकाम विभाग ) यांची संमती दर्शक स्वाक्षरी आहे.

उपरोक्त श्री. अमृत गंगाधर जगताप यांचे बाबत अधिक्षक प्रसादालय व श्री.अतुल एकनाथ वाघ यांचे बाबत वाहन विभाग प्रमुख यांचे अभिप्राय विचारात घेता त्यांना सहाय्यक अभियंता (मेकॅनिकल) या

पदावर वेतन बँड रु. ९३००-३४८०० +ग्रेड वेतन रु.४४०० व सर्वश्री. श्री. मधुकर परशराम गव्हाणे, श्री. गंगाधर शकर जाधव, श्री. अजय शिवराम पांडे , श्री. स्वप्नील बाबासाहेब गायकवाड यांचे बाबत वरिष्ठ मुख्य अभियंता बांधकाम यांचे अभिप्राय विचारात घेता त्यांना कनिष्ठ-अभियंता (स्थापत्य ) या पदावर वेतन बँड रु.९३००-३४८०० + ग्रेड वेतन रु. ४३०० मध्ये उपरोक्त स्तंभ क्र. ०७ मध्ये दर्शविलेल्या तारखेपासून त्यांना संस्थान सेवेत कायम करणेबाबतचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६३९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे श्री. अमृत गंगाधर जगताप यांचे बाबत अधिक्षक प्रसादालय व श्री.अतुल एकनाथ वाघ यांचे बाबत वाहन विभाग प्रमुख यांचे अभिप्राय विचारात घेता त्यांना सहाय्यक अभियंता (मेकॅनिकल) या पदावर वेतन बँड रु. ९३००-३४८०० + ग्रेड वेतन रु.४४०० व सर्वश्री. श्री. मधुकर परशराम गव्हाणे, श्री. गंगाधर शकर जाधव, श्री. अजय शिवराम पांडे, श्री. स्वप्नील बाबासाहेब गायकवाड यांचे बाबत वरिष्ठ मुख्य अभियंता बांधकाम यांचे अभिप्राय विचारात घेता त्यांना कनिष्ठ-अभियंता (स्थापत्य) या पदावर वेतन बँड रु.९३००-३४८०० + ग्रेड वेतन रु. ४३०० मध्ये उपरोक्त स्तंभ क्र. ०७ मध्ये दर्शविलेल्या तारखेपासून त्यांना संस्थान सेवेत कायम करण्यात यावे असे ठरले.**

(कार्यवाही- अधिक्षक, आस्थापना)

---

**यानंतर मा.अध्यक्ष यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा करणेत आली.**

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०१** **नवीन "राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना" आरोग्य योजनेच्या अंमलबजावणी बाबत.**
**प्रस्ताव-** सध्याच्या जीवनदायी आरोग्य योजनेमध्ये आमुलाग्र बदल करण्यात आलेली, "राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना" या नावाने नवीन आरोग्य योजना टप्याटप्याने राज्यात लागु करण्यात येणार आहे, पहिल्या टप्यात गडचिरोली, अमरावती, नांदेड, धुळे, सोलापुर, रायगड, मुंबई व मुंबई उपनगरे हया ८ जिल्हयांचा समावेश करण्यात येणार असुन, जसजसा इतर जिल्हयांचा समावेश करण्यात येईल, त्या नुसार, सध्याची जीवनदायी आरोग्य योजना बंद केली जाणार आहे.

सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी शासनाने च्राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना सोसायटी-RGJAY या नावाने सोसायटी स्थापन करण्यात आलेली असुन, विमा कंपनी म्हणुन, नॅशनल इन्शुरन्स कं. लि., यांची नेमणुक करण्यात आलेली आहे, सदर विमा कंपनीने, योजनेच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी, थर्ड पार्टी ॲडमिनिस्ट्रेटर (TPA) म्हणुन एमडी इंडिया हेल्थ केअर सर्व्हिसेस् (TPA) प्रा. लि., पुणे, यांची नेमणुक केलेली आहे.

पहिल्या टप्यात, अहमदनगर जिल्हयाचा समावेश करण्यात आलेला नसला तरी सुध्दा, मंत्रालय स्तरावरून, खास बाब म्हणुन, श्री साईबाबा हॉस्पिटलची, सदर योजने अंतर्गत पहिल्या टप्यातच नोंदणी (Empanellment) करण्याबाबत, एमडी इंडिया हेल्थ केअर सर्व्हिसेस् (TPA) प्रा.लि., पुणे, यांना निर्देश देण्यात आलेले असुन, एमडी इंडिया यांचे कडुन हॉस्पिटलची नोंदणी करण्याबाबत कार्यवाही चालु करण्यात आलेली असुन, एमडी इंडिया यांचे कडुन विविध प्रकारच्या एकुण ८४० शस्त्रक्रियांचे दरपत्रक/पॅकेज इंटरनेटवरून प्राप्त झाले होते.

सदर दरपत्रक तपासले असता, असे निदर्शनास आले की, शासन मंजुर दरांपेक्षा, एमडी इंडियाचे दर सरासरी ३०% इतके कमी असल्याने, एमडी इंडिया कं. यांना, त्यांचे दरपत्रक, शासन मंजुर दर, तसेच श्री साईबाबा हॉस्पिटलच्या सध्याच्या दरांपेक्षा कमी असल्याने, सदर दरपत्रक मान्य करता येणे शक्य नसल्याचे व शासन मंजुर दरांपेक्षा किमान ३०% जास्त दर वाढवुन/मंजुरी देण्याचे संदर्भ क्र.८ च्या E-mail व्दारे कळविण्यात आले होते.

त्यानंतर एमडी इंडिया कं. यांचेकडुन दि.२३.२.२०१२ रोजी प्राप्त झालेल्या संदर्भ क्र.९ च्या E-mail नुसार, श्री साईबाबा हॉस्पिटलसाठी शासन मंजुर दरांइतके दर वाढवुन/Revise करून देण्यात आलेले आहेत, सदर दरपत्रक,

श्री साईबाबा हॉस्पिटलच्या सध्याच्या दरपत्रकाशी बहुतांशाने मिळते-जुळते आहेत, तसेच, सोबत संस्थान/ हॉस्पिटल व्यवस्थापनाने रू.३००/- च्या स्टॅम्प पेपरवर करावयाच्या Memorandum of Understanding (MoU) चा Terms & Conditions नमुद असलेला ३० पानांचा ड्राफ्ट/मसुदा देण्यात आलेला असुन, त्याची प्रत सोबत जोडण्यात आलेली आहे.

सदर, MoU मध्ये नमुद करण्यात आलेल्या क्र.१ ते १० मधील Terms & Conditions हया अतिशय क्लीष्ट, जाचक व सर्व जबाबदाऱ्या/कर्तव्ये इ.संस्थान/हॉस्पिटल व्यवस्थापनावर सोपविण्यात आलेल्या असुन, बऱ्याचशाबाबी संस्थान/हॉस्पिटल व्यवस्थापनास कायमस्वरूपी आर्थिक नुकसान पोहचविणाऱ्या असल्याने, संदर्भ क्र.११ नुसार, संबंधित प्रतिनिधींशी महत्वाच्या बाबींवर सविस्तर चर्चा करण्याबाबत मा.कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली शिर्डी येथे बैठक आयोजीत करण्यात आली होती.

संदर्भ क्र.९ च्या बैठकीत योजनेच्या अंमलबजावणी व एकुण कार्यप्रणालीबाबत महत्वाच्या मुद्दांवर सविस्तर चर्चा करण्यात येवुन पुढील मुद्दे संस्थानच्या दोन्ही हॉस्पिटल्स्मधील सध्या उपलब्ध असलेल्या सोयीसुविधा विचारात घेवुन मान्य करण्यात आले :-

**१. इन्फ्रास्ट्रक्चर :** उदा.कॉम्प्युटर नेटवर्क, स्कॅनर, प्रिंटर्स्, डिजिटल कॅमेरा, ब्रॉड बँन्ड, बार कोड रिडर इ.उपलब्ध करून देणे किंवा त्यापोटी येणारा खर्च एमडी इंडिया कंपनीस रूग्णांच्या बिलामधुन कपात करून देणे.

**२. मनुष्यबळ :** पूर्णवेळ मेडीकल ऑफिसर्स्, डॉक्टर्स, प्रशिक्षित व अनुभवी पॅरामेडीकल स्टाफ, मेडीकल कोऑर्डिनेटर, मेडीकल कॅम्प कोऑर्डिनेटर इ. ची नेमणुक करणे.

**३. सर्व अत्यावश्यक वैद्यकीय सेवा सुविधा :** उदा.विविध तपासण्या, ऑपरेशन थिएटर्स, अतिदक्षता विभाग, ब्लड बँक, रूग्ण वाहिका इ. २४ तास सज्ज ठेवुन, मोफत उपलब्ध करून देणे.

**४. राखीव खाटा :** प्रत्येक विभाग/वॉर्डमध्ये किमान २५% खाटा राखीव ठेवणे.

**५. मोफत कॅम्पस्/शिबीरे :** योजने अंतर्गत लाभार्थी रूग्ण निश्चित/Identify करण्यासाठी आसपासच्या खेडयांमध्ये दर आठवडयाला किमान १ किंवा दर महिन्याला ४ मोफत कॅम्पस्/शिबीरे आयोजित करणे.

**६. मोफत भोजन :** ॲडमिट रूग्णांस चहा, नाश्ता व दोन वेळचे भोजन मोफत देणे.

**७. मोफत औषधे :** ॲडमिट रूग्णांस डिसचार्ज होताना, पुढील १० दिवसांची फॉलोअप मेडिसिन्स् मोफत देणे.

**८. ज्युरिसडीक्शन :** एमडी इंडिया कंपनीचे मुख्यालय/Head Office, पुणे येथे असल्याने, Memorandum of Understanding (MoU) अंतर्गत उपस्थित होणारे वाद/Disputes हे Arbitration and Conciliation Act, १९९६, (Amended) च्या तरतुदींनुसार Arbitration व्दारे पुणे येथील न्यायालयात मिटविण्यात येतील ही अट मान्य करण्यात आली.

**९. संस्थान हॉस्पिटलस्मध्ये करावयाचे उपचार/शस्त्रक्रिया :-** योजने अंतर्गत समाविष्ट असलेल्या एकुण ८४० पैकी, संस्थान हॉस्पिटलस्मध्ये फक्त सध्या उपलब्ध सोयी सुविधांनुसार करण्यात येत असलेले उपचार व शस्त्रक्रियाच करण्याचे मान्य करण्यात आले, अशा उपचार व शस्त्रक्रियाची यादी संस्थान हॉस्पिटलस्कडुन संबंधितांस कळविण्याचे ठरविण्यात आले.

**१०.** उपरोक्त नमुद करण्यात आलेल्या आर्थिक महत्वाच्या बाबी, तसेच इतर सर्व प्रकराच्या शस्त्रक्रियांच्या पॅकेजेस्चे दर विचारात घेता, बहुतेक सर्व रूग्णांच्या बिलांपोटी विमा कंपनीकडुन प्राप्त झालेली रक्कम वजा जाता, फरकाच्या रकमेपोटी किंवा किरकोळ त्रुटींमुळे उदा.अमुकच बाब (तपासणी/उपचार/प्रोसिजर) का केली किंवा केली नाही? किंवा कोणतीही तपासणी/उपचार/प्रोसिजर करण्यापुर्वी पुर्व परवानगी *(रूग्ण गंभीर व अत्यवस्थ असताना (Emergency) रूग्णाचा जीव किंवा कोणताही अवयव वाचविण्याच्या दृष्टीने वेळ न दवडता सर्व प्रथम व ताबडतोब आवश्यक त्या वैद्यकीय तपासण्या/उपचार/शस्त्रक्रिया करणे अत्यावश्यक असते)* का घेण्यात आली नाही? इ.अनेक कारणांमुळे विमा कंपनीकडुन मोठया प्रमाणावर पुर्ण बिले नामंजुर केली जाऊ शकतात किंवा काही प्रमाणात बिलांची रक्कम कपात केली जाऊ शकते, अशा बिलांपोटी फार मोठया रक्कमेची सवलत देणे भाग पडेल, अशी शंका व्यक्त करण्यात आली असता, एमडी इंडिया कंपनीकडुन हॉस्पिटलच्या संबंधित कर्मच्याऱ्यांस आवश्यक ते ट्रेनिंग देण्याचे मान्य करण्यात आले, जेणेकरून, दैनंदिन कामकाज व बिलींगची कार्यवाही योग्य प्रकारे पुर्ण होईल व बिले नामंजुर रिजेक्ट होणार नाहीत.

तसेच, काही महत्वाच्या मुद्दांबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी शासनाशी पत्रव्यवहार करण्याचे ठरविण्यात आले असुन, सदर मुद्दे पुढील प्रमाणे :-

**१. विविध शस्त्रक्रियांच्या पॅकेजेस्चे दर वाढवुन मिळणेबाबत :-** जरी संदर्भ क्र.९ च्या E-mail नुसार शासन -

मंजुर दरांइतके दर वाढवुन/Revise करून देण्यात आलेले असले तरीही, सदर दरांमध्ये दाखल रूग्णांस रोग निदानासाठीच्या चाचण्या/तपासण्या, भोजन, फॉलोअप मेडिसिन्स्/औषधे, परतीचे एसटी/रेल्वे भाडे, फॉलोअप तपासण्या इ.सर्व बाबी मोफत पुरविणे बंधनकारक व पॅकेजेस्मध्ये समाविष्ट असल्याने, सध्या मंजुर करण्यात आलेल्या दरांमध्ये किमान ३० ते ४० टक्के वाढवुन मिळणेबाबत पत्रव्यवहार करणे.

**२. मोफत ट्रान्सपोर्ट :** ॲडमिट रूग्णास डिसचार्ज होताना, त्याच्या तालुक्याच्या गावापर्यंत एसटीचे किंवा रेल्वेचे दुसऱ्या वर्गाचे परतीचे भाडे रोखीने देणे.

**३. वैद्यकीय आर्थिक मदत :** योजने अंतर्गत लाभार्थी रूग्णांस वैद्यकीय आर्थिक मदत मिळविण्यासाठी मुख्यमंत्री मदत निधी किंवा इतर संस्था, योजना किंवा इनश्युरन्स क्लेम इ.साठी कोणतेही कागदपत्रे देण्यात येवु नयेत, या नियमाचे उल्लंघन झाल्यास, संबंधित हॉस्पिटलची मान्यता रद्द केली जावु शकते किंवा इम्पॅनलमेंट ॲन्ड डिसिप्लीनरी कमिटीच्या निर्णयानुसार कारवाई केली जाऊ शकते.

**४. Empanelment & Disciplinary Committee (EDC) :** योजने अंतर्गत उपस्थित होणारे वाद/Disputes यांचे निराकरन करण्यासाठी इम्पॅनलमेंट ॲन्ड डिसिप्लीनरी कमिटी स्थापन

करण्यात आलेली आहे, सदर कमिटीमध्ये RGJAY-सोसायटी आणि इनश्युरन्स कंपनीच्या प्रतिनिधींचा समावेश असेल, परंतु हॉस्पिटल प्रतिनिधींचा समावेश करण्यात आलेला नाही, मात्र अशा हॉस्पिटल प्रतिनिधींचा समावेश नसलेल्या कमिटीचा निर्णय सर्व बाबींमध्ये संबंधित हॉस्पिटल्स्ना बंधनकारक राहिल.

उपरोक्त विषयी, संदर्भ क्र.१२, दि.२४.३.२०१२ रोजी मा.अतिरिक्त मुख्य सचिव, श्री.जयंतकुमार बांठिया सो. आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई, यांचे अध्यक्षतेखाली श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये सायं.८.३० ते १०.०० वा.च्या दरम्यान, वैद्यकीय संचालक, वैद्यकीय प्रशासक, वैद्यकीय अधिक्षक, कार्डियोलॉजिस्ट, डॉ.वर्मा, कार्डियाक सर्जन, डॉ.अग्रवाल, डॉ.शेटे, आर्थो सर्जन, डॉ.जपे, पीआरओ, तसेच, उप-संचालक, नाशिक विभाग, डॉ.देवगावकर, जिल्हा शल्य चिकित्सक, अहमदनगर, डॉ.आठवले व एमडी इंडियाचे डॉ.कटारिया यांच्या उपस्थित बैठक घेण्यात आली.

सदर बैठकीत, मा.अतिरिक्त मुख्य सचिव, यांनी, उपरोक्त मुद्दांबाबत चर्चाकरून पुढील निर्देश दिले :-

**१. पॅकेज दरपत्रक :-** सध्या मंजुर करण्यात आलेल्या पॅकेजेस्चे दरपत्रक सर्व राज्यातील हॉस्पिटल्स्साठी समान असुन, प्रत्येक हॉस्पिटलसाठी वेगळे वाढीव दर दरपत्रक मंजुर करणे शक्य नसल्याचे स्पष्ट केले.

**२. मोफत ट्रान्सपोर्ट :-** अॅडमिट रूग्णांस डिसचार्ज होताना, त्यांच्या तालुक्याच्या गावापर्यंत (*रूग्णाच्या मुळगावी निवासस्थानापर्यंत परतीचे भाडे रोखीने देण्याची अट शिथिल करून*) एसटीचे किंवा रेल्वेचे दुसऱ्या वर्गाचे परतीचे भाडे रोखीने देण्याचे MoU/कराराच्या मसुदयामध्ये नमुद करण्याचे एमडी इंडियाच्या प्रतिनिधीस निर्देश दिले.

**३. वैद्यकीय आर्थिक मदत :** याबाबत मा.अतिरिक्त मुख्य सचिव, यांनी, स्पष्ट केले की, इतर हॉस्पिटल्स् अशा प्रकारे आर्थिक मदतनिधी मिळविण्यासाठी गैरवापर करू शकतात किंवा रूग्णांकडुनही रक्कम भरून घेतली जाण्याची शक्यता असल्याने, त्यामुळे इतर मार्गाने मदत निधी मिळविण्यास परवानगी देता येणे शक्य नसल्याचे स्पष्ट केले.

**४.** मा.अतिरिक्त मुख्य सचिव यांच्या पुढील आणखी काही बाबी निदर्शनास आणुन देण्यात आल्या :-

(१) योजने अंतर्गत एकुण ८४० प्रोसिजर्स/शस्त्रक्रियांपैकी, श्री संस्थान साईबाबा हॉस्पिटल्स्मध्ये सध्या उपलब्ध असलेल्या सोयी सुविधांनुसार फक्त ६०२ प्रोसिजर्स/शस्त्रक्रिया व १०५ OPD प्रोसिजर्स करता येवु शकतील, त्या व्यतिरिक्त इतर रूग्णांचेबाबत काहीही करता येणे शक्य होणार नाही, या बाबत, मा.अतिरिक्त मुख्य सचिव यांनी सहमती दर्शविली.

(२) श्री संस्थान साईबाबा हॉस्पिटल्स्मध्ये सध्या करण्यात येत असलेल्या परंतु, योजने अंतर्गत समाविष्ट नसलेल्या प्रोसिजर्स/शस्त्रक्रियांचा योजने अंतर्गत समावेश करून मान्यता देण्यात यावी अशी मागणी करण्यात आली असता, मा.अतिरिक्त मुख्य सचिव यांनी, अशा प्रोसिजर्स/शस्त्रक्रियांची यादी Email व्दारे पाठिण्याचे निर्देश दिले व त्यावर सकारात्मक विचार करण्यात येईल असेही स्पष्ट केले.

तरी, सदर योजने अंतर्गत श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ हॉस्पिटलची सोबत जोडण्यात आलेल्या Memorandum of Understanding (MoU), ड्राफ्टनुसार रू.३००/- स्टॅम्प पेपरवर, मा.कार्यकारी अधिकारी सो. यांच्या स्वाक्षरीने करार व नोंदणी करण्यात यावी किंवा कसे? या बाबत अवलोकन होऊन मार्गदर्शन व निर्णयार्थ, सदर विषय, मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे सादर करण्यात यावा असे मत आहे.

**निर्णय क्र.६४० यावर सविस्तर चर्चा होऊन, नवीन राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेची श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये अंमलबजावणी करण्यास तत्वत: मान्यता देण्यात आली. या योजनेबाबत सविस्तर चर्चा करणेकामी राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना सोसायटी, नॅशनल इन्शुरन्स कंपनी, व या योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी करणारे एम.डी. इंडिया हेल्थकेअर यांचे प्रतिनिधीना चर्चेसाठी आमंत्रित करण्यात यावे असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**आयत्या वेळेचा विषय नं. ०२** **कॉईन सॉर्टींग मशिन खरेदी करणे बाबत.**

**प्रस्ताव-** दक्षिणा मोजणी हॉलमध्ये नाण्यांची सॉर्टींग करण्यासाठी मे. कोरस ( इं ) लि. पुणे या कंपनीकडून कॉईन सॉर्टर- मॉडेल De-La-Rue Mach- ६, इंग्लंड या कंपनीच्या एकूण- २ मशिन खरेदी करण्यात आल्या होत्या. आजपर्यंत या मशिनचा वापर करुन दक्षिणामोजणी हॉलमधील कॉईन सॉर्टींग करण्याचे काम कले जात आहे. सदरच्या मशिन मे-२००८ मध्ये संस्थानने खरेदी केलेल्या आहेत.

उपरोक्त मशिनवर पूर्वी ९० % कॉईन सॉर्टींगचे काम केले जात होते. तथापि आर.बी.आय. कडून नाण्यांमध्ये मोठयाप्रमाणात बदल ( सारख्या आकाराचे ) झाल्याने सदरच्या मशिनव्दारे हेच काम आता ५० % पर्यंत होत आहे. प्रामुख्याने नाण्यांमध्ये होणा-या मोठया बदलामुळे कॉइन Mixing चे प्रमाण वाढलेले आहे. यावर उपाय शोधण्यासाठी मे.कोरस ( इं ) लि. पुणे या कंपनीला कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे या कंपनीचे मुंबई येथील प्रतिनिधी दक्षिणामोजणीचे वेळी येऊन त्यांनी प्रत्यक्ष पाहणी केलेली आहे. सदरची कंपनी ही डीलर असल्याने त्यांनी या मशिनची उत्पादक कंपनी डी-ला-रु, इंग्लंड यांना कळवून या मशिनमध्ये योग्य ते बदल घडवून आणण्यास कळविले होते. त्याप्रमाणे डी-ला-रु या कंपनीने मशिनमध्ये

योग्य ते बदल केले असल्याचे मे. कोरस ( इं ) लि. मुंबई यांनी दूरध्वनीवरुन कळविले आहे. तसेच नवीन मशिन- Telaris Model- Mach-६ (with WAVE COIN AUTHONTICATION TECHNOLOGY) चे कोटेशन पाठविले आहे.

पूर्वी घेतलेल्या De-La-Rue Mach- ६ या मशिनला एकूण ४ वर्ष झालेले असुन, मशिनची कार्यक्षमताही खुप कमी झालेली आहे. त्यामुळे ब-याचवेळा नाण्यांची सॉर्टींग करतांना अडचण निर्माण होऊन ते बंद पडत आहे. तसेच दक्षिणामोजणीतील नाण्यांचे प्रमाणही आता वाढलेले आहे. पूर्वी आठवडण्यातून एकदाच दक्षिणा मोजणीचे काम केले जात होते, आता आठवडयातून २ वेळेला दक्षिणामोजणीचे काम होत असल्याने मशिनचा वापर अधिक कार्यक्षमतेने होणे आवश्यक आहे. त्यामुळे नविन मशिन खरेदी करणे अत्यंत आवश्यक आहे. मे.कोरस ( इं ) लि. हे डी-ला-रु या कंपनीचे भारतातील एकमेव पुरवठादार असल्याने त्यांचेकडूनच सदरच्या मशिन खरेदी कराव्या लागणार आहेत. दक्षिणा मोजनी हॉलमधील सर्व मशिन या मे. कोरस (इं) लि. पुणे यांचेकडून खरेदी केलेल्या असुन प्रत्येक दक्षिणामोजणीचे वेळी त्यांचेकडील इंजिनीअरकडून चांगल्याप्रकारच्या सेवा मिळत आहेत.

नविन मशिन Telaris Model- Mach-६ चे कोटेशन मे.कोरस ( इं ) लि.पुणे यांचेकडून प्राप्त झालेले असुन एका मशिनची किंमत रु.१०,५०,०००/- अधिक टॅक्स अशी एकूण रक्कम रु.१२,५०,०००/- अशा २ मशिन खरेदी करण्यासाठी साधारणतः एकूण रक्कम रु.२५,००,०००/- ( अक्षरी रुपये पंचवीस लाख मात्र) इतकी रक्कम आदा करावी लागणार आहे. तसेच मशिन विदेशातून येणार असल्याने पुरवठा आदेश दिल्यानंतर साधारणतः २ महिन्याचा कालावधी यासाठी लागणार आहे.

तरी वरीलप्रमाणे मॉडेल De-La-Rue Mach- ६ या दोन मशिन दक्षिणामोजणी हॉलमध्ये खरेदी करण्यासाठी व त्यासाठी येणारा खर्च रक्कम रु.२५,००,०००/- तसेच मशिन खरेदी केल्यास १ वर्षाच्या वॉरंटीनंतर मे. कोरस ( इं ) लि. पुणे यांचेकडे सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करण्यासाठी मा.त्रीसदस्य समितीच्या सभेत मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र. ६४१ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे मॉडेल De-La-Rue Mach- ६ या दोन मशिन दक्षिणामोजणी हॉलमध्ये खरेदी करण्यासाठी व त्यासाठी येणारा खर्च रक्कम रु.२५,००,०००/- तसेच मशिन खरेदी केल्यास १ वर्षाच्या वॉरंटीनंतर मे. कोरस ( इं ) लि. पुणे यांचेकडे सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करण्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ०३ पुण्यतिथी उत्सव २०१२ या निमित्ताने समाधी मंदिर व मंदिर परिसरास फुलांची सजावट करणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री अजय रेलन व्दार शारदा मोटर्स ,नाशिक यांनी कळविले की, श्री पुण्यतिथी उत्सव -२०१२ या निमित्ताने समाधी मंदिर, व्दारकामाई, चावडी, गुरुस्थान इ. ठिकाणी फुलांची सजावट देणगी दाखल करुन देण्यास तयार आहे. यासाठी त्यांनी संस्थान कडे परवानगी मागीतलेली आहे.

संस्थान, संस्थान मार्फत साजऱ्या करण्यात येणाऱ्या उत्सवासाठी समाधी मंदिर, व्दारकामाई, चावडी, गुरुस्थान या ठिकाणी फुलांची सजावट करण्यात येते. सदरची सजावट ही संस्थान खर्चाने किंवा कोणी साईभक्त देणगी म्हणुन सजावट करण्यास तयार असल्यास त्यांना सजावटीची परवानगी देण्यात येते.

श्री रामनवमी उत्सवा-२०१२ साठी श्रीमती लोहिया मॅडम, नागपूर यांना, अक्षय तृतिया निमित्ताने श्री दत्तोबा बांगर,पुणे यांना श्री गुरुपौर्णिमा उत्सव -२०१२ साठी श्री. व्हि.एम.विजय रामा,बंगलोर यांनी फुलांची सजावाट करणेस परवानगी देण्यात आलेली आहे.

श्री अजय रेलन, नाशिक यांनी श्री पुण्यतिथी उत्सव- २०१२. या निमित्ताने मंदिर व मंदिर परिसरात फुलाची सजावट करणेस व फुलांची सजावट करणेकामी येणाऱ्या कर्मचाऱ्यांची राहण्याची, भोजनाची सोय विनामुल्य करणेस परवानगी मागीतलेली आहे.

**निर्णय क्र. ६४२ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री अजय रेलन व्दार शारदा मोटर्स, नाशिक यांना पुण्यतिथी उत्सव २०१२ निमित्ताने मंदिर व मंदिर परिसरात फुलाची सजावट करणेस व येणारे कारागीर यांना दर्शनासाठी, जेवणासाठी पास व सजावटीचे सामान ठेवणेसाठी हॉल देण्यात यावा असे ठरले.**

(कार्यवाही-बगीचा विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०४ वार्षिक औषधे / सर्जिकल साहित्य (Part A) खरेदीकामी चर्चा / वाटाघाटीसाठी सभेची तारीख व वेळ निश्चित करणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालय व श्री साईबाबा रुग्णालयासाठी सन २०१२-२०१३ या वर्षाकरीता लागणाऱ्या वार्षिक औषधे/ सर्जिकल साहित्य खरेदीकामी दि.०६/०४/२०१२ रोजीचे मा. त्रीसदस्य समिती सभेत निर्णय क्र.३१६ अन्वये मान्यता मिळालेली होती.

त्यानुसार वर्तमान पत्रातील जाहिरातीस अनुसरुन (इंडियन एक्सप्रेस - मुंबई, गावकरी - नाशिक, लोकमत - औरंगाबाद, नवभारत - नागपुर, गुजरात समाचार - अहमदाबाद तर सकाळ - पुणे या वर्तमान

पत्रात) तसेच संस्थानचे संकेत स्थळावरुन एकूण १५० निविदा प्राप्त झालेल्या होत्या. त्यापैकी M/s. Drugs India, Nashik यांनी निविदेसोबत अनामत रक्कम दिलेली नाही तर M/s. Yoga Enterprises, Pune, M/s. Invida India Pvt. Ltd., New Delhi व M/s. H & H Pharmaceutical Pvt. Ltd., Mumbai यांच्या निविदा दि.०२/०६/२०१२ रोजी उशिरा शिर्डी कार्यालय येथे प्राप्त झालेल्या आहेत त्यामुळे त्यांच्या निविदा स्विकारण्यात आलेली नाही. तसेच M/s. Saturn Healthcare Pvt., Mumbai यांची निविदा उघडल्यानंतर ती Part B ची (On Consignment Basis) असल्यामुळे तीचा विचार Part B मध्ये करण्यात आलेला आहे. त्यामुळे एकूण १४६ निविदांचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आलेला आहे.

सदर तुलनात्मक तक्त्यामध्ये बऱ्याच औषधांसाठी ३ पेक्षा जास्त निविदाधारकांचे दर प्राप्त झालेले आहेत तर काही औषधांसाठी १ किंवा तीन पर्यंत निविदाधारकांचे दर प्राप्त झालेले आहे. त्यामुळे प्राप्त निविदाधारकांनी दिलेल्या नामांकित कंपन्या त्यांचा यापूर्वीचा पुरवठ्याबाबतचा अनुभव संबंधीत वापरणारे Consultant / User इ. चा विचार करुन कमीत कमी तीन कंपन्यांची निवड करण्यात आलेली आहे. तर जेथे तीन किंवा त्यापेक्षा कमी निविदा धारकांचे दर प्राप्त झालेले आहे तेथे प्राप्त तीन किंवा २ किंवा १ निविदाधारकांची निवड करण्यात आलेली आहे. त्याचा गोषवारा खालीलप्रमाणे -

| अ. नं. | तपशील | निविदांची संख्या |
|---|---|---|
| १ | एकूण औषधांची संख्या- | २२९५ |
| २ | एकही निविदा प्राप्त न झालेल्या औषधांची संख्या- | १५६ |
| ३ | निव्वळ दर प्राप्त झालेल्या औषधांची संख्या (३ = १ - २) | २१३७ |
| ४ | ज्या औषधांसाठी प्रथम नामांकित कंपन्यांचे (L१,L२,L३) दर प्राप्त झालेले आहे अशा औषधांची संख्या | ८६५ |
| ५ | ज्या औषधांसाठी नामांकित कंपन्यांपैकी द्वितीय किंवा त्यानंतरचे दर प्राप्त झालेले आहे अशा औषधांची संख्या (Second Lowest Or Next to that) | ३२४ |
| ६ | ज्या औषधांसाठी एकाच निविदाधारकांचे दर प्राप्त झालेले आहे अशा औषधांची संख्या | २६५ |
| ७ | ज्या औषधांची निविड करतांनी Consultant / User यांचा अभिप्राय घेणे गरजेचे आहे अशा औषधांची संख्या | ६४२ |
| ८ | जी औषधे सध्या घेण गरजेचे नाही अशा औषधांची संख्या | ४३ |

वरीलप्रमाणे प्राप्त निविदा धारकांना त्यांच्या निवड केलेल्या औषधांची निविदा धारकाप्रमाणे (Party Wise) यादी तयार करुन खालील सदस्यांच्या समिती सभेपुढे चर्चा / वाटाघाटीसाठी बोलवून चर्चा / वाटाघाटी करता येईल असे नम्र मत आहे.

१. मा. जिल्हा शल्य चिकित्सक, अहमदनगर जिल्हा रुग्णालय
२. मा. जिल्हा आरोग्य अधिकारी, अहमदनगर
३. वैद्यकिय संचालक, श्री साईबाबा संस्थान रुग्णालये, शिरडी.
४. वैद्यकिय प्रशासक, श्री साईबाबा हॉस्पिटल, शिर्डी
५. श्री साईबाबा रुग्णालयातील समिती सुचवितील ते दोन उपस्थित असलेले Consultant

तरी सदरहू समितीची चर्चा / वाटाघाटीची तारीख निश्चित होणेस विनंती.

**निर्णय क्र.६४३ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेल्या तज्ञ डॉक्टराची समिती तयार करुन दि.२९.०७.२०१२ रोजी सदर समितीपुढे निविदाधारकांना बोलवून चर्चा/ वाटाघाटी करण्यात याव्यात, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं. ०५ विश्वस्तांच्या सुचनांबाबत.**

**निर्णय क्र.६४४** मा.विश्वस्तानी सभेत खालीलप्रमाणे सुचना मांडल्या त्या मान्य करण्यात आल्या-

**(१)** श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलकडील प्राथमिक व माध्यमिक विभागाकडे भरण्यात येणाऱ्या सहाय्यक शिक्षक (परिविक्षाधीन) रिक्त पदांसाठी घेण्यात आलेल्या लेखी परिक्षेतील पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात याव्यात. याकामी बाहेरील तज्ञांची नेमणूक करणेत यावी.

(कार्यवाही- प्राचार्या, इंग्लिश मिडीयम स्कुल)

**(२)** दिवसेंदिवस शिर्डी येथे साईभक्तांची दर्शनासाठी होणारी गर्दी विचारात घेता दर्शन रांगेबाबत श्री.हफिज कॉन्ट्रॅक्टर यांनी संस्थानला दिलेल्या प्लॅनस् संदर्भात चर्चा करणेसाठी, त्यांना दि.२९.०७.२०१२ रोजीचे सभेपुढे बोलविण्यात यावे. तसेच पुणे येथील आर्किटेक्ट श्री.पुष्कर कानविंदे यांनी श्री.दर्यानानी यांनी देणगी दिलेल्या जागेवर ध्यान मंदिर व मेडिटेशन सेंटरच्या बांधकामाचे प्लॅनस् दिलेले आहेत. त्यांचे प्लॅनस् चांगले

आहेत म्हणून त्यांनाही मंदिराच्या दर्शन रांगांचे नुतनीकरणाबाबत प्लॅनस् तयार करण्यास संधी द्यावी व पुढील सभेपुढे बोलविण्यात यावे. (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

**(३)** श्री.बारकुंड, अतिरिक्त पोलिस अधिक्षक, अहमदनगर यांनी संस्थानकडे ट्राफिक वॉर्डन म्हणून कर्मचारी मिळणेची विनंती केली आहे. याबाबत त्यांनाही चर्चेसाठी पुढील सभेपुढे बोलविण्यात यावे.

(कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख)

**(४)** दिवसेंदिवस वाढत्या गर्दीचा विचार करता मंदिर व मंदिर परिसरात सुरक्षाव्यवस्था सक्षम, सतर्क व आपत्कालीन परिस्थितीत प्रतिकार करेल या करिता CRPF/ BSF मधील जवानांना सुरक्षेसाठी बोलविणेत प्रस्ताव सादर करावा. (कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख)

**(५)** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या सुरक्षा व्यवस्थेसाठी सुरक्षा कन्सल्टंट नेमण्याबाबत आलेले निविदाधारकांना व्यवस्थापन समितीच्या दि.२९.०७.२०१२ रोजीच्या सभेपुढे चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविणेत यावे. (कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख)

**(६)** वैद्यकिय अधिकारी, आर.एम.ओ. हि आवश्यक पदे भरणेकामी दि.२१.०६.२०१२ रोजीच्या वर्तमान पत्रात जाहिरात देणेत आलेली आहे. तरी सदरचे पदावरील उमेदवारांच्या मुलाखती घेण्यासाठी वैद्यकिय संचालक यांच्या अध्यक्षतेखाली मा. जिल्हा शल्य चिकित्सक- अहमदनगर जिल्हा रुग्णालय, मा. जिल्हा आरोग्य अधिकारी- अहमदनगर, वैद्यकिय प्रशासक- श्री साईबाबा हॉस्पिटल, शिरडी व जी पदे भरावयाची आहेत त्या क्षेत्रातील तज्ञ वैद्यकिय अधिकारी यांची समिती तयार करुन सदर समितीसमोर मुलाखती घेण्यात येऊन, त्याचा अहवाल मान्यतेसाठी त्रिसदस्यीय समितीच्या सभेसमोर ठेवण्यात यावा.

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

वरील निर्णय क्र. ५७३ ते ६४४ सर्वानुमते घेण्यात आले.
यानंतर दुपारी ०३.३० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| स्वाक्षरित- | स्वाक्षरित- | स्वाक्षरित- |
| (किशोर मोरे) | (डॉ.संजीवकुमार) | (जयंत कुलकर्णी) |
| कार्यकारी अधिकारी | जिल्हाधिकारी, अहमदनगर | मुख्य जिल्हा न्यायाधीश |
| सदस्य | सदस्य | अध्यक्ष |

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिरडी